# “माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास”

(२००२&०३ ते २००६&०७)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

विद्या- निष्णात (एम.फिल.) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध


संशोधक

श्री. विशाल शिवाजी हुंबे

एम. ए.(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एच.एस.ननवरे

एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.

प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,

शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज. जि.सोलापूर.



मे २००९

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्राअंतर्गत अर्थशास्त्र या विषयाच्या विद्यानिष्णात (एम.फिल.) या पदवीसाठी श्री. विशाल शिवाजी हुंबे. यांनी "माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास" या विषयावरील शोधनिबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमुद केलेली महिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या महितीप्रमाणे बरोबर आहेत.

तारीख ः

ठिकाण ः

मार्गदर्शक
प्रा.डॉ.एच. एस. ननवरे
प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय,
अकलूज. जि. सोलापूर.

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यानिष्णात (एम.फिल.) या पदवीच्या अभ्यासासाठी " माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास " ही शोध प्रबंधीका सादर करीत आहे. संशोधनाच्या या कार्यक्रमांमध्ये ज्यांनी मार्गदर्शन व सहाय्य केले आहे त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.एच. एस. ननवरे यांनी केलेले मार्गदर्शन व सहाय्य हे मी खुप मोलाचे समजतो, त्यांनी केलेल्या मार्गदर्शना शिवाय या प्रबंध लिखाणाचे काम पुर्ण होणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रा.डॉ.एच. एस. ननवरे यांचा मी ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्राचे अधिष्ठाता प्रा. विजय कारेकर आणि अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रविण जाधव, प्रा. पाटील मॅडम तसेच श्री. हिले सर व त्यांचे सर्व सहकारी यांचे मला मोलाचे सहकार्य लाभले आहे त्यामुळे त्यांचाही मी ऋणी आहे.

तसेच कळंब महाविद्यालयाचे प्राचार्य, श्री. रमेशचंद्र सुर्यवंशी व माझे सर्व सहकारी प्राध्यापक वर्ग, ग्रंथपाल या शिवाय भवानीनगर महाविद्यालयाचे प्राचार्य, व त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक वर्ग या सर्वांनी मला वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संशोधनासाठी निवडलेली शंभर दारिद्रय रेषेखालील कुटुंब तसेच पंचायत समिती माळशिरस, जिल्हा परिषद सोलापूर, येथील सर्व अधिकारी वर्गांनी वेळोवेळी मला मदत केली आहे. शिवाय पूर्ण प्रबंधाचे टंकलेखन करणारे श्री. किरण जाधव व सिद्धनाथ क्षिरसागर यांचे ही आभार व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

तसेच माझे आई, वडिल, भाऊ, बहिण, वहिनी, पत्नी या सर्वांचेही मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा ही मी ऋणी आहे.

संशोधक

श्री. विशाल शिवाजी हुंबे.

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. विशाल शिवाजी हुंबे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, " माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास " हा प्रबंध मी स्वतः लिहीला असून तो पुर्णपणे स्वतंत्र आहे. या प्रबंधातील सर्व माहीती मुळ संदर्भ तसेच प्राथमिक व व्दितीय स्त्रोतांच्या आधारे संकलीत केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. सदर प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

तारीख ः

ठिकाण ः

संशोधक

श्री. विशाल शिवाजी हुंबे.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव. | पान नं. |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले** | **प्रस्तावना व विषयाची रूपरेषा**<br><br>i. प्रस्तावना<br>ii. दारिद्रयाची संकल्पना<br>iii. दारिद्रय रेषा<br>iv. २००२ मधील दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबाची गणना पध्दत<br>v. भारतातील दारिद्रयाचे अंदाज<br>vi. भारतीय ग्रामीण दारिद्रय<br>vii. दारिद्रयाच्या प्रमाणातील बदल<br>viii. दारिद्रय निर्मूलन योजना<br>ix. दारिद्रय निर्मूलन उपायांच्या मर्यादा | १ ते ३६ |
| **प्रकरण दुसरे** | **संशोधन पध्दती**<br><br>i. संशोधन समस्या<br>ii. संशोधन क्षेत्राची निवड<br>iii. संशोधनाचे महत्व<br>iv. संशोधन साहित्याचा आढावा<br>v. संशोधनाची गृहीतके<br>vi. संशोधनाची उद्दीष्टये<br>vii. संशोधन पध्दती | ३७ ते ५४ |

| | | |
|---|---|---|
| | viii. संशोधनाच्या मर्यादा<br>ix. संशोधन अहवाल मांडणी | |
| **प्रकरण तिसरे** | **दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या माहितीचे विश्लेषण** | ५५ ते ९४ |
| **प्रकरण चौथे** | **निष्कर्ष व शिफारशी**<br><br>परिशिष्ठ<br>अ) संदर्भ ग्रंथ<br>ब) प्रश्नावली | ९५ ते ११७ |

कोष्टके


| को.नं | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| | **प्रकरण पहिले** | २१ ते ३५ |
| १.१ | भारतातील प्रमुख राज्यातील दारिद्रय | |
| १.२ | भारतातील ग्रामीण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचा मासिक दरडोई खर्च (२००४-०५) | |
| १.३ | भारतातीलअ १९९३-९४ ते २००४-०५ मधील मासिक दरडोई खर्चातील वाढ (ग्रामीण) | |
| १.४ | सोलापूर जिल्हा -एकूण कुटुंबांशी दरिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण | |
| १.५ | सोलापूर जिल्हा -प्रत्येक तालुक्यातील एकूण कुटुंबांशी दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण | |
| १.६ | सोलापूर जिल्हा - शैक्षणिक स्थान दर्शवित असलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंब (२००२-०३) | |
| १.७ | सोलापूर जिल्हा - ५ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांची सद्यस्थिती दर्शविणारी दारिद्रय रेषेखालील कुटुंब (२००२-०३) | |
| १.८ | सोलापूर जिल्हा - अन्न सुरक्षितता मिळविणारी दारिद्रय रेषेखालील कुटुंब (२००२-०३) | |
| १.९ | सोलापूर जिल्हयातील मासिक सरासरी उत्पन्न मिळविणारी दारिद्रय रेषेखालील कुटुंब (२००२ - ०३) | |

| | | |
|---|---|---|
| | **प्रकरण दुसरे** | **४0 ते ४५** |
| २.१ | गटवार गावांची संख्या | |
| २.२ | निवडक गावांचे गट | |
| २.३ | गावांची निवड (५ टक्के) | |
| २.४ | ०१-१०० या गटांतील गावांची निवड | |
| २.५ | १०१-२०० या गटातील गावांची निवड | |
| २.६ | २०१-३०० या गटातील गावांची निवड | |
| २.७ | निवडक गटांतील गावांमधील दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या | |
| २.८ | तीन गटांतील १० टक्के कुटुंबांची निवड | |
| | **प्रकरण तिसरे** | **५७ ते ९३** |
| ३.१ | कुटुंबातील सदस्य संख्येचे विश्लेषण | |
| ३.२ | वयोमानानुसार वर्गीकरण | |
| ३.३ | स्त्री - पुरूष लिंगानुसार विश्लेषण | |
| ३.४ | कुटुंबातील सदस्यांचे साक्षर - निरक्षरतेचे प्रमाण | |
| ३.५ | कुटुंबातील सदस्यांचे शैक्षणिक स्थान | |
| ३.६ | प्रत्यक्षात शिक्षण चालू असलेल्या सदस्यांचे विश्लेषण | |

| | | |
|---|---|---|
| ३.७ | कुटुंबांचे मासिक उत्पन्नानुसार विश्लेषण | |
| ३.८ | कुटुंबांच्या उपजिवीकेच्या साधनांचे विश्लेषण | |
| ३.९ | मजुरीच्या कालावधीचे विश्लेषण | |
| ३.१० | कुटुंब राहत असलेल्या भागातील उपलब्ध कारखानदारी, मोठे व्यवसाय | |
| ३.११ | कुटुंब राहत असलेल्या भागातील कारखान्यातील उपलब्ध रोजगार | |
| ३.१२ | सरकारी रोजगार हमीच्या कामाचा लाभ घेणारी कुटुंब | |
| ३.१३ | शेती निगडीत व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे विश्लेषण | |
| ३.१४ | सरकारी नोकरी करणा-या कुटुंबांचे विश्लेषण | |
| ३.१५ | मजुरी करण्या-या पुरूषांचे विश्लेषण | |
| ३.१६ | मजुरी करणा-या स्त्रीयांचे प्रमाण | |
| ३.१७ | शेती क्षेत्रातील एका दिवसाची मजुरी मिळविणा-या पुरूषांचे प्रमाण | |
| ३.१८ | शेती क्षेत्रातील एक दिवसाची मजुरी मिळविणा-या स्त्रीयांचे प्रमाण | |
| ३.१९ | १०० कुटुंबांच्या मासिक सरासरी खर्चाचे विवरण | |
| ३.२० | कुटुंबाच्या उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण | |
| ३.२१ | कुटुंबांचा खर्च भागविण्यासाठीच्या तरतुदीचे विश्लेषण | |
| ३.२२ | कुटुंबांच्या मासिक बचतीचे विश्लेषण | |
| ३.२३ | कुटुंबांच्या मासिक बचतीचे प्रमाण | |

| | | |
|---|---|---|
| ३.२४ | उत्पन्नाच्या टप्प्यानुसार बचतीचे विश्लेषण | |
| ३.२५ | मासिक बचतीच्या ठिकाणाचे विश्लेषण | |
| ३.२६ | बॅंकेतील कुटुंबाच्या खात्या विषयीचे वर्गीकरण | |
| ३.२७ | बॅंक कर्ज घेणा-या कुटुंबांचे वर्गीकरण | |
| ३.२८ | सरकारी कर्ज माफी (२००७-२००८) योजनेच्या लाभाचे वर्गीकरण | |
| ३.२९ | कुटुंबांचे सावकारी कर्जाशी असणा-या संबंधाचे विश्लेषण | |
| ३.३० | कुटुंबांचे राहत्या घराच्या प्रकाराचे वर्गीकरण | |
| ३.३१ | राहत्या घराच्या प्रकारावरुन वर्गीकरण | |
| ३.३२ | स्वच्छतागृह असणा-या व नसणा-या कुटुंबांचे वर्गीकरण | |
| ३.३३ | कुटुंबाना वर्षभर मिळणा-या आहाराविषयीचे विश्लेषण | |
| ३.३४ | कुटुंबाकडील उपलब्ध असलेल्या वाहनांचे विश्लेषण | |
| ३.३५ | कुटुंबातील व्यक्तींच्या मोठया आजारा विषयीचे विश्लेषण | |
| ३.३६ | मोठया आजारावरील उपचारासंबंधी विश्लेषण | |
| ३.३७ | कुटुंबांचा गावातील राजकारणातील सहभाग | |
| ३.३८ | कुटुंबाकडे असणा-या शेतजमिनी विषयी विश्लेषण | |
| ३.३९ | शेतजमिनीच्या प्रकारांवरून कुटुंबांचे विश्लेषण | |
| ३.४० | कुटुंबांच्या बचत गटातील सहभागाविषयीचे विश्लेषण | |
| ३.४१ | बचत गटाकडून घेतलेल्या कर्जाचे विश्लेषण | |
| ३.४२ | बचत गटांतील कर्ज रक्कमेचे विश्लेषण | |

| | | |
|---|---|---|
| ३.४३ | बचत गटांतुन मिळणा-या कर्जावरील मासिक व्याज दराचे विश्लेषण | |
| ३.४४ | बचत गटांतील कर्जाच्या वापरांविषयीचे विश्लेषण | |
| ३.४५ | सरकारी योजनांचा लाभ मिळालेली कुटुंब | |
| ३.४६ | सरकारी योजनांच्या लाभाचे विश्लेषण | |

# प्रकरण - पहिले

# प्रस्तावना व विषयाची रूपरेषा

प्रस्तावना :

दुस–या महायुध्दानंतर जगातील अनेक देश स्वतंत्र झाले. नव्याने स्वतंत्र झालेल्या कांही देशांनी विकासासाठी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा मार्ग अंगिकारला, तर काहींनी समाजवादी समाजरचनेचा आणि कांही देशांनी संमिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग अंगिकारला. त्यानंतर जगाची विभागणी विकसीत आणि अविकसीत देश अशी झाली. काही विकसीत देशांमध्ये पुर्वीच भांडवलशाही अर्थव्यवस्था, संमिश्र अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था अस्तित्वात होत्या. समाजवादी समाज रचनेमध्ये वर्गविरहित समाजरचना, आर्थिक समानता आणि न्याय यांना प्राधान्य देण्यात आले होते . या देशात दारिद्रय, बेरोजगार, आर्थिक विषमता निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात आली. तर भांडवलशाही आणि संमिश्र अर्थव्यवस्थामध्ये साधनसामग्रीचा खाजगी मालकी हक्क मान्य केल्याने विकास प्रक्रियेत दारिद्रय, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता या समस्या निर्माण झाल्या. तशाच त्या अल्पविकसीत देशांमध्येही निर्माण झाल्या. परंतु या समस्यांची झळ जितकी अल्पविकसीत देशांना पोहोचत आहे तेवढी विकसीत देशांना पोहोचत नाही. थोडक्यात दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता या सर्वव्यापी समस्या आहेत.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आणि संमिश्र अर्थव्यवस्थेत मालमत्तेचा खाजगी मालकी हक्क मान्य केल्याने समाजातील काही लोकांना साधन सामग्रीच्या मालकी हक्कामुळे वेगवेगळया मार्गांनी अमाप उत्पन्न मिळते. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय उत्पन्नाचा जास्तीत जास्त हिस्सा मिळतो. तर ज्या बहुसंख्य लोकांकडे श्रमाशिवाय इतर कोणतीही मालमत्ता नसते. किंवा जी असते ती अत्यल्प असते. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय उत्पन्नाचा अत्यंत अल्प हिस्सा मिळतो. व त्यातुनच समाजामध्ये गरीब आणि श्रीमंत असे वर्ग निर्माण होतात. भौतिक शास्त्रातील गुरूत्वाकर्षण शक्तीच्या नियमाप्रमाणे श्रीमंताकडे संपत्तीचे केंद्रीकरण वाढत जाते.

## दारिद्रयाची संकल्पना :

दारिद्रयाची संकल्पना सर्वमान्य होईल अशा शब्दामध्ये शब्दबध्द करणे अत्यंत कठीण आहे. कारण देशपरत्वे, कालपरत्वे दारिद्रय या संकल्पनेचा अर्थ बदलतो. दारिद्रयाच्या आजपर्यंत ज्या व्याख्या करण्यात आल्या त्या सर्वांचा आधार 'किमान निर्वाह पातळी' किंवा 'चांगल्या जीवनमानाची' कल्पना हाच आहे. निर्वाह पातळीचा सापेक्ष किंवा निरपेक्ष दृष्टीकोनातुन विचार केला जातो. म्हणूनच दारिद्रय या संकल्पनेचा विचार करताना १. सापेक्ष दारिद्रय आणि २.निरपेक्ष दारिद्रय या संकल्पना विचारात घेणे गरजेचे असते.

### १. सापेक्ष दारिद्रय :

जेंव्हा दोन व्यक्ति किंवा दोन समुह किंवा दोन वस्तू किंवा दोन देश यांची तुलना करावयाची असते. तेव्हा सापेक्ष या शब्दाचा प्रयोग केला जातो. एकाच देशातील उच्च उत्पन्न आणि न्युन उत्पन्न असणा-या लोकांच्या उत्पन्नाची आणि उपभोगाची तुलना केली जाते तेव्हा सापेक्ष दारिद्रय या संकल्पनेचा वापर केला जातो.

सुबहसिंह यादव यांच्या मते, ''एकाच देशातील ५ टक्के ते १० टक्के अति उत्पन्न असणारा गट आणि ५ ते १० टक्के अति न्यून उत्पन्न असणारा गट या दोहोंच्या उत्पन्नाची, उपभोगाची आणि राहणीमानाची तुलना केल्यास न्यून उत्पन्न असणा-या गटाचा उपभोग आणि त्यांचे उत्पन्न खूप कमी असते. त्यामुळे त्यांच्या उपभोग आणि उत्पन्नात जे अंतर प्रतिबिंबीत होते, त्याला सापेक्ष दारिद्रय असे म्हणता येईल.''

वरील व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, उच्च उत्पन्न असणा-या गटाच्या तुलनेत न्यून उत्पन्न असणा-या गटाचे जीवनमान निकृष्ट असते. म्हणून त्यास दरिद्री मानले जाते. सापेक्ष दारिद्रयात उत्पन्न विभाजन हा निकष महत्वाचा मानला जातो. विकसीत देशांमध्ये सामान्य उपभोगात उच्च दर्जाच्या आहाराबरोबरच सुखद आणि चैनीच्या वस्तूंचाही समावेश केला जातो. श्रीमंताच्या तुलनेत गरीबांना चैनीच्या वस्तू उपभोगता येत नसतील तर त्यास दरिद्री मानण्यात येते.

सापेक्ष ही संकल्पना दोन देशांच्या संदर्भात वापरल्यास असे लक्षात येते की, विकसीत देशातील लोकांच्या तुलनेत विकसनशिल देशातील लोकांचे उत्पन्न आणि उपभोग कमी असतो.

म्हणूनच विकसनशील देशातील लोक तुलनात्मक दृष्टया दरिद्री मानले जातात. परंतु दोन देशांतील लोकांच्या उत्पन्नाची, उपभोगाची तुलना होऊ शकत नाही.

जागतिक मानवी विकास अहवालानुसार, 'विकसीत देशातील दरिद्री लोकांचे जेवढे दरडोई उत्पन्न असते ते अविकसीत देशातील श्रीमंत लोकांच्या उत्पन्नापेक्षाही जास्त असते' . अमेरिकेतील दरिद्री लोकांच्या उत्पन्नाची तुलना भारतातील श्रीमंत लोकांच्या उत्पन्नाशी केली तर भारतातील श्रीमंतही दरिद्री ठरतील. दोन देशातील लोकांच्या उत्पन्नाची व राहणीमानाची तुलना करणे जरी शक्य असले तरी ते व्यवहार्य ठरणार नाही. म्हणून जेंव्हा सापेक्ष दारिद्रयाचा विचार केला जातो तेंव्हा एकाच देशातील किंवा जवळपासच्या लोकांच्या उत्पन्नाची तुलना केली जाते.

## २. निरपेक्ष दारिद्रय :

निरपेक्ष दारिद्रयाचा संबंध किमान निर्वाह पातळीशी जोडला जातो. निरपेक्ष याचा अर्थ इतरांशी तुलना न करता असा होय. ज्या व्यक्तिस आपल्या प्राप्त उत्पन्नातुन किमान गरजा भागविणेही शक्य नसते. त्यास निरपेक्ष दरिद्री किंवा गरीब मानले जाते.

मनुष्यास आपले किमान जीवनमान जगण्यासाठी आणि वंशवेल चालू राहण्यासाठी अन्नधान्य, डाळी, दुध, भाजीपाला, कपडे इत्यादी वस्तूंची आवश्यकता असते. व्यक्तीला दररोज, साप्ताहिक किंवा मासिक जे उत्पन्न मिळते त्यातून वरील वस्तू किमान प्रमाणात खरेदी करणेही शक्य नसेल तर त्या व्यक्तिस दरिद्री मानण्यात येते.

'किमान निर्वाह पातळी' ही वादग्रस्त संकल्पना आहे. एखाद्या देशात किमान निर्वाह पातळीत जीवनावश्यक वस्तूंबरोबर सुखद आणि चैनीच्या वस्तूंचा समावेश केला जातो. अल्पविकसीत देशात अन्न, वस्त्र, निवारा ही किमान निर्वाह पातळी ठरू शकते. यातही किती अन्न, किती वस्त्र, किती निवारा म्हणजे निर्वाह पातळी हे ठरविणेही कठीण आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर जीवनमान जगण्याचा संबंध आहारातुन मिळणा-या कॅलरीजशी जोडला जातो. आहार तज्ञांच्या मते, देशातील हवामानाच्या भिन्नतेनुसार वेगवेगळया देशात किमान कॅलरीजची पातळी वेगवेगळी असते.

उदा. भारतीय उष्ण हवामानात एका व्यक्तिस जीवनमान जगण्यासाठी दररोज किमान २२५० कॅलरीजची गरज असते. यानुसार ज्या व्यक्तिला आपल्या मिळणा-या उत्पन्नातुन दररोज

२२५० कॅलरीज मिळवून देईल एवढया उपयोगी वस्तू खरेदी करणेही शक्य नसते त्यास दरिद्री मानले जाते.

कॅलरीज हा दारिद्रयाचा निकष मानुन किमान जेवढे कॅलरीज मिळविण्यासाठी किती उत्पन्नाची गरज आहे हे ठरविणे शक्य आहे, त्यावरून दारिद्रयरेषा निश्चित केली जाते.

## दारिद्रय रेषा :

निरपेक्ष दारिद्रयाची योग्य कल्पना येण्यासाठी दारिद्रयाची रेषा ही संकल्पना उपयुक्त ठरते. किमान जीवन जगण्यासाठी मूलभूत प्राथमिक वस्तु व सेवांचा उपभोग खर्चाची कमीत कमी पातळी ज्याने दाखविली जाते तिला 'दारिद्रय रेषा' म्हणतात.

किमान आवश्यक गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबींचा समावेश होतो. प्रत्येक देशाच्या प्रचलित आर्थिक व सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात या गरजांची किमान पातळी निश्चित केली जाते. ही पातळी दारिद्रय दर्शविते म्हणून तिला 'दारिद्रयाची पातळी' असे म्हटले जाते. दारिद्रय पातळीवरून देशातील दारिद्रयाची योग्य कल्पना येते. प्रत्येक देशाच्या किमान गरजा वेगवेगळया असतात. त्यापूर्ण करण्यास लागणारे उत्पन्नही वेगवेगळे असते, म्हणून दारिद्रय रेषेची कल्पना प्रत्येक देशात वेगवेगळी असते.

भारतात १९६२ साली केंद्रीय नियोजन मंडळाने नेमलेल्या अभ्यास गटाने प्रथम दारिद्रयासंबंधी अभ्यास केला व 'दारिद्रय रेषेची' संकल्पना मांडली. ज्या व्यक्तिचा मासिक उपभोग खर्च रूपये २० किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा व्यक्तिस दरिद्री समजावे असे निश्चित करण्यात आले होते. पी. के वर्धन (१९७३) व बी. एस. मिन्हास या अर्थतज्ञांचे दारिद्रयासंबंधीचे अभ्यास प्रसिध्द झाले. त्यानंतर १९७९ मध्ये प्रा. वि. म. दांडेकर व प्रा. निलकंठ रथ यांचा 'भारतातील दारिद्रय' हा अभ्यास प्रसिध्द झाला. त्यांनी ग्रामीण भागासाठी दरमहा दरडोई रूपये १५ व नागरी भागासाठी रूपये २२.५० निश्चित करून ही दारिद्रय रेषा ठरविली होती. या हिशेबाने त्यावेळी ग्रामीण भागातील ४० टक्के जनता व नागरी भागातील ५० टक्के जनता भारतात दारिद्रय रेषेखाली आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला. त्यानंतर या सर्वांचा परिणाम म्हणजे आज भारतीय अर्थशास्त्रात 'दारिद्रय व दारिद्रय रेषेची' संकल्पना रूढ झाली.

## २००२ मधील दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबांची गणना पध्दत :

ग्रामीण भागात राबविल्या जाणा-या दारिद्रय निर्मूलनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत दारिद्रय रेषेखाली नोंदणी झालेल्या कुटुंबांना शासनातर्फे केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अर्थसाहय्य देण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी तयार केली जाते. याचा मुख्य उद्‌देश दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना दारिद्रय निर्मूलनास्तव राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमांतून मदत करणे हा आहे. यापुर्वी ९ व्या पंचवार्षिक योजनेत अंमलबजावणी करीता दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची गणना १९९७ मध्ये घेण्यात आली होती. दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीस दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची गणना करण्यात आली. या गणनेत प्रत्येक कुटुंबाचा त्याच्या आर्थिक व सामाजिक निर्देशकातील तुलनात्मक न्युनता स्पष्ट करणा-या गुणांकावर आधारित दर्जा निश्चित केला गेला. ही संकल्पना यापूर्वीच्या उत्पन्नावर आधारित संकल्पनेपक्षा वेगळी होती .[२]

१० व्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक व सामाजिक निर्देशकांवर आधारित गुणांकावर कुटुंबाचा दर्जा निश्चित करण्याचे ठरविले होते. २००२-०३ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंब पाहणी गणनेत प्रत्येक कुटुंबाची सविस्तर माहिती मिळविण्यासाठी गणना पत्रके भरून घेतली गेली. कूटुंबाच्या अशा गणना पत्रकात कुटुंबातील व्यक्तिंची संख्या, शैक्षणिक दर्जा, अन्न सुरक्षा, स्वच्छता, मजुरीचा दर्जा, उपजिवीकेचे साधन, कर्जबाजारीपणा इत्यादी घटकांचा समावेश होता. या घटकांवरून प्रत्येक कुटुंबांचा आर्थिक व सामाजिक दर्जा दिसून येतो.

गणना पत्रकातील प्रत्येक घटकांसाठी गुण होते. २००२-०३ च्या गणना पत्रकेत एकूण १३ घटकांवरती प्रश्न होते. प्रत्येक प्रश्नांसाठी ०,१,२,३,४ यापैकी एक अंक गुण म्हणून दिला जात होता. १३ प्रश्नांसाठी जास्तीत जास्त ५२ गुण आहेत. ज्या कुटुंबाना ५२ पैकी कमीत कमी गुण असतील त्या कुटुंबाचे नाव दारिद्रय रेषेखालील यादीत सुरूवातीला आले होते. म्हणजेच कमी गुण मिळविणारी कुटुंब अधिक गरीब आहेत. असा त्याचा अर्थ घेतला जातो. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील यादीतील क्रमांकानुसारच शासनाच्या योजनांचा लाभ होतो. ज्या कुटुंबाना कमी गुण आहेत त्यांना अगोदर लाभ देण्याची तरतूद आहे. परंतु अलिकडील एक दोन वर्षात दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची सक्षम अधिका-याकडून पाहणी करून लाभार्थी निवडले जात आहेत. अशा कुटुंबाना कोणत्या गोष्टींची जास्त गरज आहे ते पाहूनच त्यांना तशा प्रकारचा लाभ मिळवून दिला जातो.[२]

## दारिद्र्याची वैशिष्टये :

१. दारिद्र्याची कारणे आणि परिणाम दारिद्र्यातच असतात.

२. दारिद्र्य आरंभापासून आतापर्यंत वर्तुळाकार क्रिया व प्रतिक्रिया करीत वाढत रहाते.

३. दारिद्र्य ही सतत चालणारी प्रक्रिया असून ती गुणात्मकरित्या वाढते.

४. दारिद्र्याची सुरूवात नकारात्मक घटकातून होते.

५. दारिद्र्य हे प्रभावित करणा-या घटकांना खालच्या पातळीवर ढकलते.

६. दारिद्र्यात भांडवलनिर्मिती कमी होते.

७. कमी बचत व कमी गुंतवणुक क्षमता त्यामुळे भांडवलनिर्मिती कमी राहते.

८. दारिद्र्यामुळे लोकांचे वास्तव उत्पन्न कमी पातळीचे राहते.

९. अपूर्ण भांडवल व भांडवलाची कमतरता हे दारिद्र्याचे एक कारण असते.

१०. दारिद्र्यातील व्यक्तिची क्रयशक्ती कमी असते.

## भारतातील दारिद्र्याचे अंदाज :

नियोजन आयोगाने स्विकारलेल्या पध्दतीने १९८९ मध्ये जागतिक बंकेने भारतातील दारिद्र्याचा अंदाज केला आहे. त्यांनी केलेल्या अंदाजानुसार दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १९७० ते १९८८ या काळात ५२.४ टक्के वरून ३९.६ टक्के इतके कमी झालेले आहे. याच काळात ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण ५३ टक्के वरून ४१.७ टक्के झाले होते. तर शहरी भागात हे प्रमाण ४५.५ टक्के वरून ३६.६ टक्के पर्यंत कमी झाले होते.

प्रा. डी. टी. लकडावाला (१९९३-९४) यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने केलेल्या अंदाजानुसार १९८७-८८ मध्ये दारिद्र्याचे प्रमाण ग्रामीण भागात एकूण लोकसंख्येच्या ३९.१ टक्के तर शहरी भागात ३८.२० टक्के एवढे होते.

भारत सरकारच्या आर्थिक पाहणी २००३-२००४ मध्ये २००७ मधील दारिद्र्याच्या बाबतीतील अंदाज दिला होता. त्यानुसार २००७ मध्ये भारतातील एकूण दारिद्र्य १९.३ टक्के आणि ग्रामीण भागात २१.१ टक्के व शहरी भागात १५.१ टक्के दारिद्र्य असण्याचा अंदाज मांडला होतो. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या अगदी अलीकडच्या म्हणजे ६१ व्या फेरीनुसार २००४-०५ मध्ये

भारतातील दारिद्र्याचे प्रमाण २७.८ टक्के असल्याचे भारताची आर्थिक पाहणी २००६-०७ मध्ये नमुद केले आहे.

## भारतातील वेगवेगळया तज्ञांनी व संघटनांनी केलेले दारिद्र्याचे अंदाज

### १. श्री. पी. डी. ओझा (१९६७ - ६८) :

श्री. पी. डी. ओझा यांनी दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या मोजताना सरासरी कॅलरीजचा आधार घेतला आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला दरदिवशी दरडोई २२५० कॅलरीज देणारा आहार मिळाला पाहिजे. १९६०-६१ च्या किंमतीनुसार यासाठी महिन्याला दरडोई रू. १५. १८ शहरी भागात आणि ग्रामीण भागात रू. ८.११ उपभोगावार खर्च झाले पाहिजेत. श्री. पी. डी. ओझांच्या अंदाजानुसार ग्रामीण विभागात ग्रामीण लोकसंख्येच्या ५१.८ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली राहात होती.तर शहरी भागात शहरी लोकसंख्येच्या ७.६ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली राहाते होती. एकूण लोकसंख्येपैकी ४४ टक्के लोकसंख्या दारिद्र्यात होती. सन १९६७-६८ मध्ये ओझांच्या अंदाजानुसार २८९ दशलक्ष म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील एकंदर लोकसंख्येच्या ७० टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जगत होती. यावरून ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्याचे प्रमाण ५१.८ टक्के वरून ७० टक्के पर्यत वाढलेले दिसते.[१]

### २. श्री. बी. एस. मिन्हास (१९६७ .१९६८) :

श्री. बी. एस. मिन्हास यांनी भारतातील प्रत्येक व्यक्तिस प्रत्येक वर्षी रूपये २४० इतका किमान उपभोग खर्च आवश्यक मानला. त्यानुसार श्री. बी. एस. मिन्हास यांच्या मते, १९५६-५७ मध्ये भारतातील ग्रामीण भागात ६५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. तर १९६०-६१ मध्ये भारतातील ग्रामीण भागात ५९.४ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. तसेच १९६७-६८ मध्ये भारतातील ग्रामीण भागात ५०.६ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते.[१]

### ३. बरधान (१९७३) :

बरधान यांनी दारिद्रया विषयी अभ्यास मांडताना फक्त ग्रामीण भागासाठीचा अंदाज व्यक्त केला आहे. १९६०-६१ मधील अभ्यासानुसार १३१.१ दशलक्ष लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती. म्हणजेच ग्रामीण भागात ग्रामीण लोकसंख्येच्या ३४.५ टक्के लोक दरिद्री होते. १९६४-६५ च्या आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, १७४.४ दशलक्ष ग्रामीण लोक दारिद्रयात होते, म्हणजेच ग्रामीण भागात ४४.५ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली होते. पुढे १९६७-६८ च्या अभ्यासानुसार ग्रामीण भागात २२०.५ दशलक्ष लोकसंख्या दारिद्रयात होती, म्हणजेच यावेळी ३३.० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखाली होती.

### ४. श्री. मोनटेक अहलुवालिया (१९७७) :

श्री. मोनटेक अहलुवालिया यांनी १९६०-६१ च्या किंमतीच्या आधारे भारतातील ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तिसाठी प्रतिवर्षी १८० रूपये इतका किमान उपभोग खर्च आवश्यक मानला तर शहरी भागासाठी २४० रूपये किमान उपभोग खर्च आवश्यक मानला. त्यामुळे मोनटेक अहलुवालिया यांच्या मते, ग्रामीण भागातील जे लोक वर्षाला उपभोगावर किमान १८० रूपये खर्च करू शकत नसतील ते दारिद्रय रेषेखाली आहेत." त्याचप्रमाणे त्यांच्या मते, "१९५६-५७ यावर्षी भारतातील ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी ५४.१ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती. तर १९६०-६१ मध्ये ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी ३८.९ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली रहात होती. १९६८-६९ मध्ये भारतातील ग्रामीण भागातील ५१ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली रहात होती. तर १९७३- ७४ मध्ये भारतातील ग्रामीण भागातील ४६.१ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली राहत होती."

### ५. सातवा वित्त आयोग (१९७८) :

सातव्या वित्त अयोगाने दारिद्रय रेषेची अधिक समावेशक कल्पना मांडली. राष्ट्रीय नमुना पाहणी फक्त कुटुंबाच्या उपभोग खर्चाचा विचार करते. पण सर्व समावेशक मोजमाप अचुक होण्यासाठी सार्वजनिक खर्चामुळे प्राप्त होणारे फायदे व तोटे खाजगी उपभोग खर्चामध्ये मिळविले पाहिजेत. दरडोई मासिक खाजगी उपभोग खर्चामध्ये प्रत्येक राज्य सरकारच्या दरडोई मासिक सार्वजनिक खर्चाचा समावेश केला जावा. १९७०-७१ मधील आरोग्य व कुटुंब नियोजन,

पाणीपुरवठा व स्वच्छता , शिक्षण, पोलीस, तुरूंग, कोर्ट यावरील प्रशासकीय खर्च, रस्ते, सामाजिक कल्याण यांवरील खर्चाचा समावेश केला जावा. या आधारावरून १९७०-७१ मध्ये २७७ दशलक्ष लोक दारिद्रय रेषेखाली जीवनमान कंठीत होते. यापैकी २२५ दशलक्ष लोक ग्रामीण क्षेत्रात व ५२ दशलक्ष लोक शहरी क्षेत्रात होते. साधारणत: त्यावेळीं भारतात ५२ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत होते.[१]

## ६. डॉ. वि. म. दांडेकर व डॉ. निलकंठ रथ (१९७९) :

सुप्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. वि. म. दांडेकर व डॉ. निलकंठ रथ यांनी असे प्रतिपादन केले की, "भारतातील प्रत्येक व्यक्तिला रोज २२५० कॅलरीज मिळाले पाहिजेत." त्यासाठी त्यांच्या मते, "१९६०-६१ च्या किंमतीनुसार भारतातील ग्रामीण भागातील प्रत्येकाचा प्रत्येक वर्षी किमान उपभोग खर्च १८० रूपये इतका आवश्यक आहे. तर शहरी भागात प्रत्येकाला प्रत्येक वर्षी २७० रूपये इतका किमान उपभोग खर्च आवश्यक आहे." भारतातील ग्रामीण व शहरी भागातील ज्यांचे उत्पन्न वरील किमान वार्षिक उपभोग खर्चापेक्षा कमी असेल ते लोक दारिद्रय रेषेखाली आहेत असा त्याचा अर्थ होतो. त्यानुसार या दोघांच्या मते "१९६०-६१ मध्ये भारतातील ४० टक्के ग्रामीण भागातील लोकसंख्या व ५० टक्के शहरी भागातील लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती." [१]

पुढे डॉ. वि. म. दांडेकर आणि डॉ. निलकंठ रथ यांनी १९६८-६९ मध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांची वेगळी आकडेवारी दिली. कारण १९६०-६१ ते १९६८-६९ पर्यत देशातील उपभोग खर्चात ४.८ टक्के वाढ झाली होती. त्यामुळे वि. म. दांडेकर व निलकंठ रथ यांनी १९६८-६९ च्या किंमतीनुसार भारतातील प्रत्येक व्यक्तिस २२५० कॅलरीज मिळविण्यासाठी ग्रामीण भागात प्रत्येक वर्षाला ३२४ रूपये इतका किमान उपभोग खर्च आवश्यक ठरविला. तर शहरी भागात प्रत्येकाला वर्षाला ४६८ रूपये इतका किमान उपभोगखर्च आवश्यक ठरविला. भारतातील ग्रामीण व शहरी भागातील जे लोक किमान एवढाही वार्षिक उपभोगखर्च करू शकत नसतील ते अर्थातच दारिद्रय रेषेखाली आहेत असा त्याचा अर्थ होतो. त्यानुसार वि. म. दांडेकर व निलकंठ रथ यांच्या मते, "भारतात १९६८-६९ मध्ये ग्रामीण भागातील ४० टक्के तर शहरी

भागातील ५० टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती. तसेच त्यानुसार १९८३-८४ मध्ये एकंदर देशात ४४.४ लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत होते."

### ७. जागतिक बॅंकेचा दारिद्रयाचा अंदाज (१९८९) :

जागतिक बॅंकेने भारतीय नियोजन मंडळाने दारिद्रयाचे मापन करण्यासाठी वापरलेल्या मानकांचा वापर करून भारतातील दारिद्रयाबाबतच अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार १९७३-७४ मध्ये दारिद्रय रेषा ठरविताना ग्रामीण भागात दरमहा दरडोई ४९.१ रूपये आणि शहरी भागात दरमहा दरडोई ५६.६ रूपये उत्पन्न हे किमान आवश्यक उत्पन्न मानले होते. परंतु नंतर राष्ट्रीय नमुना पाहणी मंडळाने आणि भारतीय सांख्यिकी संस्थेने विकसीत केलेली सुधारीत दारिद्रय रेषेची संकल्पना वापरली. त्यानुसार १९७७-७८ मधील चालू किंमतीनुसार ग्रामीण भागात दरमहा दरडोई ५५.२ रूपये आणि शहरी भागात ६८.६ रूपये उत्पन्न ही दारिद्रय रेषेची मर्यादा ठरविली. तर १९८३ मध्ये ग्रामीण भागात दरमहा दरडोई ८९.०० रूपये आणि शहरी भागात दरमहा दरडोई ११२.२ रूपये ही दारिद्रय रेषेची किमान मर्यादा निश्चित करण्यात आली. याशिवाय जागतिक बॅंकेने अति गरीब लोकांविषयी अंदाज व्यक्त केला आहे. जागतिक बॅंकेने दारिद्रय रेषेच्या उपभोग खर्चाच्या ७५ टक्के पेक्षा कमी खर्च असणा-या व्यक्तिला अति गरीब संबोधले आहे. त्यानुसार १९८८ मध्ये देशातील ३९.६ टक्के लोक दारिद्रयात होते तर १९.२ टक्के लोक अति गरीब होते.[१]

१९७० मध्ये शहरी भागात दारिद्रयात असणा-या लोकांचे प्रमाण ४५.५ टक्के होते ते १९८८ मध्ये ३३.६ टक्के झाले. १९७० मध्ये एकूण दारिद्रयातील लोकांचे प्रमाण ५२.४ टक्के वरून १९८८ मध्ये ३९.६ टक्के पर्यत कमी झाले. असे असले तरी एकूण लोकसंख्येत मोठी वाढ झाल्याने दारिद्रयातील लोकांची संख्या जास्तच राहीली. १९७० मध्ये शहरी भागात अति दारिद्रयातील लोकांचे प्रमाण २५.६ टक्के वरून १९८८ मध्ये १५.८५ टक्के पर्यत कमी झाले.[१]

भारतातील दारिद्रयाच्या प्रमाणाविषयी विविध तज्ञ, नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या तज्ञांचा गट व नियोजन मंडळ यांनी जो दारिद्रय रेषेखालील लोकांच्या आकडेवारीचा अंदाज वर्तविला आहे. त्यातील प्रत्येकाच्या आकडेवारीत तफावत आढळून येते. प्रत्येकाने भारतातील प्रत्येक व्यक्तिला आवश्यक उपभोग खर्चावरील मासिक किंवा वार्षिक किमान किती रक्कम

आवश्यक आहे त्याची आकडेवारी वेगवेगळी गृहित धरल्याने प्रत्येकाची दारिद्र्यरेषेखालील भारतातील लोकसंख्येची आकडेवारी वेगवेगळी आलेली आहे. तथापि १९६० ते १९९९-२००० या ४० वर्षात भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या घटली आहे. भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या गेल्या काही वर्षात घटली असली तरी अद्यापही भारतात दारिद्र्य रेषेखाली राहणा-या लोकांची संख्या बरीच मोठी आहे.

अलिकडील अंदाज :

भारत सरकारने नवव्या योजनेच्या सुरूवातीला प्रा. डी. टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ञांचा गट नेमला व या तज्ञांच्या गटाने भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या मोजण्याचे नविन निकष सुचविले आहेत, व ते भारत सरकारने मान्य ही केले आहेत. प्रा. डी. टी. लाकडावाला यांच्या गटाने १९९९-२००० मध्ये संपूर्ण भारतात २६.१ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असल्याचे स्पष्ट केले आहे. याचवेळी ग्रामीण भागात २७.१ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती तर शहरी भागात २३.६ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती असे स्पष्ट केले आहे.

नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशनच्या सर्वेक्षणाच्या ५५ व्या फेरीच्या (२००० मधील) निष्कर्षानुसार १९९९-२००० मध्ये भारतातील २६.१० टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती. याच संस्थेच्या सर्वेक्षणाच्या ६१ व्या फेरीतील निष्कर्षानुसार २००४-२००५ मधील स्थितीनुसार देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २१.८ टक्के पर्यंत खाली आले आहे. हे दोन्हीही अंदाज अगदी अलिकडील आणि अधिकृत स्वरूपाचे असून ते आपण विश्वासर्ह मानण्यास हरकत नाही.[३]

१९७४ ते १९९४ या कालावधीचा आणि नियोजन आयोगाच्या निष्कर्षाचा आपण विचार केला असता या कालावधीत दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १९७३-७४ मधील ५४.९ टक्के वरून १९९३-९४ मध्ये ३६ टक्के वर आले आहे. तरीही या संपूर्ण कालावधीत दरिद्र्य रेषेखालील प्रत्यक्ष लोकसंख्या मात्र ३२ कोटींच्या आसपासच होती. मात्र 'नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन' च्या ५५ व्या फेरीतील निष्कर्षानुसार १९९९-२००० मध्ये देशातील १०० कोटी लोकसंख्येच्या २६ टक्के म्हणजे २६ कोटी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा की, आतापर्यंत दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येची एकुण लोकसंख्येशी असलेली

टक्केवारी कमी होत असली तरी दारिद्रय रेषेखालील प्रत्यक्ष लोकसंख्या मात्र १९९९-२००० मध्ये पहिल्यांदाच कमी झाली आहे. दारिद्रय रेषेखालील या २६ कोटी लोकसंख्येमध्ये ग्रामीण भागातील १९.३ कोटी लोकसंख्येचा तर शहरी भागातील ६.७ कोटी लोकसंख्येचा समावेश होता. टक्केवारीचा विचार करता १९९९-२००० मध्ये ग्रामीण भागातील २७.१ टक्के तर शहरी भागातील २३.६ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती असे दिसून येते.

नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या २००४-०५ मधील म्हणजे ६१ व्या फेरीतील सर्वेक्षणानुसार २००४-०५मध्ये देशातील २७.५ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती असा निष्कर्ष काढण्यात आला. यावेळी देशाच्या ग्रामीण भागातील २९.३ टक्के लोकसंख्या व शहरी भागातील २५.७ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असल्याचे म्हटले आहे.[३]

नियोजन आयोगाने अकराव्या पंचवार्षिक योजनेचे दिशा- दिग्दर्शक करताना २००४-०५ मधील स्थितीनुसार देशातील २७.८ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अधिक ग्राहय व अधिकृत असलेल्या या अंदाजानुसार २००४-०५ मध्ये देशातील ३० कोटी लोक दारिद्रय रेषेखाली असल्याचे स्पष्ट होते. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या दिशा दिग्दर्शक अहवालानुसार भारतात दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे सर्वात कमी प्रमाण जम्मू-काश्मिर मध्ये (५.४ टक्के ) असून दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण ओरिसा राज्यात सर्वाधिक म्हणजे४६.४ टक्के इतके आहे. जम्मू काश्मीर, पंजाब, हिमाचल प्रदेश, गोवा आणि हरियाणा या राज्यामध्ये व दिल्ली या संघराज्य प्रदेशामध्ये दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १५ टक्क्याहून कमी आहे तर ओरिसा, बिहार, छत्तीसगड, उत्तरांचल, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये हे प्रमाण २५ टक्के ते ३० टक्के हून अधिक आहे .[३]

या अहवालानूसार महाराष्ट्रातील ३०.७ टक्के म्हणजे ३ कोटी १७ लाखांहून अधिक लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असल्याचे चित्र स्पष्ट होते. दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण राज्यात ग्रामीण भागात २९.६ टक्के तर शहरी भागात ३२.२ टक्के इतके आहे.

## भारतीय ग्रामीण दारिद्रय :

भारतातील दारिद्रयाच्या प्रमाणामध्ये ग्रामीण दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागातील दारिद्रयाची कारणे सामाजिक आणि राजकीय परीस्थितीत दिसुन येतात. आणि म्हणुनच दारीद्रयावर हल्ला करावयाचा असेल तर तो सामाजिक आणि आर्थिक बाजुने प्रामुख्याने ग्रामीण भागातच झाला पाहीजे.

ग्रामीण भागातील सरंजामशाही सदृश्य संबंध दारीद्रयास कारणीभुत ठरले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात करण्यात आलेल्या जमीन सुधारणा विषयक कायदयांची योग्य प्रकारे अमंलबजावणी न झाल्याने दारीद्रय वाढत राहीलेले दिसते. ब-याच वेळा वाढत जाणा-या लोकसंख्येशी दारीद्रयाचा संबंध जोडला जातो. वाढत जाणारी लोकसंख्या जमिनीवरचा भार वाढविते. परीणामत: दरडोई उत्पन्न घटते. मजुराची उत्पादन क्षमता घटल्यामुळे आणि किंमती वाढु लागल्यामुळे दारीद्रय वाढत गेलेले दिसते.[४]

ग्रामीण भागात दरडोई उत्पन्नात वाढ झाली तर दारीद्रय कमी होते. भारतात शेती उत्पादनात वाढ झाल्यास दारीद्रयाचे प्रमाण कमी होईल. श्री मोनटेक अहलुवालीया यांच्या मते, "१९५६-५७ ते १९७७-७८ या काळात शेती उत्पन्न फक्त २ % नी वाढले. ही वाढ ग्रामीण लोकसंख्यावाढी पेक्षा थोडीशीच जास्त होती. परिणामत: दरडोई निव्वळ देशांतर्गत शेती उत्पादनातील वाढ दारीद्रय कमी करण्यास पुरेशी नसते. भारताने शेती उत्पादन वाढीचा दर वाढवित असतानाच एकूण नियोजनाचे धोरण बदलले तर नक्कीच दारीद्रय निर्मूलन वेगाने होवू शकेल"

थोडक्यात ग्रामीण भागातील दारिद्रय दुर करण्यासाठी अथवा कमी करण्यासाठी केवळ शेती उत्पादनातील वाढ पुरेशी ठरणार नाही. शेती उत्पादन वाढीबरोबर संस्थात्मक बदल आवश्यक आहेत.

## दारिद्रयाच्या प्रमाणातील बदल :

भारतातील दारिद्रयाचे प्रमाण पाहून देश ख-या अर्थाने विकासाकडे वाटचाल करीत आहे का? याबाबत शंका निर्माण होते. परंतु खरी परिस्थिती ही तशीच आहे. २०२० पर्यंत संपूर्ण देशाचा सर्वांगिण विकास होईल हे स्वप्न पाहताना सध्याचे दारिद्रयाचे प्रमाण ही तितकेच मोठे

आहे. तसे पाहिले तर दारिद्रय हे फक्त भारताच्याच वाटयाला आले आहे असे मुळीच नाही. दारिद्रय हे सा-या जगाला आव्हान आहे. जगाची लोकसंख्या सुमारे ६०० कोटी असून त्यापैकी २०० कोटी लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. भारतात मात्र हे प्रमाण अधिक असून वाढतही आहे. त्यामुळे भारतातील दारिद्रयाची व्याप्ती आणि तीव्रता निश्चितच चिंताजनक ठरते.[५]

भारतात अद्याप दारिद्रय रेषेखालील जीवन कंठणा-यांचे प्रमाण २५ टक्के पर्यंत असून त्यात नव्याने गरीब होणा-यांचीच भर पडत आहे. दारिद्रयातील लोकांचा अन्नधान्याचा दरडोई उपभोग बराच घटला आहे.

देशात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू होवून १८-१९ वर्षांचा कालखंड लोटला तरीही दारिद्रयाचा प्रश्न अद्याप भेडसावत आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितीबद्दल बोलायचे, तर देशातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या २००४-०५ च्या अहवालानुसार २५ टक्के होते.

दारिद्रय निर्मूलनाचे उद्दीष्ट प्राप्त करण्याच्या बाबतीत जगातील कित्येक विकसनशील अर्थव्यवस्था मंदावलेल्या, सुस्तावलेल्या दिसतात. विशेषत: भारतात गेली सुमारे पंचवीस वर्ष 'गरीबी हटाओ' चा इतका गाजावाजा केला जावूनही प्रत्यक्षात या बाबतीत आपण फारसे काहीच साधले नाही. त्यातही ग्रामीण भागात तर परिस्थिती अधिकच चिंताजनक आहे.[५]

भारतातील विविध राज्यांचा विचार करता बिहार, महाराष्ट्र, ओरिसा, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, आसाम इत्यादी राज्यात दारिद्रय रेषेखालील लोकांचे २५ ते ५० टक्के पर्यंत प्रमाण आहे. हरियाणा, पंजाब इत्यादी निवडक राज्यात दारिद्रयाचे प्रमाण थोडे कमी आहे. तरीही पूर्ण देशाचा विचार करता संपूर्ण भारत देशात आजही २५ टक्के पर्यत दारिद्रय असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयाचा विचार करता १९८१-८२ मध्ये ३०.५९ टक्के कुटुंब दारिद्रय रेषेखालील होती. पुढे १९९१-९२ मध्ये हे प्रमाण वाढून ३८.०२ टक्के इतके झाले. १९९७-९८ मध्ये मात्र दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्रमाणात घट होवून ते २६.९० टक्के इतके झाले. परंतु दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या गणनेत म्हणजे २००२-०३ मध्ये दारिद्रय रेषे खालील कुटुंबाचे प्रमाण पुन्हा वाढून ते २९.३० टक्के इतके झाले. अभ्यासासाठी निवडलेल्या माळशिरस तालुक्यातील १९८१-८२ मध्ये एकूण कुटुंबाच्या ४६.१५ टक्के कुटुंब दारिद्रय

रेषेखाली होती. १९९१-९२ मध्ये ३१.६० टक्के व १९९७-९८ मध्ये ३२.७८ टक्के इतकी कुटुंब दारिद्रय रेषेखाली होती. २००२-०३ च्या सर्वेक्षण पाहणीनुसार एकूण कुटुंबापैकी ३२.१५ टक्के कुटुंब दारिद्रय रेषेखाली होती. म्हणजेच माळशिरस तालुक्यात आणखीही दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याचे दिसत आहे.

## दारिद्रय निर्मूलन योजना :

भारतात लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता या उद्दिष्टांबरोबरच देशाची वाटचाल चालू असून लोकशाहीद्वारे निर्माण झालेले मध्यवर्ती शासन नियोजनाद्वारे पंचवार्षिक योजना आखून देशाच्या सर्वागीण विकासाचा कार्यक्रम राबवित आहे. गेल्या ५० -६० वर्षात निरनिराळया क्षेत्रात विकासाचे उद्दीष्टे ठरवून भारत सरकारने लक्षणीय प्रगती साधली आहे. तरीही विकासाचा केंद्रबिंदू जो सामान्य मनुष्य आहे त्याला त्याचा म्हणावा तसा फायदा झालेला दिसून येत नाही  नियोजनाच्या माध्यमातून औद्योगिक व काहीशी शेती प्रगती साधली असली तरी वाढते दारिद्रय, बेकारी या समस्या आजही नियोजनात मुख्य अडथळा बनल्या आहेत. यादृष्टीने शासनाने धाडसी निर्णय घेवून दारिद्रय निर्मूलन करण्याच्या काही योजना आखणे आवश्यक असते. फक्त शेती व्यवसायाचा व खेडयांचा विकास होवून दारिद्रय दूर होणार नाही. तर जे फार दारिद्रयात जीवन जगत आहेत त्यांच्यासाठी वेगळया खास उपाययोजना करणे गरजेचे आहे.[४]

ग्रामीण भागातच वाढत्या रोजगाराच्या संधी देवून त्यांच्या उत्पन्नात व उत्पादनात वाढ केली तरच देशाच्या दारिद्रयाच्या व बेकारीच्या समस्या सुटू शकतील व ख-या अर्थाने दारिद्रयाचा अंधकार नाहीसा होवून त्यांना स्वातंत्र्य सुर्याचे दर्शन होईल. अकराव्या पंचवार्षिक (२००७-२०१२) योजनेचे ध्येयच मुळी दारिद्रयरेषेखालील लोकांना त्यांची बेकारी हटवून दारिद्रय रेषेच्यावर आणणे हे आहे.

### १. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम

भारतात आर्थिक विकास होत असला तरी देशातील दारिद्रय आणि बेकारी आणखीही कमी झाली नाही. त्यामुळे देशातील दारिद्रय दूर करण्यासाठी जोरदार प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी २ ऑक्टोबर १९६० मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू

करण्यात आला. ग्रामीण भागात रोजगार वाढविणे, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना लाभ मिळवून देणे, दारिद्रयाचे निर्मूलन करणे इ. उद्दीष्टये या विकास कार्यक्रमात होती.

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम २ ऑक्टोंबर १९८० मध्ये देशातील ५०११ गट विभागात सुरू करण्यात आला. १९८०-८५ या काळात प्रत्येक गट विभागातील ६०० कुटुंबाना लाभार्थी म्हणून लक्ष्य करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात १६.५६ दशलक्ष लोकांना लाभ दिला गेला. या एकूण लाभार्थ्यापैकी ३९ टक्के लाभार्थी मागासवर्गीय होते. सहाव्या योजनेत १५०० कोटी रूपयांची प्रत्यक्षात तरतुद केली होती. परंतु प्रत्यक्षात १९६१ कोटी रूपये खर्च करण्यात आले. तसेच ३००० कोटी कर्जपुरवठयाचे उद्दीष्ट होते. परंतु प्रत्यक्षात ३१०२ कोटी रूपयांचा जादा कर्ज पुरवठा करण्यात आला.

सातव्या योजनेच्या काळात १८.२ दशलक्ष कुटुंबाना ३३१६ कोटी रूपये अर्थसाहय देण्यासाठी खर्च करण्यात आले. तसेच त्यांना ५३७२ कोटी रू. इतक्या रक्कमेचा कर्जपुरवठा ही केला गेला. १८.२ दशलक्ष लाभार्थ्यापैकी ४५ टक्के लाभार्थी मागासवर्गीय होते. १९९१-१९९७ या काळात १६.२ दशलक्ष कुटुंबासाठी ६४५७ कोटी रूपये खर्च करण्यात आले.

## २. किमान गरजा कार्यक्रम :

गरीबी हटाव आणि न्यायासह वृध्दी साध्य करण्याच्या दृष्टीने पाचव्या योजनेच्या काळात किमान गरजा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात दारिद्रय रेषेखालील लोकांच्या उपभोग पातळीत सुधारणा करणे, आणि ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील कामगारांची उत्पादक कार्यक्षमता वाढविणे, यासाठी सार्वजनिक संस्थामार्फत मोफत व अर्थसाहयीत सेवा पुरविण्यावर भर देण्यात आला. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, विद्युतीकरण, भूमिहीन श्रमिकांना गृहनिर्माण सुविधा हे या कार्यक्रमातील मूलभूत घटक होते. या कार्यक्रमासाठी पाचव्या योजनेच्या काळात २६०७ कोटी रूपये खर्च करण्याचे लक्ष्य होते. परंतु प्रत्यक्षात मात्र १०३८ कोटी रूपये इतके कमी खर्च केले गेले.

### ३. वीस कलमी आर्थिक कार्यक्रम :

पहिला वीस कलमी कार्यक्रम १९७५ मध्ये व दुसरा वीस कलमी आर्थिक कार्यक्रम १९८२ मध्ये जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमाची आखणी ग्रामीण लोकांच्या राहणीमानाच्या स्थितीत सुधारणा करण्याच्या हेतुने करण्यात आली होती. या वीस कलमी कार्यक्रमाची २० ऑगस्ट १९८६ मध्ये  पुनर्रचना करण्यात आली. यामागे दारिद्रय निर्मूलन व पूर्ण रोजगार साध्य करणे हे ध्येय होते. पुनर्रचित कार्यक्रमात दारिद्रय निर्मूलन, उत्पादकता वाढ, उत्पन्नातील विषमता कमी करणे, सामाजिक व आर्थिक असमानता कमी करणे, जीवनमानाचा दर्जा सुधारणे यांवर भर देण्यात आला.

### ४. इंदिरा आवास योजना :

ग्रामीण भागातील गरीब लोकांची घर बांधणीची गरज भागविण्यासाठी मे १९८५ मध्ये जवाहर रोजगार योजनेची एक उपयोजना म्हणून इंदिरा आवास योजना सुरू करण्यात आली. १ जानेवारी १९९६ पासून एक स्वतंत्र योजना म्हणून तिची अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखाली असणा-या आर्थिक दुर्बल कुटुंबांना घरकुल मिळत आहे.

अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांसाठी घरे बांधण्यासाठी एकूण योजनेच्या किमान ६० टक्के निधी वापरला जातो. इंदिरा आवास योजनेखालील लाभाधारकांची निवड ग्रामसभा करते. सध्या या योजनेखाली सपाट भागात घरबांधणीसाठी ४३०००/- रूपये प्रत्येक कुटुंबाला अर्थसाहय म्हणून दिले जातात. तसेच कच्चे घर दुरूस्तीसाठी आर्थिक साहय करण्यास १९९९-२००० पासून सुरूवात करण्यात आली आहे. या योजनेखाली १९८५ -८६ ते २००३-०४ या काळात जवळ जवळ १०१.३१ लाख घरे बाधण्यात आली आणि त्यासाठी १७४२४.४७ कोटी रूपये खर्च करण्यात आले. डिसेंबर २००६ पर्यंत एकूण २९,२४६.२७ कोटी रूपये खर्च करण्यात आले असून १५३ लाख घरे बांधण्यात आली आहेत.

### ५. पतसह अर्थसहाय्य योजना :

ग्रामीण गृहनिर्माणासाठी पतसह अर्थसहाय्य योजना १ एप्रिल १९९९ रोजी सुरू करण्यात आली. ही योजना ३२,००० रूपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबासाठी आहे. या

योजनेखाली कमाल ४०,००० रूपयांचे कर्ज दिले जाते. परंतु अर्थसहाय्य मात्र १०,००० रूपयांपर्यंत मर्यादित आहे. केंद्र व राज्य मिळून ७५:२५ या प्रमाणत अर्थसहाय्याचा वाटा उचलतात. १ जून २००४ पर्यत ११३.९६ लाख घरे बांधण्यात आली. २००३-०४ मध्ये १४.८४ लाख घरे बांधणे किंवा सुधारणेचे लक्ष्य होते. परंतु प्रत्याक्षात १२.५४ लाख घरे बांधण्यात आली.

६. अंत्योदय अन्न योजना :

डिसेंबर २००० मध्ये अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली. दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी गरिबात गरिब अशा १ कोटी कुटुंबांचा या योजनेत समावेश केलेला आहे. या योजनेखाली प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रूपये किलो, आणि तांदूळ ३ रूपये किलो अशा दराने २५ कि. ग्रॅ. अन्नधान्य पुरविले जाते. एप्रिल २००२ मध्ये  हे परिणाम २५ कि. ग्रॅ. वरून ३५ कि. ग्रॅ पर्यत वाढविण्यात आले आहे. जून २००३ मध्ये दारिद्रयरेषेखालील आणखी ५० लाख कुटुंबांचा समावेश करून या योजनेचा विस्तार करण्यात आला. २००२-०३ मध्ये वाटणी केलेल्या ४१.२७ लाख टन अन्नधान्यापैकी ३५.३९ लाख टन अन्नधान्य आणि २००३-०४ मध्ये ४५. ५६ लाख टनापैकी ३८.२४ लाख टन अन्नधान्य राज्य सरकारने पुरविले.

७. जवाहर रोजगार योजना :

दारिद्रयनिर्मूलन, रोजगारनिर्मिती व तळागाळातील जनतेचा प्रशासनात प्रत्यक्ष सहभाग किंवा सहभागी लोकशाही या संकल्पना साकार करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक पाऊल म्हणून या योजनेचे महत्व आहे. दारिद्रयनिर्मूलन व रोजगारनिर्मिती या महत्वाच्या बाबींना राष्ट्रीय पातळीवर देण्यात आलेले प्राधान्य, ग्रामपंचायतींना देण्यात आलेले अधिकार व ग्रामपंचायतींवर टाकण्यात आलेली जबाबदारी अशा पध्दतीची ही योजना १ एप्रिल १९८९ पासून देशात राबविली जात होती. परंतु ही योजना एप्रिल १९९९ पासून अधिक व्यापक अशा  'जवाहर ग्रामसमृध्दी योजनेत' परावर्तित करण्यात आली. सध्या 'जवाहर ग्रामसमृध्दी योजना' ही नव्या आणि अधिक व्यापक अशा 'संपूर्ण ग्रामीण रोजगार' योजनेत विलीन करण्यात आली आहे.

## दारिद्रय निर्मूलन उपायांच्या मर्यादा :

भारतात आजही दारिद्रयाचे प्रमाण २० ते २५ टक्के आहे. ग्रामीण व शहरी दारिद्रयाचे प्रमाण जवळजवळ सारखेच आहे. त्यादृष्टीने भारत सरकारने दरिद्रय निर्मूलनासाठी अनेक उपाययोजना राबविल्या आहेत. परंतु एवढयाशा प्रयत्नानेही देशातील पूर्ण दारिद्रय संपुष्टात आले नाही. सरकारकडून दारिद्रय निर्मूलनासाठी जे प्रयत्न केले जात आहेत. ते अपुरे पडत आहेत. तथापि दारिद्रय निर्मूलनाच्या उपायांवर पुढील मर्यादा पडतात.

१. कुटुंब कल्याण, पौष्टिक आहार, सामाजिक सुरक्षितता, किमान गरजा कार्यक्रम इत्यादी गोष्टी दीर्घकालीन दारिद्रय निर्मूलनासाठी आवश्यक असतात. परंतु सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

२. सरकारी कार्यक्रमाने आजारी, अपंग, दुर्बल व्यक्तीकडे लक्ष दिले नाही. तसेच स्त्री वर्गाकडे लक्ष पुरविले नाही. त्यामुळे अशा व्यक्ति सामान्य आर्थिक कार्यक्रमात भाग घेवू शकत नाहीत.

३. उत्पन्न व रोजगाराभिमुख दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाने गरिबांच्या हाती अधिक उत्पन्न दिले. त्यांनी ते अन्नावर खर्च करावे अशी अपेक्षा होती. पण हे वाढते उत्पन्न अन्नावर खर्च केले जाईल की नाही याकडे लक्ष दिले गेले नाही. कारण वाढत्या किंमती, अन्नधान्याचा अपुरा पुरवठा, उत्पन्न वेळेवर न मिळणे यामुळे अन्नधान्याकडे हा खर्च वळला नाही.

४. शासकीय कार्यक्रमाने लहान शेतकरी, अधिक लोकसंख्येचा प्रदेश याकडे दुर्लक्ष केले. यासाठी एकत्रित ग्रामीण विकास कार्यक्रमाची पुनर्रचना केली पाहिजे.

५. सरकारी कार्यक्रमाने फक्त शारिरिक कार्यक्षमता वाढविण्याकडे लक्ष दिले. पण उत्पन्नाचा काही भाग इतर खर्चावर उदा. दारू, जुगार इत्यादी साठी खर्च होतो याकडे लक्ष दिले नाही. भारतातील अनेक अभ्यासकांनी असे दाखवून दिले आहे की, उत्पन्नाचा काही भाग व्यसनांवर खर्च होतो. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेने असे दाखवून दिले आहे की, एकत्रित ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या लाभार्थींपैकी ५१ टक्के लाभार्थी नेहमी व ३० टक्के लाभार्थी अनियमित दारूच्या आहारी आहेत.

६. गरीबांच्या कमी मिळकतीचे परिणाम आरोग्य, जोखिम, प्रदूषण यांवर काय होतील याकडे दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाने वारंवार दुर्लक्ष केले आहे.

### कोष्टक क्र. १.१

### भारतातील प्रमुख राज्यातील दारिद्रय (टक्केवारीत)

| अ.नं | राज्य | ग्रमीण | | शहरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९३ -९४ | २००४ -०५ | १९९३ -९४ | २००४ -०५ | १९९३ -९४ | २००४ -०५ |
| १ | आंध्रप्रदेश | १५.९ | ११.२ | ३८.३ | २८.० | २२.२ | १५.८ |
| २ | आसाम | ४५.० | २२.३ | ७.७ | ३.३ | ४०.९ | १९.७ |
| ३ | बिहार | ५८.२ | ४३.० | ३४.५ | २८.७ | ५५.० | ४१.१ |
| ४ | गुजरात | २२.२ | १९.१ | २७.९ | १३.० | २४.२ | १६.८ |
| ५ | हरियाणा | २८.० | १३.६ | १६.४ | १५.१ | २५.१ | १४.० |
| ६ | कर्नाटक | २९.९ | २०.८ | ४०.१ | ३२.६ | ३३.२ | २५.० |
| ७ | केरळ | २५.८ | १३.२ | २४.६ | २०.२ | २५.४ | १५.० |
| ८ | मध्यप्रदेश | ४०.६ | ३७.२ | ४८.४ | ४१.९ | ४२.५ | ३९.० |
| ९ | महाराष्ट्र | ३७.९ | २९.६ | ३५.२ | ३२.२ | ३६.९ | ३०.७ |
| १० | ओरीसा | ४९.७ | ४६.८ | ४१.६ | ४४.३ | ४८.६ | ४६.४ |
| ११ | पंजाब | १२.० | ९.१ | ११.४ | ७.१ | ११.८ | ८.४ |
| १२ | राजस्थान | २६.५ | १८.७ | ३०.५ | ३२.९ | २७.४ | २२.१ |
| १३ | तामीळनाडू | ३२.५ | २२.८ | ३९.८ | २२.२ | ३५.० | २२.५ |
| १४ | उत्तरप्रदेश | ४२.३ | ३३.७ | ३५.४ | ३१.० | ४०.९ | ३३.१ |
| १५ | पश्चिमबंगाल | ४०.८ | २८.६ | २२.४ | १४.८ | ३५.७ | २४.७ |
| | एकूण | ३७.३ | २८.३ | ३२.४ | २५.७ | ३६.० | २७.५ |

संदर्भ :- इंडिया डेव्हलपमेंट रिपोर्ट २००८ पान नं. ३५

कोष्टक क्र. १.१ मध्ये भारतातील प्रमुख राज्यातील ११९३-९४ व २००४-०५ मधील दारिद्रयाचे प्रमाण दर्शविले आहे. ग्रामीण भागात १९९३-९४ मध्ये ३७.३ टक्के लोक दारिद्रयात होते. त्यात २००४-२००५ मध्ये अल्पशी घट होवून ते प्रमाण २८.३ टक्के इतके झाले. तसेच शहरी भागातही १९९३-९४ मध्ये ३२.४ टक्के लोक दारिद्रयात होते ते प्रमाण २००४-२००५ मध्ये २५.७ इतके कमी झालेले दिसते आहे आणि एकूणच भारतात १९९३-९४ मध्ये ३६.००

टक्के लोक दारिद्रयात होते व पुढे २००४-२००५ या दहा वर्षात दारिद्रयात फक्त २७.५ टक्के पर्यंत अल्पशी घट झाली आहे.

थोडक्यात, भारत देशातील दारिद्रयाच्या प्रमाणात घट होत असलेली दिसत असली तरी आजही २०-२५ टक्के दारिद्रय असणेही देशाच्या दृष्टीने भयानक बाब आहे.

कोष्टक क्रं. १.२

ग्रामीण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचा मासिक दरडोई खर्च (२००४-०५)

(टक्केवारीत)

| अ.नं. | मासिक दरडोई खर्च (रूपये) | अन्नधान्य (टक्के) | इतर (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | ०-२३५ | ६८.४५ | ३१.५५ |
| २ | २३५-२७० | ६७.१६ | ३२.८४ |
| ३ | २७०-३२० | ६६.३५ | ३३.६५ |
| ४ | ३२०-३६५ | ६४.७८ | ३५.२२ |
| ५ | ३६५-४१० | ६३.९९ | ३६.०१ |
| ६ | ४१०-४५५ | ६२.९३ | ३७.०६ |
| ७ | ४५५-५१० | ६१.६१ | ३८.३९ |
| ८ | ५१०-५८० | ६०.११ | ३९.८८ |
| ९ | ५८०-६९० | ५८.०२ | ४१.९८ |
| १० | ६९०-८९० | ५३.९२ | ४६.०८ |
| ११ | ८९०-११५५ | ४९.८० | ५०.२० |
| | एकूण सरासरी खर्च | ५५.०५ | ४४.९५ |

संदर्भ - इकॉनॉमिक सर्व्हे २००७-०८ भारत सरकार पान नं. २४३

कोष्टक क्रं. १.२ मध्ये ग्रामीण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचा मासिक दरडोई खर्च दर्शविला आहे. २००४ -०५ मध्ये रूपये ३६५ पर्यंत मासिक दरडोई खर्च करणा-या व्यक्तिस अतिगरीब म्हटले जात होते. त्यावरून मासिक रूपये ३६५ एवढा खर्च करणा-या व्यक्ती त्यापैकी

साधारणत: ६५ टक्के अन्नधान्यावर व ३५ टक्के इतर वस्तूंवर खर्च करीत होते. तसेच मासिक रूपये ८९० खर्च करणा-या व्यक्ती अन्नधान्यावर ६० टक्के व इतर वस्तूंवर ४० टक्के खर्च करीत होते. त्याचबरोबर ज्या व्यक्ती मासिक एक हजाराच्या आसपास खर्च करतात ते यापैकी अन्नधान्य व इतर वस्तुवर जवळ जवळ सारख्याच प्रमाणात खर्च करीत होते. एकंदरीत सर्वांचा एकत्रित विचार करता दारिद्रय रेषेखालील लोक आपला मासिक खर्च अन्नधान्यावर ५५ टक्के व इतर वस्तुंवर ४५ टक्के खर्च करीत होते.

थोडक्यात, वरील कोष्टकांवरून असे स्पष्ट होते की, भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांना आपल्या उत्पन्नातुन प्रथमत: अन्नधान्यावर अधिक खर्च करावा लागतो. आणि उरलेल्या रक्कमेचा कापड, औषध, शिक्षण, इत्यादीवर नंतर खर्च करावा लागतो. म्हणजेच उत्पन्नातील जास्तीत जास्त हिस्सा लोकांना अन्नधान्यावरच नेहमी खर्च करावा लागतो. अशा लोकांच्या अन्नधान्या सारख्या प्राथमिक गरजा कधीच पूर्णपणे भागत नसल्याने मिळालेल्या उत्पन्नातून सुरूवातीला अन्नधान्यावरच खर्च करावा लागतो. अन्नधान्यावर बरीचशी रक्कम खर्च होत असल्याने राहणीमान सुधारण्यासाठी विशेष उत्पन्न शिल्लक राहत नाही. विशेषत: अन्नधान्याच्या वाढत्या किमतीमुळेही उत्पन्नातील बराचसा भाग खर्च होतो. त्यामुळे अशा लोकांचे उत्पन्न शिल्लक राहण्यासाठी शासनाने त्यांना कमी दरात किंवा मोफत अन्नधान्य पुरविणे आवश्यक आहे. जेणेकरून अन्नधान्यावरील खर्च कमी होवून इतर राहणीमान वाढविणा-या वस्तूंवर अधिक खर्च करता येईल.

## कोष्टक क्रं. १.३

## १९९३-९४ ते २००४-०५ मधील मासिक दरडोई खर्चातील वाढ (ग्रामीण)

| अ.नं. | टक्केवारीनुसार लोकसंख्येचे ग्रुप | ग्रामीण १९९३-९४ (रु.) | २००४-२००५ (रु.) | वार्षिक वाढीचा दर (टक्के) |
|---|---|---|---|---|
| १ | ० - १० टक्के | ११५.५ | १२९.५ | १.०५ |
| २ | १० - २० टक्के | १५३ | १६९ | ०.९१ |
| ३ | २० - ३० टक्के | १७८ | १९५ | ०.८३ |
| ४ | ३० - ४० टक्के | २०० | २२१ | ०.९१ |
| ५ | ४० - ५० टक्के | २२२ | २४६ | ०.९४ |
| ६ | ५० - ६० टक्के | २४९ | २७५ | ०.९१ |
| ७ | ६० - ७० टक्के | २८२ | ३१० | ०.८६ |
| ८ | ७० - ८० टक्के | ३२५ | ३५९ | ०.९१ |
| ९ | ८० - ९० टक्के | ३९८ | ४४२ | ०.९६ |
| १० | ९० - १०० टक्के | ६८६ | ८४३ | १.८६ |
| | एकूण | २८१ | ३१९ | १.१६ |

संदर्भ - इकॉनॉमिक सर्व्हे २००७-०८ भारत सरकार पान नं. २४३

कोष्टक क्रं. १.३ मध्ये १९९३-९४ ते २००४-०५ मधील मासिक दरडोई खर्चातील वाढ किंवा बदल दर्शविला आहे. लोकसंख्येच्या ग्रुप नुसार त्यांचा १९९३-९४ व २००४-०५ मधील मासिक दरडोई खर्च स्पष्ट केला आहे. ० टक्के ते १० टक्के या पहिल्या ग्रामीण भागातील ग्रुपचा मासिक दरडोई खर्च १९९३-९४ मध्ये ११५.५ रूपये होता. तो २००४-०५ मध्ये रूपये १२९.५ इतका वाढला आहे. म्हणजेच या ग्रुपचा ग्रामीण भागातील मासिक दरडोई खर्च १९९३-९४ ते २००४-०५ या काळात १.०५टक्के वार्षिक दराने वाढला आहे. त्याचप्रमाणे ९०-१०० टक्के या ग्रामीण लोकसंख्येच्या ग्रुपचा १९९३-९४ मध्ये मासिक दरडोई खर्च ६८६ रूपये होता व २००४-०५ मध्ये रूपये ८४३ इतका होता . म्हणजेच या ग्रुपचा १९९३-९४ ते

२००४-०५ या काळात मासिक दरडोई खर्चात १.८६ टक्के वार्षिक वाढ झाली आहे. एकंदरीत सर्व ग्रुपचा विचार करता ग्रामीण भागात मासिक दरडोई खर्च १९९३-९४ मध्ये २८१ रूपये होता. तो २००४-२००५ मध्ये रूपये ३१९ इतका वाढला आहे. म्हणजेच ग्रामीण भागात १९९३-९४ ते २००४-०५ पर्यत मासिक दरडोई खर्चात १.१६ टक्के वार्षिक दराने वाढ झाली होती.

१९९३-९४ ते २००४-०५ या दहा वर्षात ग्रामीण भागात मासिक दरडोई खर्चात अतिशय कमी वाढ झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे व इतरही गरीब लोकांचे अल्प उत्पन्न हे आहे. उत्पन्नातच विशेष वाढ होत नसल्याने खर्चातही वाढ करता येत नाही. खर्च रक्कम वाढलेली दिसत असली तरी वस्तुंची खरेदी मात्र तेवढीच आहे. कारण वस्तूंच्या किंमती अधिक वाढत असल्याने खर्च वाढतो. परंतु खरेदी वाढत नाही. थोडक्यात ग्रामीण जनतेच्या उत्पन्नात अतिशय कमीवेगाने वाढ होत असल्याने त्यांचा मासिक दरडोई खर्च ही विशेष प्रमाणात वाढू शकत नाही.

### कोष्टक क्र. १.४

### सोलापूर जिल्हा - दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे एकूण कुटुंबांशी प्रमाण

| वर्ष | एकूण कुटुंब | दारिद्रय रेषेखालील कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १९८१-८२ | ४६२९१० | १४१६२४ | ३०.५९ |
| १९९१-९२ | ४९७७५६ | १८९२६२ | ३८.०२ |
| १९९७-९८ | ४९९२०३ | १३४३२९ | २६.९० |
| २००२-०३ | ५७२३७५ | १६७७५७ | २९.३१ |

संदर्भ - सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

कोष्टक क्र. १.४ मध्ये सोलापूर जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची आकडेवारी दर्शविली आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या (१९८१-८२) काळात ४६२९१० एकूण कुटुंबांपैकी १४१६२४ एवढी दारिद्रय रेषेखालील (म्हणजे ३०.५९ टक्के कुटुंब ) दारिद्रय रेषेखालील होती.

१९९१-९२ मध्ये एकूण ४९७७५६ कुटुंबापैकी १८९२६२ कुटुंब (म्हणजे ३८.०२ टक्के कुटुंब) दारिद्रय रेषेखालील होती. १९८१-८२ ते १९९१-९२ या दहा वर्षाच्या काळात जिल्हायातील दरिद्रय रेषेखालील कुटुंबात वाढ झालेली दिसत आहे.

१९९७-९८ या दारिद्रय रेषेच्या गणनेनुसार एकूण ४९९२०३ कुटुंबापैकी १३४३२९ एवढी कुटुंब (म्हणजे २६.९० टक्के कुटुंब ) दारिद्रय रेषेखालील होती. दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या (२००२-०३) गणनेनुसार सोलापूर जिल्हयात एकूण ५७२३७५ कुटुंबापैकी १६७७५७ कुटुंब (म्हणजे २९.३१ टक्के कुटुंब ) दारिद्रय रेषेखालील होती.

थोडक्यात, सोलापूर जिल्हयाचा विचार करता जिल्हयात १९८१-८२ पासून २००२-०३ पर्यत दारिद्रयरेषेखालील कुटुंबांचे थोडेसे प्रमाण कमी झाले आहे.

## सोलापूर जिल्हा - प्रत्येक तालुक्यातील एकूण कुटुंबाशी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण

| अ. नं. | तालुका | एकुण कुटुंब | दा.रेषे. खालील कुटुंब | प्रमाण (टक्के) | एकुण कुटुंब | दा.रेषे. खालील कुटुंब | प्रमाण (टक्के) | एकुण कुटुंब | दा.रेषे. खालील कुटुंब | प्रमाण (टक्के) | एकुण कुटुंब | दा.रेषे. खालील कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अक्कलकोंट | ३८४५३ | १९१०९ | ४९.६९ | ४५५१६ | २३००९ | ५०.५५ | ४५८६५ | १४७५० | ३२.१५ | ५३७७३ | १७१२७ | ३१.८५ |
| २. | बार्शी | ५१४६८ | १९७३१ | ३८.३३ | ५७४६५ | २४८९५ | ४३.३२ | ५३०८६ | ९९७७० | १८.७९ | ५५३२२ | १७५६० | ३१.७९ |
| ३. | करमाळा | २८६६३ | १९९२४ | ४१.६० | ३४६८६ | १३५९१ | ३९.१८ | ४१९३० | १०७५० | २५.६३ | ५०७६२ | १३६५८ | २६.९० |
| ४. | माढा | ३६७८८ | ११४०१ | ३०.९९ | ४५४५९ | १६३७३ | ३६.०१ | ४२३७५ | ९२९८ | २१.९४ | ५२२८८ | १३१३४ | २५.११ |
| ५. | माळशिरस | ४८९२२ | २२५८० | ४६.१५ | ६२९४८ | १९८९५ | ३१.६० | ८५५०९ | २८०३३ | ३२.७८ | ९०२८१ | २९०९३ | ३२.१५ |
| ६. | मंगळवेढा | २०७९३ | ५७६८ | २४.७४ | ३६३१० | ११७२२ | ३२.२८ | ३३३४५ | ९१२६ | २७.३६ | ३६९६५ | ९१९१ | २४.८६ |
| ७. | मोहोळ | २८८९७ | ८६५५ | २९.९५ | ३८१४२ | १४३६६ | ३७.६६ | ४४३८२ | ११०३७ | २४.८६ | ५२०२१ | १४२७२ | २७.४३ |
| ८. | पंढरपूर | ४२२८१ | १३८६९ | ३२.८० | ५६४६१ | १९२३६ | ३४.०६ | ४७२१२ | १२६७८ | २६.८५ | ५७००४ | १५९८५ | २८.०४ |
| ९. | उ. सोलापूर | १०८८३४ | ६६९६ | ६.१५ | १३८६६३ | ५९८७ | ४.३१ | १६५९४ | ४७७० | २८.७४ | १६६२० | ५४.९३ | ३३.०५ |
| १०. | सांगोला | ३१६०८ | १४७५५ | ४६.६८ | ४०२५१ | २४४४४ | ६०.७२ | ४६०७६ | १०६९५ | २३.२१ | ६३१६३ | १७६२४ | २७.९० |
| ११. | द. सोलापूर | २६२०३ | ७१३६ | २७.२३ | ३२८८७ | १५७४४ | ४७.८७ | ४२८५९ | १३२१५ | ३३.८३ | ४४१७६ | १४५९० | ३३.०२ |
| | एकूण | ४६२९१० | १४१६२४ | ३०.५९ | ४९७७५६ | १८९२६२ | ३८.०२ | ४९९२०३ | १३४३२९ | २६.९० | ५७२३७५ | १६७७५७ | २९.३१ |

**संदर्भ - सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर**

कोष्टक क्र. १.५ मध्ये सोलापूर जिल्हयातील एकूण कुटुंबांशी दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे. सोलापूर जिल्हयात एकूण ११ तालुके आहेत. वरील कोष्टकात १९८१-८२, १९९१-९२, १९९७-९८, २००२-०३ यावर्षी दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे मोजमाप केले आहे. प्रत्येक तालुक्यातील एकूण कुटुंब विचारात घेवून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे किती प्रमाण आहे हे लक्षात येते. संपूर्ण सोलापूर जिल्हयाचा विचार करता १९८१-८२ या सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या गणनेनुसार एकूण ४६२९१० कुटुंबांपैकी १४१६२४ कुटुंब दारिद्रय रेषेखाली होती. म्हणजेच यावेळी जिल्हयात ३०.५९ टक्के कुटुंब दारिद्रय रेषेखाली होती. १९९१-९२ या आठव्या पंचवार्षिक योजना काळात ४९७७५६ एवढया एकूण कुटुंबापैकी १८९२६२ कुटुंब (म्हणजे ३८.०२ टक्के कुटुंब) दारिद्रय रेषेखाली होती. पुढे १९९७-९८ या नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळातील गणनेत जिल्हयातील एकूण ४९९२०३ कुटुंबापैकी १३४३२९ कुटुंब (म्हणजे २६.९० टक्के कुटुंब) दारिद्रय रेषेखाली होती. आठव्या व नवव्या पंचवार्षिक योजनेचा विचार करता नवव्या पंचवार्षिक योजने पर्यत जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्रमाणात १२ टक्के घट झालेली दिसत आहे. तसेच २००२-०३ च्या दहाव्या पंचवार्षिक योजना काळातील दारिद्रय रेषेच्या कुटुंबाच्या गणनेनुसार एकूण ५७२३७५ कुटुंबापैकी १६७७५७ कुटुंब (म्हणजे २९.३१ टक्के कुटुंब) दारिद्रय रेषेखाली होती. यावेळी मात्र नवव्या पंचवार्षिक योजनेपक्षा दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्रमाणात ३ टक्के वाढ झालेली दिसत आहे.

थोडक्यात, सोलापूर जिल्हयाचा सहाव्या पंचवार्षिक योजनेपासुन दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यतचा विचार केला तर जिल्हयात दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण ३२ टक्के पर्यत कायम राहिलेले दिसत आहे. ज्याप्रमाणे देशातील दारिद्रयाचे प्रमाणे आहे. तेवढयाच प्रमाणात सोलापूर जिल्हयातील दारिद्रय आहे.

## कोष्टक क्रं. १.६

## सोलापूर जिल्हा - शैक्षणिक स्थान दर्शवित असलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंब (२००२-०३) (टक्केवारीत)

| अ.नं. | तालुका | निरक्षर | ५वी पर्यंतचे शिक्षण | १० वी पास | पदवी | पदव्युत्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उ. सोलापूर | ६०.०३ | ३०.०९ | ८.९२ | ०.८७ | ०.०९ |
| २ | बार्शी | ५६.९३ | २९.८६ | ११.५२ | १.५५ | ०.१४ |
| ३ | अक्कलकोट | ६१.३२ | २७.१६ | १०.१७ | १.२८ | ०.०७ |
| ४ | द. सोलापूर | ७०.०९ | २१.३३ | ७.६४ | ०.९१ | ०.०३ |
| ५ | माहोळ | ६६.६५ | २४.६४ | ७.४२ | १.१५ | ०.१४ |
| ६ | मंगळवेढा | ६६.४१ | २४.७० | ७.७० | १.१२ | ०.०७ |
| ७ | पंढरपूर | ५९.०० | ३०.७३ | ८.८० | १.३० | ०.१७ |
| ८ | सांगोला | ५६.५१ | ३०.५८ | ११.०२ | १.७१ | ०.१८ |
| ९ | माळशिरस | ६६.२२ | २४.४९ | ८.०० | १.१३ | ०.१६ |
| १० | करमाळा | ५१.९९ | ३४.५५ | ११.६५ | १.६३ | ०.१८ |
| ११ | माढा | ५१.१७ | ३४.०६ | १३.०४ | १.५१ | ०.२२ |
| | एकूण | ६०.६५ | २८.२० | ९.६८ | १.३२ | ०.१५ |

संदर्भ : सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

कोष्टक क्र. १.६ मध्ये जिल्हयातील २००२-०३ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील सदस्यांचे शैक्षणिक स्थान दर्शविले आहे. यावेळी संपूर्ण सोलापूर जिल्हयात दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील ६०.६५ टक्के सदस्य निरक्षर आहेत. उत्तर सोलापूर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस या तालुक्यातील ६० टक्के पेक्षा जास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील सदस्य निरक्षर आहेत. ५ वी पर्यंतच्या शिक्षण घेतलेल्यांचा विचार करीता पूर्ण जिल्हयात २८.२० टक्के सदस्य होते. तसेच १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले संपूर्ण जिल्हयात फक्त

९.६८ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील सदस्य आहेत. याचाच अर्थ पाचवीनंतर पुढे निम्मेच सदस्य शिक्षण चालु ठेवत आहेत.

पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचा विचार करता फक्त १.३२ टक्के पदवीचे व ०.१५ टक्के इतके अल्प पदव्युत्तर शिक्षण घेतलेले सदस्य आहेत. म्हणजेच फक्त ५ वी किंवा जास्तीत जास्त १० वी पर्यंत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील सदस्यांनी शिक्षण घेतले आहे. परंतु त्यापुढील उच्च शिक्षण मात्र १ ते २ टक्के सदस्यच घेत आहेत. थोडक्यात, दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील निम्म्यापेक्षा जास्त सदस्य निरक्षर आहेत. आणि जे साक्षर आहेत त्यांचेही शिक्षण पाचवी व काही प्रमाणात दहावी पर्यंतचे झाले आहे. शिक्षणाचा अतिखर्च आणि कुटुंबांचे मोठे दारिद्रय याच प्रमुख कारणांमुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील सदस्यांना उच्च शिक्षण घेत येत नाही.

### कोष्टक क्र. १.७

### सोलापूर जिल्हा ५ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांची सद्यस्थिती दर्शविणारी दारिद्र्य रेषेखालील कुटुंब २००२-२००३ (टक्केवारीत)

| अ.नं. | तालुका | शाळेत नाही परंतु कामावर जातात | शाळेत व कामावरही जातात | शाळेत जातात कामावर नाही |
|---|---|---|---|---|
| १ | उ. सोलापूर | ४८.२८ | १५.३२ | ३६.४० |
| २ | बार्शी | ५२.०१ | १२.५८ | ३५.४१ |
| ३ | अक्कलकोट | ५२.५० | १३.१७ | ३४.३३ |
| ४ | द. सोलापूर | ४९.८७ | १०.३२ | ३९.८१ |
| ५ | माहोळ | ६१.३२ | १०.९४ | २७.७४ |
| ६ | मंगळवेढा | ४५.०१ | २०.९९ | ३४.०० |
| ७ | पंढरपूर | ४८.४६ | १७.०६ | ३४.४८ |
| ८ | संगोला | २३.८२ | ८.८४ | ६७.३४ |
| ९ | माळशिरस | ४९.९७ | ८.९७ | ४१.०६ |
| १० | करमाळा | ४३.१४ | १७.३६ | ३९.५० |
| ११ | माढा | ४०.८७ | १५.८० | ४३.३३ |
| | एकूण | ४६.८३ | १३.०३ | ४०.१४ |

संदर्भ - सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

कोष्टक क्र. १.७ मध्ये सोलापूर जिल्हयातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील ५ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या सद्य स्थितीबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. २००२-२००३ मध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करताना ५ ते १४ वर्षे वयोगटातील किती मुले शाळेत जातात, किती मुले कामावर जातात किंवा किती मुले शाळेत न जाता कामावर जातात यासंदर्भातील माहिती दर्शविलेली आहे. कोष्टकात दर्शविल्या प्रमाणे सोलापूर जिल्हयात दारिद्र्य रेषेखालील

कुटुंबातील ४६.८३ टक्के मुले शाळेत न जाता कामावर जातात हे स्पष्ट होते. कुटुंबाच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांना शाळेत जाता येत नाही.

तसेच १३.०३ टक्के मुले शाळेतही जातात व सुट्‌टीच्या दिवशी कामावरही जातात असे दिसून येते . तर ४०.१४ टक्के मुले कोणत्याही प्रकारच्या कामावर न जाता फक्त शाळेत जात असलेली दिसत आहेत. म्हणजेच सोलापूर जिल्हयातील दारिद्रय रेंषेखालील कुटुंबांतील जवळ जवळ निम्मी मुले शाळेत जात नसलेली स्पष्ट होते. शिवाय काही मुलांना घरच्या आर्थिक परिस्थितीच्या अडचणीमुळे शाळेबरोबरच कधी कधी कामावरही जावे लागते.

## कोष्टक क्र. १.८

## सोलापूर जिल्हा- अन्न सुरक्षितता मिळविणारी दारिद्रय रेषेखालील कुटुंब २००२-०३ (टक्केवारीत)

| अ. नं. | तालुका | वर्षातील अधिक कालावधीत प्रति दिन १ चौरस आहारापेक्षा कमी भोजन | सर्व साधारणपणे प्रति दिन १ चौ. आहार पंरतु काही वेळेस १ चौ. आहारा पेक्षा कमी भोजन | वर्षभर प्रतिदिन १ चौरस आहार भोजन | काही वेळेस कमतरता परंतु वर्षभर प्रतिदिनी २ चौ. आहार | वर्षभर पुरेसे अन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उ. सोलापूर | २१.७४ | ४१.७३ | १५.०९ | १०.८२ | १०.६२ |
| २ | बार्शी | १६.८८ | २७.६४ | २०.२८ | २२.३१ | १२.८९ |
| ३ | अक्कलकोट | १५.१५ | २४.८० | ३२.९९ | १६.१२ | ८.९४ |
| ४ | द. सोलापूर | १९.७० | ३२.०९ | १९.३६ | १८.६२ | ११.२३ |
| ५ | माहोळ | १९.०३ | २१.३८ | २१.६८ | १९.६८ | १८.२३ |
| ६ | मंगळवेढा | ९.६४ | १८.०३ | ३१.४४ | २८.३८ | १२.५१ |
| ७ | पंढरपूर | १३.२० | २८.७४ | १९.४८ | २३.६५ | १४.९३ |
| ८ | सांगोला | १२.०८ | २१.८८ | १९.७५ | २४.४८ | २१.८१ |
| ९ | माळशिरस | ३४.४४ | १५.३० | १५.८४ | १८.५० | १५.९२ |
| १० | करमाळा | १४.१४ | १७.८२ | २२.२९ | २९.५० | १६.२५ |
| ११ | माढा | ८.९६ | १३.२१ | २३.८७ | ३२.८८ | २१.०८ |
|  | एकूण | १८.२० | २२.४९ | २१.६१ | २२.४० | १५.३० |

संदर्भ - सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर

कोष्टक क्र १.८ मध्ये सोलापूर जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची अन्न सुरक्षितता स्पष्ट केली आहे. २००२-०३ च्या गणनेतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना वर्षभर कशाप्रकारे आहार मिळत आहे यासंदर्भात कोष्टकात स्पष्टीकरण दिले आहे. संपूर्ण सोलापूर जिल्हयाचा विचार करता १८.२० टक्के दारिद्रय रेषेखालील कुटूबांना वर्षातील अधिक कालावधीत प्रतिदिन १ चौरस आहारापेक्षा कमी भोजन मिळत आहे याठिकाणी माळशिरस तालुक्यात हे प्रमाण ३४.४४ टक्के इतके मोठे असल्याचे दिसते. सर्वसाधरणपणे प्रतिदिन १ चौरस आहार परंतु काहीवेळेस १ चौरस आहारापेक्षा कमी भोजन मिळणारी २२.४९ टक्के दारिद्रय रेंषखालील कुटूंब आहेत तसेच वर्षभर प्रतिदिन १ चौ. आहार भोजन मिळणारी २१.६१ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. तसेच काही वेळेस कमतरता परंतु वर्षभर प्रतिदिन २ चौ. आहार मिळणारी २२.४० टक्के दारिद्रय रेषेखालील कुटूंब आहेत. आणि वर्षभर पूरेसे अन्न मिळणारी फक्त १५.३० टक्के दा. रे. खा. कुटुंब सोलापुर जिल्हयात आहेत.

थोडक्यात, सोलापूर जिल्यातील २००२-०३ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या गणनेनुसार निम्म्यापेक्षा जास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना वर्षभर पूर्णपोटभर आहार मिळत नाही. त्यामुळेच अशा कुटुंबांना पुर्ण आहार मिळण्यासाठी सरकारकडुन आवश्यक त्याप्रमाणात अन्नधान्य पुरवठा करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्या चालु असलेली अंत्योदय योजना सर्वच दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला लागू करण्यात यावी.

## कोष्टक क्र. १.९

## सोलापूर जिल्हयातील मासिक सरासरी उत्पन्न मिळविणारी दारिद्रय रेषेखालील कुटुंब २००२ - २००३ (टक्केवारीत)

| अ.नं. | तालुका | इ. २५० पेक्षा कमी | इ. २५० ते ४९९ | इ. ५०० ते १४९९ | इ. १५०० ते २५०० | इ. २५०० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उ. सोलापूर | ९.०६ | २४.६० | ५५.०४ | ८.५६ | २.६५ |
| २ | बार्शी | २८.२० | ३९.७१ | २७.९५ | ३.२८ | ०.८६ |
| ३ | अक्कलकोट | २७.३४ | ४०.५६ | २८.१८ | ३.२३ | ०.६९ |
| ४ | द. सोलापूर | २०.९८ | ३८.३८ | ३७.५३ | २.८९ | ०.२२ |
| ५ | माहोळ | १२.३५ | ३७.४५ | ४६.५७ | २.९९ | ०.६४ |
| ६ | मंगळवेढा | १६.१७ | ४४.०६ | ३२.५६ | ६.६८ | ०.५३ |
| ७ | पंढरपूर | १३.९१ | ३५.३४ | ४२.१६ | ६.१७ | २.४२ |
| ८ | संगोला | २२.१७ | ३५.५३ | ३६.५६ | ४.७३ | १.०१ |
| ९ | माळशिरस | ८.४१ | २५.४१ | ५८.४७ | ६.३७ | १.३४ |
| १० | करमाळा | १०.६५ | २६.८९ | ४९.१३ | ११.०८ | २.२५ |
| ११ | माढा | २०.५७ | ३७.७६ | ३४.८८ | ५.९१ | ०.८८ |
| | एकूण | १७.४६ | ३४.७५ | ४१.१८ | ५.४४ | १.१७ |

संदर्भ :- सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

कोष्टक क्र. १.९ मध्ये सोलापूर जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न दर्शविले आहे. २००२-०३ च्या दारिद्रय रेषेखालील गणनेनुसार सरकारने मासिक सरासरी उत्पन्नाचे टप्पे पाडले होते. त्यामध्ये मासिक सरासरी उत्पन्न रूपये २०५ पेक्षा कमी, रूपये २५० ते ४९९, रूपये ५०० ते १४९९, रूपये १५०० ते २५०० व रूपये २५०० पेक्षा जास्त अशा प्रकारचे उत्पन्नाचे टप्पे पाडले आहेत.

कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे सोलापूर जिल्हयात मासिक सरासरी उत्पन्न रूपये २५० पेक्षा कमी असणारी १७.४६ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब होती. रूपये २५० ते ४९९ पर्यंत मासिक सरासरी उत्पन्न मिळविणारी ३४.७५ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब होती. ४१.१८ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब ही रूपये ५०० ते १४९९ एवढे मासिक सरासरी उत्पन्न मिळविणारी होती. तर रूपये १५०० ते २५०० पर्यंत मासिक सरासरी उत्पन्न मिळणारी फक्त ५.४४ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब होती. आणि फक्त १.१७ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब ही मासिक सरासरी उत्पन्न २५०० पेक्षा जास्त उत्पन्न मिळविणारी आहेत.

वरील कोष्टकांवरून असे स्पष्ट होते की, मासिक सरासरी रूपये १५०० पर्यत उत्पन्न मिळविणारी निम्म्यापेंक्षा अधिक दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. याचाच अर्थ इतके अल्प मासिक सरासरी उत्पन्न असल्यानेच अशा कुटुंबंची गणना दारिद्रय रेषेखालील कुटुंबात केली गेली आहे. एवढयाशा कमी उत्पन्नातुन कुटुंबांच्या प्राथमिक गरजाही व्यवस्थितरित्या भागत नसल्याने सरकारकडून त्यांना उत्पन्न मिळविणारी साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत. परंतु आजही ब–याच  कुटुंबाना सरकारी उत्पन्न मिळवून देणा–या योजनांचा कोणताही लाभ झाला नाही. त्यामुळेच अशी कुटुंब कित्येक वर्ष दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट असलेली दिसतात.

संदर्भ ग्रंथ :


**1.INDIAN ECONOMY, Ruddar Datt And K.P.M. Sundharam, S. CHAND And company Ltd. New Delhi. 2004. Page no. 358**

२. दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबांचे गणना पत्रक २००२ महाराष्ट्र शासन

३. वाणिज्य अर्थव्यवस्था घटक , के. सागर , के सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००८ पा.नं.४४

४. भारतीय अर्थव्यवस्थेची रचना व समस्या, प्रा. डॉ. आर.आगरकर, सेठ पब्लिकेशन्स  मुंबई, १९९१ पा.नं.९६

५. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल, प्रा. एस्. एस्. जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७ पा. नं. ७३.

# प्रकरण – दुसरे

# संशोधन पध्दती

## प्रस्तावना :

भारत हा खेडयांचा देश आहे. या देशातील ग्रामीण व शहरी दारिद्रयाचा प्रश्न अनेक वर्षापासुन भेडसावत आहे. विशेषत: ग्रामीण भागात मोठे दारिद्रय आहे . त्यामुळे दारिद्रयाचे निर्मूलन कसे करावयाचे हे देशापुढील मोठे आव्हान आहे. अन्न, वस्त्र, निवारा या किमान गरजा भागविण्यासाठीही लोकांना अडचणी येत आहेत. भारतात अन्न समस्या पूर्वीही होती व आजही आहे. सध्या ज्यांच्याजवळ खरेदी शक्ती आहे त्यांनाच पुरेशा प्रमाणात अन्न मिळत आहे पण देशातील कित्येक लोक अशे आहेत की त्यांना एकवेळही पुरेशे अन्न मिळत नाही . अशी वाईट परिस्थिती पालटण्यासाठीच आपल्याला ग्रामीण जनतेच्या विशेषत: दारिद्रय रेषेखालील लोकांच्या विकासावर अधिक भर देणे आवश्यक आहे. गरीब जनतेला दिलासा मिळण्यासाठी सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पोषक आहार, इत्यादी वरील खर्च वाढविणे जरूरीचे आहे. तसेच शेती, वनक्षेत्र, लघु उद्योग इत्यादी क्षेत्रात रोजगार वाढविणे आवश्यक आहे. [१]

ग्रामीण भागातील असंघटीत व आगतिक बहूसंख्य लोक कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांच्यावर आपला प्रभाव पाडू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण इत्यादी पासून वंचित राहावे लागते. म्हणूनच संशोधनाच्या अभ्यासात दारिद्रयातील आर्थिक समस्या व सामाजिक स्वरूपाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरले आहे.

## १.१ संशोधन समस्या :

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे चालु राहणीमान कशा पध्दतीचे आहे ते पाहणे. अशा कुटुंबांच्या आर्थिक हालाकीच्या परिस्थितीमुळेच त्यांचे जीवनमान, राहणीमान निकृष्ट प्रतिचे आहे. तेथील लोकांना आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य उत्पन्नाची साधने उपलब्ध नसल्यानेच तालुकयात दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळेच अशा दारिद्रय रेषेखालील कुटंबांना दारिद्रयातून बाहेर काढण्यासाठी जास्तीत जास्त सरकारी दारिद्रय निर्मूलन योजनांचा लाभ होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाकडून दारिद्रय दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न होत आहेत हे तपासून पाहणे आणि त्यावर काही उपाययोजना सांगणे हा अभ्यासाचा प्रमुख उद्देश आहे.

## १.२ संशोधन क्षेत्राची निवड :

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय कोप-यात वसलेला आहे. सोलापूर जिल्हयाचे भौगोलिक स्थान १७.१० अंश ते १८.३२ अंश उत्तर अंक्षास व ७४.४२ अंश ते ७६.१५ अंश पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४८८६ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८४ टक्के इतके आहे. जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी १.१५ टक्के शहरी क्षेत्र व ९८.८५ टक्के ग्रामीण क्षेत्रफळाचे आहे. सोलापूर जिल्हयात साधारणत: ६५० मी. मी. वार्षिक पाऊस पडतो.

सोलापूर जिल्हयात एकूण ११ तालुके असून ११४२ गावे आहेत. जिल्हयातील ११ पंचायत समित्या अंतर्गत १०२८ ग्रामपंचायती आहेत. सोलापूर जिल्हयाची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३८.५५ लाख एवढी आहे.

सोलापूर जिल्हयातील ११ तालुक्यापैकी माळशिरस हा एक प्रसिध्द तालुका आहे. तालुक्याचे ठिकाण जिल्हयाच्या पश्चिमेस आहे. माळशिरस तालुक्यात एकूण ११८ गांवे आहेत. तालुक्याचे भौगोलिक स्थान अक्षवृत्त १७° ३६' १८'' उत्तरेतर रेखावृत्त ७४° ४२' १३'' पूर्व असे आहे. माळशिरस तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १५९८ चौरस कि.मी. असून जिल्हयातील एकूण भूभागाच्या दृष्टीने तालुक्याचा पाचवा क्रमांक आहे. या तालुक्याची सन २००१ जनगणनेनुसार ३५०३४६ इतकी लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या बाबतीत माळशिरस तालुक्याचा जिल्हयात दुसरा क्रमांक आहे.

माळशिरस तालुका हा आवर्षण प्रवण क्षेत्र तालुका असल्याचे महाराष्ट्र शासनाने जाहीर केले आहे. माळशिरस तालुक्यात सहकार चळवळ मोठया प्रमाणात असल्याने सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध पुरवठा संस्था, सहकारी बॅंका, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी खरेदी - विक्री संस्था, सहकारी सुतगिरणी इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. सहकारी चळवळीचा फायदा अनेकांना झाला आहे बरीच गरीब कुटुंब सहकाराच्या माध्यमातुन प्रगत झाली आहेत परंतू सर्वच गरीबांना याचा लाभ झालेला नाही . माळशिरस तालुक्यात जशी सहकारी चळवळ मोठी आहे तशी दारिद्रयाची परिस्थिती ही मोठी आहे. सहकार चळवळ तालुक्यात मोठया प्रमाणात वाढली असली तरी दारिद्रयाचे प्रमाण मात्र फारसे कमी झाले नाही. त्यामुळे या माळशिरस तालुक्यातील दारिद्रयावरती अभ्यास करणे महत्वाचे वाटले आहे.

माळशिरस तालुक्यातील लोकसंख्येप्रमाणे दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्याही मोठी आहे. २००२-०३ मधील सर्वेक्षणानुसार तालुक्यातील एकूण ९०२८१ कुटुंबापैकी २९०९३ कुटुंब म्हणजेच ३२.१५ टक्के कुटुंब दारिद्रय रेषेखालील होती. म्हणून माळशिरस तालुक्याची अभ्यासासाठी निवड केलेली आहे. तालुक्यात एकूण ११८ गावे आहेत. अभ्यासासाठी गावांची निवड करताना ११८ गावांतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची आकडेवारी गोळा केली. त्यावरून ०१-१००, १०१-२००, २०१-३००, ३०१-४०० याप्रमाणे दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या असणा-या गावांचे गट पाडले आहेत.

कोष्टक क्र. २.१

गटवार गावांची संख्या

| अ.नं. | दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या गट | गटांतील गावांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १-१०० | २३ | १९.४९ |
| २ | १०१-२०० | ५० | ४२.३७ |
| ३ | २०१-३०० | २६ | २२.०३ |
| ४ | ३०१-४०० | ०५ | ४.२४ |
| ५ | ४०१-५०० | ०६ | ५.०८ |
| ६ | ५०१-६०० | ०० | ०.० |
| ७ | ६०१-७०० | ०१ | ०.८५ |
| ८ | ७०१-८०० | ०१ | ०.८५ |
| ९ | ८०१-९०० | ०० | ०.० |
| १० | ९०१-१००० | ०१ | ०.८५ |
| ११ | १००० च्या पुढील | ०५ | ४.२४ |
| | एकूण | ११८ गांवे | १००.०० |

कोष्टक क्र. २.१ मध्ये माळशिरस तालुक्यातील ११८ गावांतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे गट पाडले आहेत. ११८ गावांपैकी १-१००, १०१-२००, २०१-३०० या तीन गटांत ९९ गांवे आहेत. या सुरूवातीच्या तीन गटांतच जास्तीत जास्त दारिद्रय रेषखालील कुटुंबांचा समावेश आहे. “माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक अभ्यास” या अभ्यासासाठी कोटा पध्दतीचा वापर करून फक्त तीन गटांची निवड केली आहे. संशोधन समस्येचा अभ्यास विस्तृतपणे होण्यासाठी जास्तीत जास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणा-या गावांच्या गटांची निवड होणे आवश्यक होते. त्यामुळे ११८ गावांपैकी ०-१००, १०१-२००, २०१-३०० या तीन गटांत जास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंब असल्याने त्यांची निवड केली आहे. एकूण ११८ गावांपैकी या तीन गटात ९९ गावांचा ( म्हणजे ८३.९० टक्के गावांचा ) समावेश आहे.

## कोष्टक क्र. २.२

## निवडक गावांचे गट

| अ.नं. | दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या गट | निवड केलेल्या गटांतील गावांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | ०१-१०० | २३ | २३.२३ |
| २ | १०१-२०० | ५० | ५०.५१ |
| ३ | २०१-३०० | २६ | २६.२६ |
| | एकूण | ९९ | १००.०० |

कोष्टक क्रमांक २.२ मध्ये अभ्यासासाठीच्या निवडक गावांचे गट दर्शविले आहेत. वरील तीन गटात एकूण ९९ गांवे आहेत. त्यापैकी ०१-१०० या गटात २३ गावांचा (म्हणजे २३.२३ टक्के गावांचा) समावेश आहे. १०१-२०० या गटात ५० गावांचा (म्हणजे ५०.५१ टक्के गावांचा) समावेश आहे. तर २०१-३०० या तिस-या गटांत २६ गावांचा (म्हणजे २६.२६ टक्के गावांचा)समावेश आहे.

"माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक अभ्यास" या अभ्यासासाठी तालुक्यातील वरील ९९ गावांतून ५ टक्के गावांची अभ्यासासाठी निवड केली आहे. म्हणजेच वरील तीन गटांतुन प्रत्येकी ५ टक्के याप्रमाणे ७ गावांची (म्हणजे ७.०७ टक्के गावांची) अभ्यासासाठी निवड केली आहे.

कोष्टक क्र. २.३

गावांची निवड (५ टक्के)

| अ.नं. | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या गट | निवड केलेल्या गटांतील गावांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | ०१-१०० | ०२ | २८.५७ |
| २ | १०१-२०० | ०३ | ४२.८६ |
| ३ | २०१-३०० | ०२ | २८.५७ |
| | एकूण | ०७ | १००.०० |

कोष्टक क्र. २.३ मध्ये प्रत्यक्षातील अभ्यासासाठी निवडलेल्या गावांची संख्या दर्शविलेली आहेत. एकूण ९९ गावांपैकी प्रत्येक गटांतुन ५ टक्के गावांची निवड केली आहे. प्रत्येक गटातुन ५ टक्के याप्रमाणे १-१०० या गटांतुन २३ पैकी २ गावांची निवड, १०१-२०० या दुस-या गटातुन ५० पैकी ३ गावाची निवड, तर २०१-३०० या तिस-या गटांतुन २६ पैकी २ गावांची निवड केली आहे. म्हणजेच पहिल्या, दुस-या, तिस-या या गटांतुन अनुक्रमे २८.५७ टक्के, ४२.८६ टक्के, २८.५७ टक्के इतकी गावांची निवड केली आहे. थोडक्यात, तीन गटांतील ९९ गावांपैकी ५ टक्के याप्रमाणे ७ गावांची निवड केली आहे.

### कोष्टक क्र. २.४

### ०१-१०० या गटांतील गावांची निवड

| अ.नं. | गावांची निवड | दारिद्रय रेषेखालील कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | हनुमानवाडी | ६५ | ५६.०३ |
| २ | साळमुखवाडी | ५१ | ४३.९७ |
| | एकूण | ११६ | १००.०० |

कोष्टक क्र. २.४ मध्ये ०१-१०० या गटातील २ गावांची निवड दर्शविली आहे. ०१-१०० एवढी दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणारी २३ गावांपैकी अभ्यासासाठी दोन गावे निवडली आहेत. हनुमानवाडी व साळमुखवाडी या गावांची निवड तालुक्यातील त्यांच्या स्थानावरून केली आहे. म्हणजेच या गटातील एकूण ११६ दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी हनुमानवाडी गावात ६५ कुटुंब (म्हणजे ५६.०३ टक्के कुटुंब) व साळमुखवाडी गावांत ५१ कुटुंब (म्हणजे ४३.९७ टक्के कुटुंब) दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत.

### कोष्टक क्र. २.५

### १०१-२०० या गटातील गावांची निवड

| अ.नं. | गावांची निवड | दारिद्रय रेषेखालील कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | दसुर | ११० | २९.३३ |
| २ | विजयवाडी | ११२ | २९.८७ |
| ३ | पळसमंडळ | १५३ | ४०.८० |
| | एकूण | ३७५ | १००.०० |

कोष्टक क्रं. २.५ मध्ये १०१-२०० या गटातील ३ गावांची निवड दर्शविली आहे. १०१ ते २०० पर्यंत दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणारी ३ गांवे निवडली आहे. या गटात दसुर, विजयवाडी व पळसमंडळ या गावांची निवड केली आहे. तीन गावात दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या ३७५ इतकी आहे. त्यापैकी दसुर मध्ये ११० कुटुंब (म्हणजे २९.३३ टक्के

कुटुंब), विजयवाडी ११२ कुटुंब ( म्हणजे २९.८७ टक्के कुटुंब ) व पळसमंडळमध्ये १५३ कुटुंब ( म्हणजे ४०.८० टक्के कुटुंब ) दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. या तिन्ही गावांची निवड तालुक्यातील त्यांच्या दिशा स्थानावरून केली आहे.

### कोष्टक क्र. २.६

### २०१–३०० या गटातील गावांची निवड

| अ.नं. | गावांची निवड | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | फळवणी | २४४ | ४५.६९ |
| २ | धर्मपुरी | २९० | ५४.३१ |
| | एकूण | ५३४ | १००.०० |

कोष्टक २.६ मध्ये २०१–३०० या गटांतील गावांची निवड दर्शविली आहे. २०१–३०० या गटातुन फळवणी व धर्मपुरी या दोन गावांची निवड केली आहे. या गटांतील एकूण ५३४ दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी फळवणी या गावांत २४४ कुटुंब (म्हणजे ४५.६९ टक्के कुटुंब) व धर्मपुरी मध्ये २९० कुटुंब (म्हणजे ५४.३१ टक्के कुटुंब ) आहेत. फळवणी व धर्मपुरी या गावांची निवड त्यांच्या तालुक्यातील स्थानावरून केली आहे.

### कोष्टक क्र. २.७

### निवडक गटांतील गावांमधील दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या

| अ.नं. | निवडक गट | गांवे | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|
| १ | ०१–१०० | ०२ | ११६ | ११.३२ |
| २ | १०१–२०० | ०३ | ३७५ | ३६.५८ |
| ३ | २०१–३०० | ०२ | ५३४ | ५२.१० |
| | एकूण | ०७ | १०२५ | १००.०० |

कोष्टक क्र.  २.७ मध्ये निवडलेल्या ३ गटांतील जी ७ गांवे आहेत त्या गावांतील एकूण दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या व प्रमाण दर्शविले आहे. ७ गावांमध्ये एकूण १०२५ दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. त्यापैकी ०१-१०० या गटातील २ गावांत ११६ कुटुंब (म्हणजे ११.३२ टक्के कुटुंब )दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. १०१-२०० या गटातील ३ गावांत ३७५ कुटुंब ( म्हणजे ३६.५८ टक्के कुटुंब )दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. तर २०१-३०० या गटातील २ गावांमध्ये ५३४ कुटुंब ( म्हणजे ५२.१० टक्के कुटुंब ) आहेत.

निवड केलेल्या तीन गटांतील गावांमध्ये एकूण १०२५ दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. १०२५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबामधून १० टक्के कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

## कोष्टक क्र. २.८

## तीन गटांतील १० टक्के कुटुंबाची निवड

| अ.नं. | गट | दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या | १० टक्के प्रमाणे कुटुंबाची निवड |
|---|---|---|---|
| १ | ०१-१०० | ११६ | १० |
| २ | १०१-२०० | ३७५ | ४० |
| ३ | २०१-३०० | ५३४ | ५० |
| | एकूण | १०२५ | १०० |

कोष्टक क्र. २.८  मध्ये ०१-१००, १०१-२००, २०१-३००, या तीन गटातील १०२५ कुटुंबांमधून अभ्यासासाठी १००  कुटुंबांची निवड १० टक्के प्रमाणे केली आहे. त्यामध्ये १-१०० या गटातील ११६ दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी १० कुटुंबाची, १०१-२०० या गटातील ३७५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी ४० कुटुंबाची, तर २०१-३०० या गटातील ५३४ दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी ५० कुटुंबाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

थोडक्यात, माळशिरस तालुक्यातील एकूण ११८ गावांमध्ये २८०९३ दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. या ११८ गावांमधुन जास्तीजास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणा-या तीन गटांची निवड केली आहे. तीन गटांतील ९९ गावांमधून ५ टक्के प्रमाणे ७ गावांची निवड केली आहे. व ७ गावांतील १०२५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबामधून १० टक्के प्रमाणे १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

## १.३. संशोधनाचे महत्व :

भारतातील दारिद्रयाचे उच्चाटन हे ध्येय प्राप्त करण्यासाठी अंदाजे सुमारे २० ते २५वर्षांचा कालावधी लागेल. या देशातील दारिद्रयाचा प्रश्न हा काही नव्याने निर्माण झालेला प्रश्न नव्हे. अगदी इंग्रजी राजवटी पुर्वीही दारिद्रयाची समस्या होतीच. भारताच्या पुर्वीच्या इतिहासापासून या समस्याचा निर्देश आढळत असला तरी याकडे गांभीर्याने पाहिले जाऊ लागले ते अलीकडील काही काळात. इ.स. १९७१ मध्ये दादाभाई नौरोजींचा 'अन ब्रिटीश रूल इन इंडीया' हा महान ग्रंथ प्रसिध्द झाला तेव्हापासून तर देशातील दारिद्रयाच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष वेधले जाऊ लागले.[२]

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची सद्य परिस्थीती अभ्यासल्याने त्यांचे राहणीमान कशा पध्दतीचे आहे याची माहिती या अभ्यासातून मिळणार आहे. तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची उत्पन्नाची कोणती साधने उपलब्ध आहेत व त्यांचा आर्थिक परिस्थीती सुधारण्यासाठी उपयोग होतो की नाही याचीही माहिती अभ्यासात मिळेल. तसेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना सरकारच्या दारिद्रय निर्मूलन योजनांचा लाभ झाला की नाही याची ही कल्पना येईल. एकंदरीत या अभ्यासात माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक, सामाजिक परिस्थीती कशा पध्दतीची आहे. याची सविस्तर माहिती मिळणार आहे, म्हणूनच या अभ्यासाचे विशेष असे महत्व आहे.

## १.४ संशोधन साहित्याचा आढावा :

संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना या विषयासंदर्भात आतापर्यंत ज्या संशोधकांनी संशोधन केले आहे. त्यातील काही संशोधकांचे आलेले निष्कर्ष पाहणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने पुढील आढावे घेतलेले आहेत.

अ. ‘‘संपुर्ण ग्रामीण विकास कार्यक्रम व भारतातील कमी झालेले दारिद्रय’’

संशोधक - के. एम. बोकील

पदवी- एम. फिल.

संशोधन पध्दती :

संशोधकाने प्रश्नावली या पध्दतीचा वापर करून तसेच या दृष्टीने नमुना निवड पध्दतीचा वापर करून अभ्यास करण्यात आला आहे.

माहितीचा निष्कर्ष

‘संपूर्ण ग्रामीण विकास कार्यक्रम’ हा दारिद्रय निर्मूलनाचा मूलभूत भाग आहे. त्याचा मुख्य उद्देश लोकांना दारिद्रयातून बाहेर काढण्यासाठी ग्रामीण भागात रोजगार निर्मिती वाढविणे हा आहे. या कार्यक्रमाची गती व व्याप्ती ही समाधानकारक असून सर्वात महत्वाची योजना म्हणून कार्य करीत आहे. नियोजनाचा काळ हा एक संमिश्र अनुभव आहे. विविध पंचवार्षिक योजनांतुन औद्यागिक व शेती क्षेत्रात उत्पादन वाढले आहे. परंतु गरीब घटकांकडे फारसे लक्ष दिले नाही. गरीबी दूर करण्यासाठी ज्या योजना आखल्या गेल्या त्या ब-याचशा अपयशी ठरल्या आहेत. ग्रामीण विकासास प्राधान्य दिले असले तरी दारिद्रय दूर करण्यासाठी मूलभूत असे प्रयत्न केले गेले नाहीत. ख-या अर्थाने सहाव्या योजनेपासून दारिद्रय दूर करण्यावर अधिक भर दिला आहे. सदरच्या योजनेच्या सुरूवातीस भारतातील जवळ जवळ ४८ टक्के लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली होती असा संशोधकाचा दावा आहे.

संपूर्ण ग्रामीण विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन केल्यानंतर असे सत्य आढळून आले की, या कार्यक्रमामध्ये दारिद्रय दूर करण्याची प्रचंड क्षमता आहे. परंतु सध्याच्या परिस्थीतीत या कार्यक्रमामध्ये ब-याच उणीवा देखील आहेत. संपूर्ण ग्रामीण विकास कार्यक्रमाचा उद्देश

ज्यांच्यासाठी आहे. त्यांना त्याचा लाभ न होता इतरानांच झाला आहे. परंतु तरीही संपूर्ण ग्रामीण विकास कार्यक्रमाची क्षमता प्रचंड मोठी असल्याने त्यातील काही वैशिष्टयांत बदल केला तर गरीबातील गरीबाला सुध्दा या कार्यक्रमातून दारिद्रय रेषेच्या वरती आणता येईल. त्यामुळेच संपूर्ण ग्रामीण विकास कार्यक्रम हा ग्रामीण गरीब लोकांचा आशेचा किरण मानला जातो. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश 'दारिद्रय निर्मूलन' हाच असल्याने त्याची उपयोगिता व चालू स्थिती हे आता वादाच्या पलीकडे आहे. म्हणनूच दारिद्रय निर्मूलन हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याने त्याची अंमलबजावणी प्रचंड ताकदीने नियोजनात्मक आणि काही सुचना केल्याप्रमाणे तसेच मुल्यमापन केल्याप्रमाणे केल्यास 'दारिद्रय' ही समस्या मोठया प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी संशोधकाला आशा वाटते.

ब. ''भारतातील दारिद्रयाची संकल्पना व त्याचे मापन निवडक अभ्यासाचे पुर्नवालोकन''

संशोधक - श्री. ए. व्ही वर्तक

पदवी- एम. फिल.

संशोधन पध्दती :

संकल्पीत आकृतीबंध तसेच साध्या निवड पध्दतीतून काही निवडक तज्ञांच्या अभ्यासाच्या आधारे संशोधकाने आपला अभ्यास पूर्ण केला आहे.

निष्कर्ष :

दारिद्रय स्पष्ट करताना प्रामुख्याने जे लोक प्रमुख गरजांपासून दूर आहेत, अशांना दारिद्रय किंवा दारिद्रय रेषेखालील लोक म्हटले आहे. दारिद्रयाची संकल्पना सापेक्ष दारिद्रय आणि निरपेक्ष दारिद्रय या दोन प्रकारे सांगितली आहे. सापेक्ष दारिद्रय व निरपेक्ष दारिद्रय या दोन संकल्पनातुन दारिद्रय रेषा ठरविता येते. परंतु दारिद्रयाचे खरे स्वरूप निरपेक्ष दारिद्रय संकल्पनेवरून अधिक अचूक ठरते. भारतामध्ये प्रामुख्याने चार प्रकारे दारिद्रय रेषेसाठी निकष ठरविले आहेत.

१. एकूण खर्चाची टक्केवारी

२. अन्नग्रहण केलेल्या कॅलरीजचे मुल्य

३. समतोल आहार

४. आवश्यक दर्जाचे राहणीमान

संशोधकाने अभ्यास करताना महत्वाचा निष्कर्ष असा शोधला आहे की, दारिद्रय रेषेखालील लोकांच्या अन्नावरील खर्चाच्या टक्केवारीत घट होत आहे. तर व्यक्तिगत खर्च वाढत चालला आहे. दारिद्रयावरती व्हि. के. आर. व्ही. राव, ओझा, बर्धन, मिन्हास, इत्यादींनी वेगवेगळया पध्दतीने अभ्यास केल्याने दारिद्रयाची वेगवेगळी आकडेवारी मिळाली आहे.

थोडक्यात श्री. ओझा, वर्धन हे एका निष्कर्षावरती आले की, १९६०-६१ ते १९६७-६८ या काळात दारिद्रयात वाढ झाली आहे. तसेच मिन्हास यांच्या निष्कर्षानुसार दारिद्रयाची टक्केवारी नित्यक्रमाने कमी होत गेली आहे विशेषत: १९६०-६१ ते १९६८-६९ पर्यत दारिद्रयाच्या टक्केवारीत महत्वाचा बदल झालेला दिसत नाही. अशा प्रकारचे वेगवेगळे अंदाज हे माहितीचा वेगवेगळा स्त्रोत व माहिती मिळविण्यासाठी वापरलेली पध्दत इत्यादीमुळे दिसून आले असे संशोधकाला वाटते.

बरेच वादविवाद हे दारिद्रय रेषा ठरविण्यात व त्याची योग्य अंमलबजावणी करण्यात झाले असले तरी अनेक तज्ञांच्या मते, १९७० च्या आसपास जवळ जवळ ४० टक्के भारतीय लोकसंख्या दारिद्रयात जीवन जगत होती. भारतामध्ये गरीब लोकांचे राहणीमान हे खुपच निकृष्ट व कमी दर्जाचे आहे. त्यामुळे तज्ञांच्या विचार विनिमयातुनच अशा लोकांसाठी नवनवीन योजना तयार करून ताबडतोब गरीबांची दारिद्रयातून कशी सुटका करता येईल किंवा त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी कशी मदत करता येईल यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत असे संशोधकाचे मत आहे.

## १.५ संशोधनाची गृहीतके :

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा झाल्यास त्याविषयासंदर्भात काही पुर्वज्ञान असावे लागते. संबंधीत विषयाची पुर्वकल्पना असल्यास आपल्या अभ्यासासंबंधी अगोदरच काहीतरी सामान्य अनुमान मिळतात. त्यानुसार संशोधक आपल्या अभ्यासाची दिशा ठरवितो. त्यामुळेच "माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास " या संशोधन विषयासाठी पुढील गृहीतके घेतलेली आहेत.

१) माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक परीस्थिती कमकुवत आहे.

२) माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचे शेतातील मजुरी हेच उत्पन्नाचे मुख्य साधन आहे.

३) माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांना शासकीय दारीद्रय निर्मूलन योजनांचा कमी प्रमाणात लाभ होत आहे.

## १.६ संशोधनाची उद्दीष्टये :

भारत देशाचा आर्थिक विकास होत असतानाच देशातील दारीद्रय ही एक गंभीर समस्या आजही भेडसावत आहे. ग्रामीण भागातील जनतेचे भयानक दारीद्रय पाहुन देश आजही आर्थिक व सामाजिक सुधारणांमध्ये किती मागे आहे.याची कल्पना येते. त्यामुळेच संशोधनाच्या अभ्यास विषयात माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक परीस्थितीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने खालील उद्दीष्टये ठेवलेली आहेत.

१) माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचा आर्थिक आणि सामाजिक परीस्थितीचा अभ्यास करणे.

२) दारीद्रय रेषेखालील कुटुंबांच्या उत्पन्नाच्या साधनांचा अभ्यास करणे.

३) दारीद्रय रेषेखालील कुटुंबांच्या सरासरी मासिक खर्चाचा अभ्यास करणे.

४) माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांसाठी राबविलेल्या विविध शासकीय योजनांचा सविस्तर अभ्यास करणे.

थोडक्यात, माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक परीस्थितीचा सविस्तर अभ्यास करून दारीद्रय रेषेखालील कुटुंबांची उत्पन्नाची साधने वाढविणे किती आवश्यक आहे ते पटवून देणे व शासकीय दारीद्रय निर्मूलनाच्या योजना दारीद्रय निर्मूलनासाठी कितपत महत्वाच्या आहेत याचा अभ्यास करणे हे माझ्या संशोधन लेखनाचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

## १.७ संशोधन पध्दती :

"माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास" या संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी माळशिरस तालुक्यातील २००२-०३ ते २००६-०७ या दहाव्या पंचवार्षिक योजनेतील समाविष्ट झालेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेतील दारिद्रय रेषेखालील कुटुंब निश्चित करण्यासाठी सन २००२-०३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते.त्यानुसार माळशिरस तालुक्यातील ११८ गावांमध्ये त्यावेळी एकूण ९०२८१ सर्वसाधारण कुटुंबापैकी २९०९३ कुटुंब ( म्हणजेच ३२.१५ टक्के कुटुंब) ही दारिद्रय रेषेखालील कुटुंब होती. माळशिरस तालुक्यातील ११८ गावांचे दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या संख्येनुसार गावांचे गट पाडून सर्वाधिक दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणा-या पहिल्या तीन गटांतील गावांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या तीन गटातील ९९ गावांमधून ५ टक्के गावांची म्हणजेच ७ गावांची अभ्यासासाठी निवड केली आहे. ९९ गावांपैकी ७ गावांचे प्रमाण हे ७.०७ टक्के इतके आहे. या ७ गावांतील एकूण १०२५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबांमधून १० टक्के म्हणजेच १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची साध्या यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने अभ्यासासाठी निवड केली आहे.

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा अभ्यास करण्यासाठी जी साधन सामग्री किंवा माहिती उपलब्ध केली आहे ती प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करून केली आहे.

१. प्राथमिक माहिती

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या अभ्यासासाठी निवडक कुटुंबाकडुन आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी एक प्रश्नावली तयार करून त्याप्रश्नावलीच्या आधारे माहिती जमा केली आहे.

२. दुय्यम माहिती

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या अभ्यासासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद इत्यादी ठिकाणाहून दुय्यम माहिती मिळविली आहे. तसेच या विषयासंबंधीत लिखाण, अहवाल, छापील मजकूर यांचाही वापर करण्यात आलेला आहे.

३. सांख्यिकीय विश्लेषण

प्राथमिक व दुय्यम स्त्रोतापासुन मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून साध्या सरासरी पध्दतीने (शेकडेवारी) विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत.

## १.८ संशोधनाच्या मर्यादा :

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा अभ्यास करताना निवडक दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील सदस्यांना प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रश्न विचारून आवश्यक ती माहिती मिळविली आहे . दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची आर्थिक परिस्थीती, सामाजिक परिस्थीती तसेच त्यांच्या उत्पन्नाची साधने, मासिक सरासरी खर्च, कुटुंबातील सदस्यांचे शैक्षणिक स्थान, आहार ,शासनाच्या योजनांचा लाभ इत्यादी प्रकारची सर्व माहिती संबंधीत कुटुंबातील सदस्याकडून घेतली आहे. ती माहिती त्या सदस्याच्या ज्ञानावर अवलंबून असल्याने त्यात काही अपूर्ण गोष्टीही असण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही या संशोधन अभ्यासाची मर्यादा आहे. तसेच हा अभ्यास माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषखालील कुटुंबा पुरता मर्यादित आहे.

## १.९ संशोधन अहवाल मांडणी :

"माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषखालील कुटुंबांचा एक अभ्यास" या विषयाचा संशोधन अहवाल पुढील चार प्रकरणात विभागून तयार केला आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना व विषयाची रूपरेषा

या प्रकरणात प्रस्तावना, दारिद्रयाची संकल्पना, दारिद्रय रेषा, भारतातील दारिद्रयाचा अंदाज, भारतीय ग्रामीण दारिद्रय, दारिद्रयाच्या प्रमाणातील बदल, दारिद्रय निर्मूलन योजना, दारिद्रय निर्मूलनाच्या मर्यादा इत्यादी गोष्टींचा सविस्तर आढावा घेतला आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पध्दती

या प्रकरणात संशोधन समस्या, संशोधन क्षेत्राची निवड, संशोधनाचे महत्व, संशोधन क्षेत्राची निवड, संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाची गृहितके, संशोधनाची उद्‌दीष्टये, संशोधन पध्दती, संशोधनाच्या मर्यादा इत्यादी घटकांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

प्रकरण तिसरे

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या माळशिरस तालुक्यातील १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या मुलाखती घेऊन आवश्यक असलेली माहिती जमा केली आहे. व त्या माहितीच्या आधारे कोष्टके तयार केली आहेत. तयार केलेल्या प्रत्येक कोष्टकाचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

प्रकरण चौथे

निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात उद्‌दीष्टाला अनुसरून संशोधन केल्यानंतर जे निष्कर्ष निघाले आहेत ते मांडले आहेत व पुढे दारिद्रय निर्मूलनासाठी कांही उपयुक्त शिफारशी सुचविल्या आहेत.

परिशिष्ट

यांत पुढील घटकांची मांडणी केली आहे.

अ. संदर्भ ग्रंथ

ब. मुलाखत प्रश्नावली

**संदर्भ ग्रंथ :**


१. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल, प्रा. एस्. एस्. जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७ पा. नं. ७३

२. भारतातील दारिद्रय - स्वरूप व निवारण, वि. स. पागे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे १९९२, पा. नं. २८

# प्रकरण - तिसरे

# दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या माहितीचे विश्लेषण

प्रस्तावना :

भारतातील दारिद्रयाची समस्या सोडविण्यासाठी एक परिणामकारक आणि रूढी परंपराने जखडलेल्या समाजाचे आधुनिक आणि प्रगतशील समाजात रूपांतर करण्यासाठी सार्वजनिक खर्चावर भर दिला जात आहे. दारिद्रय आणि दारिद्रय निवारण हा विषय इतका विशाल आणि गहण असल्याने सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे. भारतातील दारिद्रय निर्मूलन ही सरकारच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे. त्यामुळेच केंद्र व राज्य सरकार मार्फत दारिद्रय निर्मूलनासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

सार्वजनिक खर्चात सामाजिक सेवांवर अधिक भर देऊन दारिद्रय निर्मूलनासाठी योजना आखून त्यावर खर्च केला जात आहे. अशा दारिद्रय निर्मूलनाच्या योजनामुळे अनेक गरीब कुटुंबाना आर्थिक व सामाजिक मदत होत आहे.

एकंदरीत सार्वजनिक आयव्यवयांमध्ये दारिद्रय निर्मूलनावरील योजनांवर खर्च करून दारिद्रय दुर करण्याचा मोठा प्रयत्न चालू आहे. त्यामुळेच सार्वजनिक आयव्ययाच्या सिध्दांताशी दारिद्रयावरचा अभ्यास मिळता जुळता असल्याने सार्वजनिक आयव्ययाचे सिध्दांत माझ्या ''माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक अभ्यास'' या अभ्यास विषयांस लागू होतात.

''माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक अभ्यास''या संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यासाची सर्व मिळविलेली आवश्यक माहिती या प्रकरणात सविस्तरपणे दिली आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२-०३ ते २००६-०७) समाविष्ट असणा-या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे. माळशिरस तालुक्यात २००२-२००३ च्या दारिद्रय रेषेखालील सर्वेक्षणानुसार २९०३३ कुटुंब दारिद्रय रेषेखाली असलेली आढळून आली होती.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची माहिती जमा करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करून त्या प्रश्नावलीच्या सहायाने निवडलेल्या गावांतील कुटुंबांची मुलाखत घेवून माहिती जमा केली होती. जमा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून साध्या सरासरी पध्दतीने सांख्यिकीय विश्लेषण केले आहे. नंतर तयार झालेल्या कोष्टकांची मांडणी करून त्या प्रत्येक कोष्टकाचे सविस्तर विश्लेषण कले आहे.

तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची माहिती घेताना त्यांची चालू आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

### कोष्टक क्र. ३.१

### कुटुंबातील सदस्य संख्येचे विश्लेषण

| अ.नं. | एकूण कुटुंब | सदस्य संख्या | सरासरी सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | १०० | ४६३ | ४.६३ |

कोष्टक क. ३.१ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या एकूण सदस्य संख्येविषयीची माहिती दिली आहे. या कोष्टकावरून असे दिसून येते की, एकूण १०० कुटुंबामध्ये ४६३ एवढी सदस्य संख्या आहे. म्हणजेच प्रत्येक कुटुंबात सरासरीने ४.६३ व्यक्ती म्हणजे ४ ते ५ व्यक्ती आहेत.

### कोष्टक क्र. ३.२

### स्त्री - पुरूष लिंगानुसार विश्लेषण

| अ.नं. | लिंग | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | २३७ | ५१.१९ |
| २ | स्त्री | २२६ | ४८.८१ |
|  | एकूण | ४६३ | १००.०० |

कोष्टक क्र.३.२ मध्ये १०० कुटुंबातील एकूण सदस्य संख्येचे स्त्री -पुरूष असे लिंगानुसार वर्गीकरण केले आहे. वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, एकूण ४६३ सदस्यांपैंकी पुरूषांची संख्या २३७ (म्हणजे ५१.१९ टक्के पुरूषांची संख्या ) आहे. व स्त्रीयांची संख्या २२६ (म्हणजे ४८.८१ टक्के स्त्रीयांची संख्या) इतकी आहे. याचाच अर्थ पुरूषांची संख्या स्त्रीयांच्यापेक्षा जवळ जवळ ३ टक्कयांनी जास्त आहे.

## कोष्टक क्र. ३.३

## वयोमानानुसार वर्गीकरण

| अ.नं. | वयांचे गट | सदस्य संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | ०-१५ | १५८ | ३४.१२ |
| २ | १६-५९ | २७५ | ५९.४० |
| ३ | ६० च्या पुढील | ३० | ६.४८ |
| | एकूण | ४६३ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या कुटुंबातील सदस्यांचे वयोमानानुसार वर्गीकरण केले आहे. वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, एकूण ४६३ सदस्यांपैकी वय वर्ष ०-१५ या वयोगटात १५८ सदस्य (म्हणजे ३४.१२ टक्के सदस्य) आहेत. वय वर्ष १६-५९ या वयोगटात २७५ सदस्य (म्हणजे ५९.४० टक्के सदस्य ) आहेत. तर ६० वर्ष वयाच्या पुढील गटात असणा-या सदस्यांची संख्या ३० (म्हणजे ६.४८ टक्के सदस्यांची संख्या) इतकी आहे.

वरील कोष्टकावरून दुसरी एक गोष्ट लक्षात येते की, उत्पादक कार्यात सहभागी होणारी १६-५९ या वयोगटातील २७५ (५९.४० टक्के) एवढीच सदस्य संख्या आहे. आणि वय वर्ष ०-१५ व ६० च्या पुढील गटांतील मिळुन १८८ (म्हणजे ४०.६० टक्के) इतकी अनुत्पादक असणारी सदस्य संख्या आहे. याचाच अर्थ १०० कुटुंबातील ४० टक्के लोकसंख्या उत्पादक कार्य न करता बसुन राहत आहे. आणि ६० टक्के लोकसंख्या उत्पादक कार्यात सहभागी होवून कुटुंबासाठी उत्पन्न मिळविणारी आहे. थोडक्यात, दारिद्रय रेषेखालील बरीचशी व्यक्तींची संख्या उत्पन्न न मिळविता दुस-यावर अवलंबुन राहत असल्याने अशा कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न कमी व खर्च जास्त अशी परिस्थीती राहून कुटुंब गरीबीत जगत आहेत.

## कोष्टक क्र. ३.४

## कुटुंबातील सदस्यांचे साक्षर – निरक्षरतेचे प्रमाण

| अ.नं. | तपशिल | सदस्य संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | साक्षर | ३१६ | ६८.२५ |
| २ | निरक्षर | १४७ | ३१.७५ |
| | एकूण | ४६३ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४ मध्ये कुटुंबातील सदस्यांचे साक्षर व निरक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे. वरील कोष्टकावरून असे लक्षात येते की, १०० कुटुंबातील ४६३ सदस्यांपैकी ३१६ सदस्य (म्हणजे ६८.२५ टक्के सदस्य) हे साक्षर आहेत. तर १४७ सदस्य (म्हणजे ३१.७५ टक्के सदस्य) हे निरक्षर आहेत. एकूण सदस्य संख्येच्या मानाने निरक्षरांचे प्रमाण अजूनही बरेच मोठे असलेले दिसून येत आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची आर्थिक हालाकीची परिस्थीती, शैक्षणिक मोठया फी, गावांतील शिक्षणाच्या अपु–या सोयी, कामधंद्यासाठी कधी कधी परगांवी जाणे इत्यादी मुळे शिक्षणाचा प्रसार अशा कुटुंबामध्ये कमी झालेला दिसतो आहे.

एकूण १०० कुटुंबातील ४६३ सदस्यांपैकी जे ३१६ सदस्य साक्षर आहेत त्यांच्या शिक्षणा विषयची माहिती पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

## कोष्टक क्र. ३.५

## कुटुंबातील सदस्यांचे शैक्षणिक स्थान

| अ.नं. | शैक्षणिक स्थान | सदस्य संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | ७४ | २३.४२ |
| २ | माध्यमिक | २२० | ६९.६२ |
| ३ | उच्च माध्यमिक | ०९ | २.८५ |
| ४ | पदवीधर | १३ | ०४.११ |
| | एकूण | ३१६ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.५ मध्ये कुटुंबातील सदस्यांचे शैक्षणिक स्थान दर्शविले आहे. साक्षर असलेल्या एकूण ३१६ सदस्यांपैकी ७४ सदस्यांनी (म्हणजे २३.४२ टक्के सदस्यांनी) प्राथमिक शिक्षण घेतले आहे. माध्यमिक शिक्षण घेतलेले २२० सदस्य (म्हणजे ६९.६२ टक्के सदस्य) आहेत. उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या सदस्यांची संख्या ०९ (म्हणजे २.८५ टक्के सदस्य) इतकी आहे. तर १३ सदस्यांनी (म्हणजे ४.११ टक्के सदस्यांनी) पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होती की, माध्यमिक शिक्षण घेतलेल्या सदस्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. पंरतु उच्च माध्यमिक व पदवीधर शिक्षण घेणा-या सदस्यांचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसत आहे. म्हणजेच दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील ब-याचशा सदस्यांनी फक्त प्राथमिक व माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. अशा कुटुंबांच्या प्रत्यक्ष भेटीतुन, चर्चेतुन असे समजले की, कुटुंबांची आर्थिक परिस्थीती कमकुवत असल्याने उच्च शिक्षण घेण्यात अडचणी येतात. तसेच कुटुंबांतील ब-याच सदस्यांनी पैशाच्या कारणास्तव व काम करण्याच्या गरजेमुळे चालू शिक्षण बंद केले आहे.

एकूण १०० कुटुंबांतील जी ३१६ सदस्य साक्षर आहेत. त्यापैकी १६५ सदस्यांचे सध्या शिक्षण चालू आहे. या संदर्भात पुढील कोष्टकात विवेचन केले आहे.

### कोष्टक क्र. ३.६

### प्रत्यक्षात शिक्षण चालू असलेल्या सदस्यांचे विश्लेषण

| अ.नं. | शिक्षण | चालू शिक्षण | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | ५८ | ३५.१५ |
| २ | माध्यमिक | ८७ | ५२.७३ |
| ३ | उच्च माध्यमिक | ०९ | ०५.४५ |
| ४ | पदवीधर | ११ | ०६.६७ |
| | एकूण | १६५ | १००.०० |

कोष्टक कं. ३.६ मध्ये कुटुंबातील प्रत्यक्षात चालू शिक्षण घेत असलेल्या सदस्यांचे प्रमाण दर्शविले आहे. एकूण ४६३ सदस्य संख्येपैकी ३१६ सदस्य (म्हणजे ६८.२५ टक्के सदस्य) साक्षर आहेत. तर उरलेले १४७ सदस्य (म्हणजे ३१.७५ टक्के सदस्य ) निरक्षर आहेत.

साक्षर सदस्यांपैकी १६५ सदस्यांचे (म्हणजे ५२.२२ टक्के) सध्या शिक्षण चालू आहे. जे एकूण १६५ सदस्य शिक्षण घेत आहेत त्यापैकी प्राथमिक शिक्षण घेणारे ५८ सदस्य(म्हणजे ३५. १५ टक्के सदस्य) आहेत. माध्यमिक शिक्षण घेत असलेले ८७ सदस्य (म्हणजे ५२.७३ टक्के सदस्य ) आहेत. ९ सदस्य (म्हणजे ५.४५ टक्के सदस्य )हे उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत. तर पदवीचे शिक्षण घेणारे ११ सदस्य (म्हणजे ६.६७ टक्के सदस्य ) आहेत.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण घेणा-या सदस्यांचे प्रमाण जास्त आहे. परंतु उच्च माध्यमिक व पदवीचे शिक्षण घेणारे खुपच कमी सदस्य आहेत. उच्च माध्यमिक व पदवीचे शिक्षण घेण्यासाठी येणारा मोठा फी चा खर्च, दुरवर असणारी महाविद्यालये, नोकरीची अनिश्चितता, बेकारांची संख्या इत्यादी कारणांमुळे असे शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे. म्हणजेच १६५ सदस्यांपैकी १४५ सदस्य (८७.८८ टक्के) हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणारे आहेत तर फक्त २० सदस्य (१२.१२ टक्के) उच्च माध्यमिक व पदवीचे शिक्षण घेणारे आहेत.

## कोष्टक क्र. ३.७

## कुटुंबांचे मासिक उत्पन्नानुसार विश्लेषण

| अ.नं. | उत्पन्नाचे टप्पे (रूपये) | कुटुंबांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | २५० पेक्षा कमी | ०० | ००.०० |
| २ | २५० ते ४९९ | ०७ | ०७.०० |
| ३ | ५०० ते १४९९ | ५८ | ५८.०० |
| ४ | १५०० ते २५०० | ३५ | ३५.०० |
| ५ | २५०० पेक्षा जास्त | ०० | ००.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.७ मध्ये कुटुंबाच्या मासिक सरासरी उत्पन्नाचे टप्पे व कुटुंबसंख्या दर्शविली आहे. वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होती की, मासिक उत्पन्न रु. २५० पेक्षा कमी उत्पन्न असणारे एकही कुटुंब नाही. रूपये २५० ते रूपये ४९९ या मासिक उत्पन्नाच्या टप्प्यात ७ कुटुंब (म्हणजे ७.०० टक्के कुटुंब) आहेत. रूपये ५०० ते रूपये १४९९ मासिक उत्पन्न मिळविणारी ५८ कुटुंब (म्हणजे ५८.०० टक्के कुटुंब) आहेत. तर रूपये १५०० ते २५०० एवढे मासिक सरासरी उत्पन्न मिळविणारी ३५ कुटुंब (म्हणजे ३५.०० टक्के कुटुंब)आहेत. परंतु रूपये २५०० पेक्षा जास्त सरासरी मासिक उत्पन्न असणारे एकही कुटुंब नाही.

थोडक्यात, वरील कोष्टकांवरून असे स्पष्ट होते की, एकूण १०० कुटुंबातील सर्वच कुटुंब ही मजुरी करणारी आहेत. तसेच कुटुंबातील सदस्यांना मिळणारी मजुरी ही दिवसाला ५०-६० रूपये या दरम्यानच मिळत आहे. शिवाय मजुरीचे काम आठवडयात साधारणत: ३ ते ४ दिवसच मिळत आहे. त्यामुळेच माळशिरस तालुक्यातील सरासरी मासिक उत्पन्न रू.२५० ते १४९९ पर्यंत मिळविणारी ६५ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब आहेत. यावरूनच माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती किती कमकुवत असेल हे लक्षात येईल. एकूण १०० कुटुंबातील सर्वच कुटुंब ही मजुरी करणारी आहेत. तसेच कुटुंबातील सदस्यांना मिळणारी मजुरी ही दिवसाला ५०-६० रूपये या दरम्यानच मिळत आहे. शिवाय मजुरीचे काम आठवडयात साधारणत: ३ ते ४ दिवसच मिळत आहे.

## कोष्टक क्रं. ३.८

## कुटुंबांच्या उपजिवीकेच्या साधनांचे विश्लेषण

| अ.नं. | उपजिवीकेचे साधन | कुटुंबांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | मजुरी | ९४ | ९४.०० |
| २ | शेती व मजुरी | ०६ | ०६.०० |
| ४ | शेती | ०० | ०.० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.८ मध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंब उपजिवीकेसाठी ज्या साधनांचा वापर करीत आहेत ते दर्शविलेले आहे. वरील  कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, एकूण १०० कुटुंबापैकी ९४ कुटुंबाचे (म्हणजे ९४.०० टक्के कुटुंबाचे) मजुरी हेच उपजिवीकेचे साधन आहे. शेती व शेतीसह मजुरी करणारी फक्त ६ कुटुंब ( म्हणजे ६ टक्के  कुटुंब) आहेत. तसेच फक्त शेती करणारे एकही कुटुंब नाही.

ग्रामीण भागातील गरीब लोकांना फक्त शेतीतच मजुरी मिळत आहे. शिवाय दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचे कमी शिक्षण, भांडवलाचा तुटवडा, यांमुळे नोकरी, छोटा व्यवसाय यांमध्ये कुटुंबातील सदस्यांचा सहभाग नाही. दारीद्रय रेषेखालील जवळ-जवळ सर्वच कुटुंबांना उपजिविकेसाठी मजुरी करावी लागत आहे. काही कुटुबांकडे स्वत:ची शेत जमिन असतानाही मजुरी करावी लागत आहे. कारण बरीचशी शेत जमिन ही कोरडवाहू स्वरूपाची आहे. अशा जमिनीतुन  उपजिवीके एवढेही अन्नधान्य मिळत नसल्याने अशा कुटुंबाना मजूरी शिवाय पर्याय नाही.

थोडक्यात, वरील कोष्टावरून असे स्पष्ट होते की, माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील जवळ जवळ  सर्वच कुटुंबांचे मजुरी हेच उपजिविकेचे मुख्य साधन आहे.

## कोष्टक क्र. ३.९

## मजुरीच्या कालावधीचे विश्लेषण

| अ.नं. | कालावधी | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १२ महीने | ६६ | ६६.०० |
| २ | ९ महीने | ३४ | ३४.०० |
| ३ | ६ महीने | ०० | ०.० |
| ४ | ३ महीने | ०० | ०.० |
|  | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.९ मध्ये १०० कुटुंबांना वर्षातील किती दिवस रोजगार मिळतो आहे याचे विश्लेषण केलेले आहे. वरील कोष्टकावरुन हे स्पष्ट होते की, १०० कुटुंबापैकी ६६ कुटुंबांना (म्हणजे ६६ टक्के कुटुंबांना ) १२ महीने रोजगाार मिळतो आहे. ३४ कुटुंबांना (म्हणजे ३४ कुटुंबांना ) ९ महीने रोजगार मिळत आहे. या ठिकाणी ६ महीने व ३ महीने रोजगार मिळणारे एकही कुटुंब नाही. याचाच अर्थ एकुण जी १०० कुटुंब आहेत त्यांना ९ ते १२ महीने रोजगार मिळत आहे. शेतीतील खांदणी - बांधणी, खुरपणी, पेरणी, काढणी, मशागत इत्यादी कामांसाठी लोकांना मजुरी मिळत आहे. दारीद्रय रेषेखालील लोकांना ९ ते १२ महीने मजुरी मिळत असली तरी ती कायम स्वरुपी नाही . आठवडयातील साधारणत: ३-४ दिवसच मजुरी मिळत असल्याचेही समजले आहे.

## कोष्टक क्र.३.१०

## कुटुंब राहत असलेल्या भागातील उपलब्ध कारखानदारी, मोठे व्यवसाय

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबाच्या भागात असणारी कारखानदारी/ मोठे व्यवसाय | १० | १०.०० |
| २ | कुटुंबाच्या भागात उपलब्ध नसणारी कारखानदारी / मोठे व्यवसाय | ९० | ९०.०० |
| | एकुण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१० मध्ये १०० कुटुंब राहत असलेल्या भागातील उपलब्ध कारखानदारी, मोठे व्यवसाय यांचे विश्लेषण दिले आहे. वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे एकुण १०० कुटुंबापैकी १० कुटुंब ( म्हणजे १० टक्के कुटुंब ) राहत असलेल्या भागातच फक्त कारखानदारी किंवा मोठे व्यवसाय सुरू आहेत. तर ९० कुटुंब ( म्हणजे ९० टक्के कुटुंब ) राहत असलेल्या भागात कोणतेही कारखानदारी किंवा मोठे व्यवसाय सुरू नाहीत. दारीद्रय रेषेखालील लोकांना शेतीक्षेत्रातील मजुरीबरोबरच कारखानदारी, उदयोगव्यवसायात रोजगार मिळणे आवश्यक असते.

परंतु माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील ९० टक्के कुटुंब कारखानदारी विकसित नसलेल्या भागात राहत असलेले दिसतात.

ज्या १० कुटुंब रहात असलेल्या भागात कारखानदारी उपलब्ध आहे त्याठिकाणी त्यांना रोजगार मिळतो की नाही या संदर्भात पुढील कोष्टकात स्पष्टीकरण दिले आहे.

### कोष्टक क्र.३.११

### कुटुंब राहत असलेल्या भागातील कारखान्यातील उपलब्ध रोजगार

| अ.नं. | रोजगार | कुटुंब संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | रोजगार मिळणारी कुटुंब | ०० | ००.०० |
| २ | रोजगार न मिळणारी कुटुंब | १० | १००.०० |
| | एकुण | १० | १००.०० |

कोष्टक क्रमांक ३.११ मध्ये १० कुटुंब रहात असलेल्या भागातील कारखान्यात त्यांना रोजगार मिळतो की नाही याचे विश्लेषण केले आहे. वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, १० कुटुंब रहात असलेल्या भागात कारखानदारी उपलब्ध असूनही एकाही कुटुंबातील सदस्याला त्याठिकाणी रोजगार मिळत नाही. म्हणजेच तेथील कोणत्याही कुटुंबाना (१०० टक्के ) कारखान्यात रोजगार उपलब्ध होत नाही. कारखाने, व्यवसाय संस्था यांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी गोष्टींचा दारीद्रय रेषेखालील कुटुंबाकडे अभाव असल्याने त्यांना त्याठिकाणी रोजगार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

## कोष्टक क्र. ३.१२

## सरकारी रोजगार हमीच्या कामाचा लाभ घेणारी कुटुंब

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| ०१ | रोजगार हमीच्या कामावर जाणारी कुटुंब | ०० | ००.०० |
| २ | रोजगार हमीच्या कामावर न जाणारी कुटुंब | १०० | १००.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी किती कुटुंब सरकारी रोजगार हमीच्या कामाचा लाभ घेत आहेत की नाहीत हे दर्शविलेले आहे . वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, १०० कुटुंबापैकी एकही कुटुंब सरकारी रोजगार हमीच्या कामाचा लाभ घेत नाही. म्हणजेच सरकारी रोजगार हमीच्या कामाचा लाभ न घेणारी सर्वच्या सर्व १०० कुटुंब (म्हणजे १०० टक्के कुटुंब ) आहेत.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, सरकारने गरीब लोकांसाठी विशेषत: दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी जी रोजगार हमीची कामे सुरू केली आहेत त्या कामाचा दारिद्र्य रेषेखालील कुटुंब फारसा लाभ घेत नाहीत . जी रोजगार हमीची कामे चालू आहेत, ती त्यांच्या गावापासून दूर असल्याने त्याठिकाणी दररोज जाण्यास अडचणी येतात. शिवाय शेतातील मजुरी पेक्षा रोजगार हमीच्या कामावर कमी मजुरी मिळत असल्याने त्याठिकाणी जावेसे वाटत नाही. अशा रोजगार हमीच्या कामाच्या मोबादल्यात रक्कम व काहीसे अन्नधान्यही मिळत असते. परंतु मजुरांना अन्नधान्या ऐवजी पैशातच वेतन मिळावे असे वाटते. शिवाय मिळणारे अन्नधान्य ही निकृष्ट प्रतिचे असल्याने रोजगार हमीच्या कामावर जात नाहीत .

एकूण १०० कुटुंबापैकी जी ८१ कुटुंब मजुरी बरोबरच इतर व्यवसाय करीत आहेत. त्या संदर्भात पुढील कोष्टकात विवेचन केले आहे.

## कोष्टक क्र. ३.१३

## शेती निगडीत व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे विश्लेषण

| अ.नं | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण ( टक्के) |
|---|---|---|---|
| १ | दुग्ध व्यवसाय | ०४ | ०४.०० |
| २ | शेळी पालन व्यवसाय | ७१ | ७१.०० |
| ३ | कुक्कुट पालन व्यवसाय | ०६ | ०६.०० |
| ४ | कोणताही व्यवसाय नाही | १९ | १९.०० |
| | | १०० | १००.०० |

कोष्टक. क्र. ३.१३ मध्ये शेती निगडीत दुय्यम व्यवसायात किती कुटुंब सहभागी आहेत हे दर्शविलेली आहे. वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी दुग्धव्यवसाय करणारी ०४ कुटुंब (म्हणजे ०४ टक्के कुटुंब ) आहेत. शेळीपालन व्यवसाय करणारी ७१ कुटुंब ( म्हणजे ७१ टक्के कुटुंब ) आहेत. तर कुक्कुट पालन व्यवसाय करणारी ०६ कुटुंब ( म्हणजे ०६ टक्के कुटुंब )आहेत. आणि १९ कुटुंब ( म्हणजे १९ टक्के कुटुंब ) कोणताही शेती निगडीत व्यवसाय करीत नाहीत. थोडक्यात, ८१ कुटुंब ( म्हणजे ८१ टक्के कुटुंब ) ही मजुरी बरोबरच इतर कोणतातरी शेती निगडीत व्यवसाय करीत आहेत.

शेळी पालन व्यवसायाचा कमी खर्च, कमी भांडवल, उत्पन्न चांगले , मजुरी करता करताच चारा मिळवणे , रोगराई , औषध उपचाराचा खर्च कमी इत्यादी मुळे जवळ जवळ ७१ टक्के कुटुंब शेळीपालन व्यवसाय करीत असलेली दिसतात. दुग्धव्यसायासाठी मोठे भांडवल, वैरण चाऱ्याचा खर्च, दुधाच्या अस्थिर किंमती, सांभाळण्याची अडचण इत्यादी मुळे असा व्यवसाय करणारी फक्त ४ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब दिसून येतात. याशिवाय रोगराई , उत्पन्नाची खात्री नसणे इत्यादीमुळे कुक्कुट पालन व्यवसाय करणारीही फक्त ६ टक्के कुटुंब आहेत.

## कोष्टक क्र. ३.१४

## सरकारी नोकरी करणा-या कुटुंबांचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंबसंख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | सरकारी नोकरीत असणारी कुटुंब | ०० | ००.०० |
| २ | सरकारी नोकरीत नसणारी कुटुंब | १०० | १००.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१४ मध्ये सरकारी नोकरीत काम करणा-या एखाद्या व्यक्तिंचा समावेश असणा-या कुटुंबाचे वर्णन केलेले आहे. वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, एकूण १०० कुटुंबातील एकाही व्यक्तीला सरकारी नोकरी नाही. म्हणजेच अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी एकाही कुटुंबातील एकाही सदस्यास सरकारी नोकरी नाही.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील एकही व्यक्तिं सरकारी नोकरीत नाही. त्यांचे कमी शिक्षण, प्रशिक्षणाचा अभाव इत्यादीमुळे त्यांना सरकारी नोकरी मिळाली नसल्याचे दिसले आहे.

## कोष्टक क्र.३.१५

## मजुरी करण्या-या पुरूषांचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | पुरूष संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | मजुरी करणारे पुरूष | १०६ | ४४.७३ |
| २ | मजुरी न करणारे पुरूष | १३१ | ५५.२७ |
| | एकूण | २३७ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१५ मध्ये मजुरी करणाऱ्या पुरूषांची संख्या दर्शविलेली आहे. एकूण २३७ पूरूषवर्गापैकी १०६ पुरूष ( म्हणजे ४४.७३ टक्के पुरूष ) मजुरी करीत आहेत. तर मजुरी न करणारे १३१ पुरूष ( म्हणजे ५५.२७ टक्के पुरूष ) आहेत. मजुरी न करणाऱ्या पुरूष वर्गात

लहान मुले, शाळेत जाणारी मुले , आजारी व्यक्ती, वयस्कर व्यक्ती यांचा समावेश असल्याने मजुरी न करणाऱ्या पुरूषांची संख्या जास्त दिसत आहे

## कोष्टक क्र.३.१६

## मजुरी करणा-या स्त्रीयांचे प्रमाण

| अ.नं. | तपशिल | पुरूष संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | मजुरी करणा-या स्त्रीया | ८९ | ३९.३८ |
| २ | मजुरी न करणा-या स्त्रीया | १३७ | ६०.६२ |
| | एकूण | २२६ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१६ मध्ये मजुरी करणाऱ्या स्त्री वर्गाची संख्या दर्शविली आहे. एकूण २२६ स्त्री वर्गांपैकी ८९ स्त्रींया ( म्हणजे ३९.३८ टक्के स्त्रींया ) मजुरी करीत आहेत. तर १३७ स्त्रींया ( म्हणजे ६०.६२ टक्के स्त्रींया ) मजुरीचे काम करीत नाहीत. १३७ स्त्री वर्गात लहान मुली ,शाळेत जाणाऱ्या मुली, वयस्कर स्त्रीया यांचा समावेश असल्याने मजुरी न करणाऱ्या स्त्रीयांची संख्या जास्त दिसत आहे.

## कोष्टक कं. ३.१७

### शेती क्षेत्रातील एका दिवसाची मजुरी मिळविणा-या पुरूषांचे प्रमाण

| अ.नं. | मजुरीचे टप्पे रू. | पुरूषांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | २१-३० | ०० | ००.०० |
| २ | ३१-४० | ०८ | ७.५५ |
| ३ | ४१-५० | ५४ | ५०.९४ |
| ४ | ५१-६० | २७ | २५.४७ |
| ५ | ६१-७० | ०५ | ४.७२ |
| ६ | ७१-८० | ०७ | ६.६० |
| ७ | ८१-९० | ०० | ०.० |
| ८ | ९१-१०० | ०५ | ४.७२ |
| | एकूण | १०६ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१७ मध्ये पुरूषांच्या शेती क्षेत्रातील एका दिवसाच्या मजुरीचे स्पष्टीकरण केले आहे. वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, एका दिवसाला रूपये ३१ ते ४० एवढी मजुरी घेणारे ८ पुरूष (म्हणजे ७.५५ टक्के पुरूष) आहेत. ५४ पुरूषांना (म्हणजे ५०.९४ टक्के पुरूषांना) दररोज ४१ ते ५० रूपये या टप्प्यात मजुरी मिळत आहे. दररोज रूपये ५१ ते ६० मजुरी मिळविणारे २७ पुरुष (म्हणजे २५.४७ टक्के पुरूष ) आहेत. ६१ ते ७० रूपये दररोज मजुरी मिळविणारे ५ पुरूष (म्हणजे ४.७२ टक्के पुरूष ), ७१ ते ८० रूपये दररोज मजुरी मिळविणारे ७ पुरूष ( म्हणजे ६.६० टक्के पुरूष ) तर ९१ ते १०० रूपये दररोज मजुरी मिळविणारे ५ पुरूष ( म्हणजे ४.७२ टक्के पुरूष) आहेत.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण भागात पुरूषांना मिळणारी एका दिवसाची मजुरी ३१ ते १०० रूपये पर्यत मिळत आहे. एका दिवसाच्या मजुरीचा विचार करता फक्त १७ व्यक्तिंनाच (म्हणजे १६.४ टक्के व्यक्तिंनाच ) ६० रूपयेच्यावरती मजुरी मिळत आहे. आणि जवळ - जवळ ८९ व्यक्तींना (म्हणजे ८३.९६ टक्के व्यक्तिंना ) रूपये ६० पेक्षा कमी मजुरी मिळत आहे. शेती क्षेत्रात हंगामानुसार तसेच शेतक-यांच्या सवडीनुसार

कामे निघत असल्याने दररोज मजुरीची कामे मिळत नाहीत. तसेच ग्रामीण मजुरांची संख्या अधिक व कामे कमी यामुळे कमी पैशावरही मजूरी करावी लागते.

### कोष्टक क्र. ३.१८

### शेती क्षेत्रातील एक दिवसाची मजुरी मिळविणा-या स्त्रीयांचे प्रमाण

| अ.नं. | मजुरीचे टप्पे रू. | स्त्रीयांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | २१-३० | ३१ | ३४.८३ |
| २ | ३१-४० | ४० | ४४.९५ |
| ३ | ४१-५० | १८ | २०.२२ |
| | एकूण | ८९ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१८ मध्ये स्त्रीयांना शेतीक्षेत्रात मिळणा-या एका दिवसाच्या मजुरीचे दर दर्शविलेले आहेत . रूपये २१ तें ३० या एका दिवसाच्या मजुरीच्या टप्प्यात ३१ स्त्रीयांना ( म्हणजे ३४.८३ स्त्रीयांना) रोजगार मिळत आहे. ४० स्त्रीयांना (म्हणजे ४४.९५ टक्के स्त्रीयांना ) ३१ ते ४० रूपये एवढी मजुरी व १८ स्त्रीयांना (म्हणजे २०.२२ टक्के स्त्रीयांना) रूपये ४१ ते ५० एवढी एका दिवसाची मजुरी मिळत आहे.

वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील स्त्रीयांना शेतीक्षेत्रात एका दिवसाची मजुरी जास्तीत जास्त रूपये ५० पर्यतच आहे. शेतीत स्त्रीयांना खुरपणी, बी - बीयाणांची रोपणी इत्यादी प्रकारची कामे असतात. अशा कामाची मजुरी अगदीच कमी मिळत आहे.

## कोष्टक क्र. ३.१९

## १०० कुटुंबांच्या मासिक सरासरी खर्चाचे विवरण

| अ.नं. | तपशिल | सरासरी मासिक खर्च रू. | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | भोजन | ८८८००.०० | ६०.३३ |
| २ | कपडें | १३८५०.०० | ९.४१ |
| ३ | शिक्षण | १४५८०.०० | ९.९१ |
| ४ | आरोग्य | १७४५०.०० | ११.८६ |
| ५ | इतर | १२५००.०० | ८.४९ |
| | एकूण | १४७१८०.०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.१९ मध्ये १०० कुटुंब करीत असलेल्या मासिक सरासरी खर्चाचे विवरण केले आहे. एकूण १०० कुटुंबाच्या मासिक सरासरी खर्चाचा विचार करता एकूण १४७१८० रूपये खर्च होत आहे. एकूण खर्चापैकी सर्व कुटुंब भोजनावरती ८८८००.०० रूपये (म्हणजे ६०.३३ टक्के) खर्च करीत आहेत. मासिक सरासरी खर्चामध्ये कपडयावरती १३८५० रू.( म्हणजे ९.४१ टक्के ) शिक्षणासाठी १४५८० रू. (म्हणजे ९.९१ टक्के), आरोग्यासाठी १७४५० रू. (म्हणजे ११.८६ टक्के) तर इतर खर्चासाठी १२५०० रूपये (म्हणजे ८.४९ टक्के) खर्च होत आहे.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, १०० कुटुंबाच्या एकूण खर्चापैकी सर्वाधिक खर्च भोजनावरती (६०.३३ टक्के) होत आहे. महत्वाचे म्हणजे कपडे व शिक्षणापेक्षाही आरोग्यावरती अधिक (११.८६ टक्के) खर्च होत आहे. आणि शिक्षणाचा विचार करता अगदी कमी प्रमाणात अशी कुटुंब शिक्षणावर खर्च करतात. कुटुंबाच्या इतर खर्चामध्ये प्रवास, सण - उत्सव इत्यादी खर्चाचा समावेश आहे.

### कोष्टक क्र.३.२०

### कुटुंबाच्या उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | उत्पन्नातुन खर्च भागत असलेली कुटुंब | ८० | ८०.०० |
| २ | उत्पन्नातुन कधी कधी खर्च भागत नसलेली कुटुंब | २० | २०.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२० मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १०० कुटुंबापैकी किती कुटुंबांचा आपल्या स्वत:च्या उत्पन्नातून खर्च भागत आहे व किती कुटुंबांचा आपल्या स्वत:च्या उत्पन्नातून खर्च भागत नाही याचे स्पष्टीकरण केलेले आहे. १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी ८० दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा (म्हणजे ८० टक्के कुटुंबाचा) स्वत:च्या उत्पन्नातुन खर्च भागत आहे. तर २० कुटुंबांचा (म्हणजे २० टक्के कुटुंबांचा) स्वत:च्या उत्पन्नातुन कधीकधी खर्च भागत नाही.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे कमी उत्पन्न, नियीमत कामाचा अभाव, महागाई इत्यादीमुळे कधीकधी दैनंदिन खर्च भागविण्यात ही अडचणी येतात.

अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १०० कुटुंबापैकी ज्या २० कुटुंबाचा आपल्या उत्पन्नातुन कधीकधी दैनंदिन खर्च ही भागत नाही ती कुटुंब अशावेळी आपला खर्च भागविण्यासाठी कोणती तरतूद करतात. याचे विश्लेषण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ३.२१

## कुटुंबांचा खर्च भागविण्यासाठीच्या तरतुदीचे विश्लेषण

| अ.नं. | खर्च भागविण्याची तरतुद | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | हात उसणे पैसे घेणे | ०९ | ४५.०० |
| २ | कामावरती उचल घेणे | ०२ | १०.०० |
| ३ | उधारी | ०३ | १५.०० |
| ४ | सावकारी कर्ज | ०६ | ३०.०० |
| | एकूण | २० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२१ मध्ये ज्या २० कुटुंबांचा काही वेळेस स्वतःच्या उत्पन्नातुन खर्च भागत नाही त्यावेळेस ती कुटुंब स्वतःचा खर्च भागविण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करतात याचे वर्णन केले आहे. १०० कुटुंबापैकी जी २० कुटुंब कधी कधी उत्पन्न कमी मिळाल्या मुळे खर्च भागत नाही असे म्हणतात. त्यांच्यापैकी ९ कुटुंब (म्हणजे ४५ टक्के कुटुंब ) हात उसणे पैसे घेवून आपला खर्च भागवितात. तर कामावर उचल घेवून २ कुटुंब (म्हणजेच १० टक्के कुटुंब ) खर्च भागवितात. उधारीवरती किराणामाल, भाजीपाला किंवा इतर वस्तु आणून आपला खर्च भागविणारी ३ कुटुंब (म्हणजे १५ टक्के कुटुंब ) आहेत. तसेच आपला दैनंदिन खर्च न भागल्यास ६ कुटुंब (म्हणजे ३० टक्के कुटुंब ) सावकारांकडुन कर्ज घेत आहेत. विशेष म्हणजे ही ६ कुटुंब कधी काळी खर्च न भागल्यावरच सावकाराकडुन कर्ज घेतात .

थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, ज्या कुटुंबांचा मासिक उत्पन्नातुन कधी कधी दैनंदिन खर्च भागत नाही अशी कुटुंब हात उसणे पैसे घेणे, कामावरती उचल घेणे, उधारीने व्यवहार करणे , सावकाराकडुन कर्ज घेऊन आपला दैनंदिन खर्च भागवितात .

## कोष्टक क्र. ३.२२

## कुटुंबांच्या मासिक बचतीचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | मासिक बचत करणारी कुटुंब | ४७ | ४७.०० |
| २ | मासिक बचत न करणारी कुटुंब | ५३ | ५३.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२२ मध्ये १०० अभ्यासासाठी निवडलेल्या कुटुंबापैकी मासिक बचत करणा–या कुटुंबांचे व मासिक बचत न करणा–या कुटुंबांचे वर्गीकरण दिले आहे. एकूण १०० कुटुंबापैकी ४७ कुटुंब (म्हणजे ४७.०० टक्के कुटुंब ) मासिक बचत करीत आहेत. तर ५३ कुटुंब (म्हणजे ५३ टक्के कुटुंब ) मासिक बचत करीत नसल्याचे दिसून येते .

थोडक्यात, दारिद्रय रेषेखालील जवळ जवळ निम्मी कुटुंब अजूनही कोणत्याही प्रकारची बचत करीत नसल्याचे दिसुन येते. विशेषत: दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे कमी उत्पन्न, महागाई इत्यादी कारणांने त्यांना बचत करता येत नाही.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी जी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत. त्यांच्या बचतीचे प्रमाण कसे आहे हे पुढील कोष्टकात दर्शवलेले आहे

## कोष्टक क्र. ३.२३

## कुटुंबांच्या मासिक बचतीचे प्रमाण

| अ.नं. | बचतीचे टप्पे रू. | कुटुंबाची संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १–१०० | ४३ | ९१.४९ |
| २ | १०१–२०० | ०२ | ४.२५ |
| ३ | २०१–३०० | ०० | ०.०० |
| ४ | ३०१–४०० | ०१ | २.१३ |
| ५ | ४०१–५०० | ०१ | २.१३ |
| | एकूण | ४७ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२३ मध्ये बचत करीत असलेल्या कुटुंबाच्या मासिक बचतीच्या प्रमाणाचे विश्लेषण केले आहे. कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे १०० पैकी जी एकूण ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत. त्यापैकी ४३ कुटुंब (म्हणजे ९१.४९ टक्के कुटुंब ) दरमहा रूपये १ ते १०० या दरम्यान बचत करीत आहेत. मासिक रूपये १०१ ते २०० च्या दरम्यान बचत करणारी ०२ कुटुंब (म्हणजे ४.२५ टक्के कुटुंब ) आहेत. मासिक रूपये २०१ ते ३०० पर्यंत बचत करणारे एकही कुटुंब नाही. १ कुटुंब (म्हणजे २.१३ टक्के कुटुंब) मासिक रूपये ३०१ ते ४०० या दरम्यान बचत करीत आहे. तर रूपये ४०१ ते ५०० पर्यत बचत करणारे सुध्दा १ कुटुंब (म्हणजे २.१३ टक्के कुटुंब ) आहे.

थोडक्यात, एकूण १०० कुटुंबापैकी बचत करणारी जी ४७ कुटुंब आहेत. त्यांच्यापैकी रूपये १ ते १०० पर्यत बचत करणारी अधिक कुटुंब आहेत. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न कमी असल्याने व तेही उपभोगावर खर्च होत असल्याने बचतीसाठी विशेष रक्कम शिल्लक राहत नाही. तसेच जी कुटुंब मासिक बचत करीत आहेत त्यांची बचत ही अतिशय कमी असल्याचे दिसुन येते.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी जी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत ती कुटुंब आपल्या उत्पन्नानुसार बचत कशा पध्दतीने करतात. याचे विश्लेषण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ३.२४

## उत्पन्नाच्या टप्प्यानुसार बचतीचे विश्लेषण

| अ.नं. | मासिक सरासरी उत्पन्नाचे टप्पे रू. | बचत करणारी कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | २५० पेक्षा कमी | ०० | ०० |
| २ | २५०-४९९ | ०१ | २.१३ |
| ३ | ५००-१४९९ | २८ | ५९.५७ |
| ४ | १५००-२५०० | १८ | ३८.३० |
| ५ | २५०० पेक्षा जास्त | ०० | ०.० |
| | एकूण | ४७ | १००.०० |

कोष्टक क्रं. ३.२४ मध्ये कुटुंबांच्या उत्पन्नाच्या टप्प्यानुसार बचतीच्या प्रमाणाचे विश्लेषण केले आहे. १०० कुटुंबापैकी जी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत त्यांचे मासिक उत्पन्न आणि मासिक बचतीचे प्रमाण याचे वर्णन कोष्टकात केले आहे. मासिक बचत करणा-या ४७ कुटुंबापैकी १ कुटुंबाचे (म्हणजे २.१३ टक्के कुटुंबाचे ) मासिक सरासरी उत्पन्न रूपये २५०-४९९ पर्यत आहे. रूपये ५०० ते १४९९ चा मासिक उत्पन्नाच्या टप्प्यात २८ कुटुंब (म्हणजे ५९.५७ टक्के कुटुंब ) मासिक बचत करणारी आहेत. रूपये १५०० ते २५०० पर्यत उत्पन्न मिळविणा-या टप्प्यातील १८ कुटुंब (म्हणजे ३८.३० टक्के कुटुंब )बचत करीत आहेत. मासिक सरासरी उत्पन्न २५० पेक्षा कमी असणारे व २५०० पेक्षा जास्त उत्पन्न मिळविणारे एकही कुटुंब नसल्याने या टप्प्यात बचत झालेली दिसत नाही.

थोडक्यात कोष्टकांवरून असे स्पष्ट होते की, मासिक सरासरी रूपये ५०० ते १४९९ इतके उत्पन्न मिळविणा-या कुटुंबाचीच मासिक बचत जास्त प्रमाणात आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटंबापैकी जी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत. ती कुटुंब आपली बचत कोठे करतात या विषयी पुढील कोष्टकात विश्लेषण केले आहे.

## कोष्टक क्र. ३.२५

## मासिक बचतीच्या ठिकाणाचे विश्लेषण

| अ.नं. | मासिक बचतीचे ठिकाण | कुटुंबांची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | स्वत:च्या बॅंक खात्यात | ०१ | २.१३ |
| २ | बचत गटात | ३६ | ७६.५९ |
| ३ | पोस्ट ऑफीस | ०२ | ४.२६ |
| ४ | विमा | ०१ | २.१३ |
| ५ | घर | ०७ | १४.८९ |
| | एकूण | ४७ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२५ मध्ये जी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत त्यांच्या बचतीच्या ठिकाणचे वर्गीकरण केले आहे. एकूण १०० कुटुंबापैकी ४७ कुटुंब मासिक बचत करीत आहेत. ४७ कुटुंबापैकी १ कुटुंब (म्हणजे २.१३ टक्के कुटुंब ) स्वत:च्या बॅंक खात्यात बचत करीत आहे. बचत गटात मासिक बचत करणारी ३६ कुटुंब (म्हणजे ७६.५९ टक्के कुटुंब ) आहेत. २ कुटुंब (म्हणजे ४.२६ टक्के कुटुंब ) पोस्ट ऑफीसमध्ये बचत करीत आहेत. १ कुटुंब (म्हणजे २.१३ टक्के कुटुंब ) विमा उतरवून त्यात आपली बचत करीत आहेत. तर स्वत:च्या घरातच बचत ठेवणारी ७ कुटुंब (म्हणजे १४.८९ टक्के कुटुंब ) आहेत.

सध्या ग्रामीण भागात बचत गटांची स्थापना मोठया प्रमाणात झालेली असल्यामूळे अनेक लोक त्या ठिकाणी बचत करण्यास उत्सुक आहेत. मासिक बचत करत असलेल्या ४७ कुटुंबापैकी ३६ कुटुंब बचत गटांत बचत करीत आहेत . परंतु तरीही दुसरी आकडेवारी पाहता ग्रामीण भागात बॅंका, पोस्ट ऑफीस, विमा यामध्ये बचत करणारी कुटुंब अगदी नगण्य आहेत .

कर्ज प्रकरण , सरकारी योजनांची रक्कम मिळण्यासाठी बॅंकेत खाते उघडणे , शाळेतील मुलांना स्कॉलरशिपसाठी मिळालेला चेक वटविणे, बचत गट इत्यादीसाठी १०० कुटुंबापैकी ६२ कुटुंबांचे बॅंकेत खाते आहे परंतु तरीही बचत करणा-या ४७ कुटुंबापैकी फक्त १ कुटुंब बॅंकेत बचत करीत आहे.

कोष्टक क्र. ३.२६

बॅकेतील कुटुंबाच्या खात्या विषयीचे वर्गीकरण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| ०१ | बॅकेत खाते असणारी कुटुंब | ६२ | ६२.०० |
| ०२ | बॅकेत खाते नसणारी कुटुंब | ३८ | ३८.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२६ वरील कोष्टकावरुन हे स्पष्ट होते की , अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १०० कुटुंबापैकी ६२ कुटुंबांचे (म्हणजे ६२ टक्के कुटुंबांचे ) बॅकेत खाते आहे. तर ३८ कुटुंबांचे (म्हणजे ३८ टक्के कुटुंबांचे ) बॅकेत खाते नसल्याचे दिसून येते.

ग्रामीण भागात कमी बॅक शाखांचा अभाव, लोकांचे कमी उत्पन्न, कमी शिक्षण इत्यादीमुळे ग्रामीण लोकांचा विशेषत: दारिद्रय रेषेखालील लोकांचा बॅकेशी जास्त संबंध येत नाही.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी ज्या ६२ कुटुंबाचे बॅकेत खाते आहे त्यापैकी किती कुटुंबांनी बॅक कर्जाचा लाभ घेतला आहे, याचे स्पष्टीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ३.२७

बॅक कर्ज घेणा-या कुटुंबांचे वर्गीकरण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | बॅक कर्ज घेणारी कुटुंब | ०५ | ८.०६ |
| २ | बॅक कर्ज न घेणारी कुटुंब | ५७ | ९१.९४ |
| | एकूण | ६२ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२७ मध्ये बॅक कर्ज घेणा-या व न घेणा-या कुटुंबांचे वर्गीकरण दर्शविलेले आहे वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे बॅकेशी संबंध असलेल्या ६२ कुटुंबापैकी

फक्त ५ कुटुंबांनी (म्हणजे ८.०६ टक्के कुटुंबांनी ) कर्ज घेतले आहे. तर ५७ कुटुंबानी (म्हणजे ९१.८४ टक्के कुटुंबांनी ) बॅकेकडून कर्ज घेतलेले नाही.

थोडक्यात , वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील विशेषत: दारिद्रयरेषेखालील कुटुंब अजुनही बॅकेकडुन कर्ज घेण्यास उत्सुक नाहीत. बॅक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता, कर्ज मिळण्यातील दिरंगाई, बॅकेतले हेलपाटे, योग्य तारणाचा अभाव, ओळखीचा अभाव, जामीनदार न मिळणे इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागातील बरीचशी दारिद्रयरेषेखालील कुटुंब बॅक कर्जा पासून दूर राहिली आहेत .

### कोष्टक क्र. ३.२८

### सरकारी कर्ज माफी (२००७-२००८) योजनेच्या लाभाचे वर्गीकरण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | कर्जमाफी झालेली कुटुंब | ०३ | ६०.०० |
| २ | कर्जमाफी न झोलेली कुटुंब | ०२ | ४०.०० |
| | एकूण | ०५ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२८ मध्ये २००७-०८ मध्ये सरकारी कर्ज माफी योजनेचा लाभ किती कुटुंबाला मिळालेला आहे हे दर्शविलेले आहे . ज्या ०५ कुटुंबांनी बॅक कर्ज घेतले होते त्यापैकी ३ कुटुंबांना (म्हणजे ६०.०० टक्के कुटुंबांना ) सरकारी कर्जमाफी योजनेचा लाभ झाला आहे. तर २ कुटुंबांना (म्हणजे ४० टक्के कुटुंबांना ) सरकारी कर्जमाफी योजनेचा लाभ झालेला नाही. ज्या कुटुंबांना कर्ज माफीचा फायदा झाला नाही त्या कुटुंबांनी बॅक कर्जाचे वेळेवर हप्ते भरले होते, त्यामुळेच नियमित कर्ज फेड केल्याकारणांने कर्जमाफी झाली नाही.

### कोष्टक क्र. ३.२९

### कुटुंबाचे सावकारी कर्जाशी असणा-या संबंधाचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | सावकारी कर्ज घेणारी कुटुंब | २२ | २२.०० |
| २ | सावकारी कर्ज न घेणारी कुटुंब | ७८ | ७८.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.२९ मध्ये एकूण कुटुंबापैकी सावकारी कर्जाशी असणा-या कुटुंबांच्या संबंधाविषयी विश्लेषण दिले आहे. कोष्टकांत दर्शविलेप्रमाणे एकूण १०० कुटुंबापैकी २२ कुटुंब (म्हणजे २२. टक्के कुटुंब ) सावकाराकडुन कर्ज घेणारी आहेत. तर ७८ कुटुंब (म्हणजे ७८ टक्के कुटुंब ) सावकारी कर्ज न घेणारी आहेत. विशेषत: ही २२ कुटुंब सावकाराकडून नेहमीच कर्ज घेत असल्याचे दिसून आले आहे.

ग्रामीण भागातील बॅकांचा कमी प्रसार, बॅक कर्ज प्रकरणासाठीची अडचण आणि काही अपत्कालीन घटना घडलीच तर दुस-या बाजुला सावकारांकडून लागलीच त्वरीत कर्ज यामुळे अजनूही बरीचशी ग्रामीण दारिद्रय रेषेखालील कुटुंब सावकाराकडून कर्ज घेत असल्याचे दिसत आहे.

### कोष्टक क्र. ३.३०

### कुटुंबाचे राहत्या घराच्या प्रकाराचे वर्गीकरण

| अ.नं. | घराचा प्रकार | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | कच्चे | ३० | ३०.०० |
| २ | अर्धवट पक्के | २७ | २७.०० |
| ३ | पक्के | ४३ | ४३.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३० वरुन हे स्पष्ट होते की अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण १०० कुटुंबांपैकी ३० कुटुंब (म्हणजे ३०.०० टक्के कुटुंब ) कच्च्या घरात राहत आहेत. तर ४३ कुटुंब (म्हणजे ४३.०० टक्के कुटुंब ) पक्क्या घरात राहत आहेत. २७ कुटुंब (म्हणजे २७.०० टक्के कुटुंब ) अर्धवट पक्कया घरात राहत आहेत.

थोडक्यात , तालुक्यातील आणखीही जवळ - जवळ निम्मी दारिद्रय रेषेखालील कुटुंब कच्च्या व अर्धवट पक्क्या घरात राहत आहेत. ज्या कुटुंबाकडे पक्की घरी आहेत ती त्यांना सरकारी घरकुल योजनेतुन मिळालेली आहेत. घर बांधणीसाठीचा खर्च जास्त असल्यामूळे अनेक कुटुंबांना इच्छा असूनही पक्की घरे बांधता येत नाहीत त्यामुळे दारीद्रय रेषेखालील कच्च्या घरात राहणारी कुटुंब अजुनही सरकारी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याची वाट पाहत आहेत.

## कोष्टक क्र. ३.३१

## राहत्या घराच्या प्रकारावरुन वर्गीकरण

| अ.नं. | घराचा प्रकार | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | वडीलोपार्जित घर | २७ | २७.०० |
| २ | स्वत: बांधलेले कच्चे घर | ३० | ३०.०० |
| ३ | सरकारी योजनेतुन मिळालेले घर | ४३ | ४३.०० |
| | एकुण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३१ मध्ये कुटुंबाकडे असणा-या घराच्या प्राप्ती विषयीचे वर्गीकरण केलेले आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण १०० कुटुंबापैकी २७ कुटुंबाकडे (म्हणजे २७.०० टक्के कुटुंबाकडे ) वडीलोपार्जित घरे आहेत. ३० कुटुंबाकडे (म्हणजे ३० टक्के कुटुंबाकडे ) स्वत: तयार केलेले छपराची कच्ची घरे आहेत. तर सरकारी योजनेतुन घरे मिळालेली ४३ (म्हणजे ४३.०० टक्के कुटुंबाकडे ) कुटुंब आहेत. दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचे अल्पउत्पन्न, घर बांधणीचा जास्त खर्च यांमुळे आणखी ब-याच कुटुंबांनी स्वत:ची पक्की घरे बांधली नाहीत.

## कोष्टक क्र. ३.३२

## स्वच्छतागृह असणा-या व नसणा-या कुटुंबांचे वर्गीकरण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | स्वच्छतागृह उपलब्ध असलेली कुटुंब | ४५ | ४५.०० |
| २ | स्वच्छतागृह उपलब्ध नसलेली कुटुंब | ५५ | ५५.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी ज्या कुटुंबाकडे स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध आहे व ज्या कुटुंबाकडे स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नाही याचे वर्गीकरण दर्शवले आहे .

एकूण १०० कुटुंबापैकी ४५ कुटुंबांच्या (म्हणजे ४५ टक्के कुटुंबांच्या ) घरी स्वच्छतागृहाची उपलब्धता आहे. तर ५५ कुटुंबांच्या (म्हणजे ५५ टक्के कुटुंबांच्या ) घरी स्वच्छता गृहाची उपलब्धता नाही. विशेषत: ज्या कुटुंबाकडे पक्की घरे आहेत अशा कुटुंबाकडेच स्वच्छतागृह असल्याचे दिसुन येते. तसेच ज्या कुटुंबाना सरकारी इंदिरा आवास योजनेतुन घरकूल प्राप्त झाली आहेत. अशा सर्वाकडे स्वच्छता गृह उपलब्ध आहेत. ज्या कुटुंबाकडे स्वच्छता गृह उपलब्ध नाहीत त्यांचे अल्पउत्पन्न, स्वच्छता गृह बांधण्याचा खर्च, जागेचा अभाव, पाण्याच्या अपु-या सोयी इत्यादी मुळे ब-याच कुटुंबाकडे स्वच्छता गृह नाहीत.

## कोष्टक क्र. ३.३३

## कुटुंबाना वर्षभर मिळणा-या आहाराविषयीचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | वर्षभर पोटभर आहार मिळणारी कुटुंब | ९१ | ९१.०० |
| २ | वर्षभर पोटभर आहार न मिळणारी कुटुंब | ०९ | ०९.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबाना वर्षभर पोटभर आहार मिळतो की नाही याची माहिती दिलेली आहे. वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे १०० कुटुंबापैकी ९१ कुटुंबाना (म्हणजे ९१ टक्के कुटुंबाना ) वर्षभर पोटभर आहार मिळतो. तर ०९ कुटुंबाना (म्हणजे ०९ टक्के कुटुंबाना ) वर्षभर पुरेसा आहार मिळत नाही. दररोज काम न मिळणे , अल्प वेतन यामुळे त्यांना वर्षभर पुरेसा आहार मिळत नाही.

## कोष्टक क्र. ३.३४

## कुटुंबाकडील उपलब्ध असलेल्या वाहनांचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | सायकल | ७५ | ७५.०० |
| २ | मोटार सायकल | ०५ | ५.०० |
| ३ | कोणतेही वाहन नसणारे | २० | २०.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३४ मध्ये कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या वाहनांचे विश्लेषण केले आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी ७५ कुटुंबाकडे (म्हणजे ७५ टक्के कुटुंबाकडे ) सायकल हे वाहन आहे. मोटार सायकल असणारी ५ कुटुंब (म्हणजे ५ टक्के कुटुंब ) आहेत. दारिद्रय रेषेखालील जास्तीत जास्त कुटुंब मजुरी करीत असल्याने त्यांचे उत्पन्नही अल्प आहे. त्यामुळेच अशा कुटुंबाला फक्त सायकली वापरणेच परवडत आहे. विशेष म्हणजे कोणत्याच प्रकारचे वाहणे नसणारी २० कुटुंब (म्हणजे २० टक्के कुटुंब ) आहेत.

## कोष्टक क्र. ३.३५

## कुटुंबातील व्यक्तींच्या मोठया आजारा विषयीचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबातील व्यक्तीला मोठा आजार असणारी कुटुंब | २९ | २९.०० |
| २ | कुटुंबातील व्यक्तीला मोठा आजार नसणारी कुटुंब | ७१ | ७१.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबातील व्यक्तिच्या मोठया आजाराविषयीचे विश्लेषण दिले आहे. वरील कोष्टकांवरुन हे स्पष्ट होते की , २९ कुटुंबातील (म्हणजे २९.०० टक्के कुटुंबातील ) कोणास तरी मोठा आजार असल्याचे दिसून येते आहे. तर ७१ कुटुंबातील (म्हणजे ७१ टक्के कुटुंबातील ) किोणत्याही व्यक्तिस मोठा आजार नाही असे दिसून येते.

एकूण १०० कुटुंबापैकी ज्या २९ कुटुंबातील व्यक्तींना धाप लागणे, दमा, अर्धांगवायू, अपंगत्व , रक्तदाब अशा प्रकारचे मोठे आजार आहेत. अशा आजारावर उपचार सुरू आहेत की नाही याचे स्पष्टीकरण पुढील कोष्टकात दर्शवले आहे .

## कोष्टक क्र. ३.३६

## मोठया आजारावरील उपचारासंबंधी विश्लेषण

| अ. नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | उपचार चालू असणारी कुटुंब | २२ | ७५.८६ |
| २ | उपचार चालू नसणारी कुटुंब | ०७ | २४.१४ |
| | एकूण | २९ | १००.०० |

कोष्टक क्र.३.३६ मध्ये मोठा आजार असणा-या कुटुंबांच्या उपचारासंबंधी विश्लेषण केले आहे. १०० कुटुंबापैकी मोठा आजार असणारी जी २९ कुटुंब आहेत. त्यापैकी २२ कुटुंबातील व्यक्तिंवर (म्हणजे ७५.८६ टक्के कुटुंबातील व्यक्तिंवर ) सध्या उपचार सुरू आहेत. तर ७ कुटुंब (म्हणजे २४.१४ टक्के कुटुंब ) अशी आहेत की, त्यांना मोठया आजारावर उपचार घेता येत नाही. अशा कुटुंबाचे मासिक अल्प उत्पन्न, उपचारावरील प्रचंड खर्च इत्यादी मुळे त्यांना मोठया आजारावर उपचार घेणे शक्य होत नाही.

## कोष्टक क्र.३.३७

## कुटुंबांचा गावातील राजकारणातील सहभाग

| अ.नं. | तपशिल | कुटुंबांची संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | राजकारणात सहभाग होणारी कुटुंब | ०५ | ०५.०० |
| २ | राजकारणात सहभाग न घेणारी कुटुंब | ९५ | ९५.०० |
| | एकुण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र.३.३७ मध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या राजकीय सहभागाविषयीचे विश्लेषण केले आहे. वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी फक्त ०५ कुटुंबांचा (म्हणजे ५.०० टक्के कुटुंबांचा ) राजकारणात सहभाग असलेला दिसून येतो आहे. तर ९५ कुटुंबाचा (म्हणजे ९५.०० टक्के कुटुंबांचा) राजकारणात कोणताही सहभाग नसलेला दसून येतो .

दारिद्ररेषेखालील कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कमकुवत, हीन सामाजिक दर्जा यामुळे बरीचशी कुटुंब राजकारणांशी व त्यासंबंधीत कोणत्याही गोष्टीत भाग घेत नाहीत.

## कोष्टक क्र ३.३८

## कुटुंबाकडे असणा-या शेतजमिनी विषयी विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण(टक्के) |
|---|---|---|---|
| १ | स्वत:ची शेतजमिन असणारी कुटुंब | २३ | २३.०० |
| २ | स्वत:ची शेतजमिन नसणारी कुटुंब | ७७ | ७७.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र.३.३८ मध्ये कुटुंबाकडे असणा-या स्वत:च्या शेतजमिनीविषयीचे विश्लेषण दिले आहे. कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे एकूण १०० कुटुंबापैकी २३ कुटुंबाकडे (म्हणजे २३.०० टक्के कुटुंबाकडे) स्वत:ची शेतजमिन आहे. तर ७७ कुटुंबाकडे (म्हणजे ७७.०० टक्के कुटुंबाकडे) स्वत:ची शेतजमिन नाही. ज्या कुटुंबाकडे शेतजमिन उपलब्ध आहे ती त्यांना वडिलोपार्जीत मिळालेली आहे.

१०० कुटुंबापैकी २३ कुटुंबाकडे स्वत:ची शेतजमिन असतानाही फक्त सहा कुटुंब शेती करीत आहेत कारण उरलेल्या कुटुंबाकडील शेती ही माळरानाची , पाण्याचा अभाव असणारी आहेत. अशी शेती पिकण्यास योग्य नसल्याने व त्यात उत्पन्न ही कमी मिळत असल्याने शेती केली जात नाही . त्यामुळेच अशी कुटुंब शेती असतानाही मजुरी करीत असल्याचे दिसून येते.

## कोष्टक क्र. ३.३९

## शेतजमिनीच्या प्रकारांवरून कुटुंबांचे विश्लेषण

| अ.नं. | शेतीचा प्रकार | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | बागाईत शेती | १ कुटुंब | ४.३५ |
| २ | जिराईत शेती | २२ कुटुंब | ९५.६५ |
| | एकूण | २३ कुटुंब | १००.०० |

कोष्टक क्र. ३.३९ मध्ये शेतजमीनीच्या प्रकारावरून कुटुंबाचे विश्लेषण दिले आहे. दारिद्रय रेषेखालील एकूण १०० कुटुंबापैकी २३ कुटुंबाकडे स्वत:ची शेतजमीन आहे. २३ कुटुंबाकडे असणा–या ३७ एकर जमीनीपैकी फक्त १ कुटुंबाकडे (म्हणजे ४.३५ टक्के कुटुंबाकडे) बागाईत शेतजमिन आहे. तर २२ कुटुंबाकडे (म्हणजे ९५.६५ टक्के कुटुंबाकडे ) जिराईत शेती असल्याचे दिसत आहे. थोडक्यात दारिद्रय रेषेखालील ज्या २३ कुटुंबाकडे स्वत:ची शेतजमीन आहे त्यापैकी जास्तीत जास्त कुटुंबाकडे जिराईत शेती असल्याचे स्पष्ट होते .

## कोष्टक क्र. ३.४०

## कुटुंबांच्या बचत गटातील सहभागाविषयीचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | बचत गटात सहभागी असणारी कुटुंब | ३६ | ३६.०० |
| २ | बचत गटात सहभागी नसणारी कुटुंब | ६४ | ६४.०० |
| | एकुण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४० मध्यें अभ्यासासाठी निवडलेल्या कुटुंबांच्या बचतगटातील सहभागा विषयी विवेचन दिले आहे. वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे एकूण १०० कुटुंबपैकी ३६ कुटुंबांचा (म्हणजे ३६ टक्के कुटुंबाचा ) बचत गटात सहभाग असल्याचे दिसून येते . तर ६४ कुटुंबाचा (म्हणजे ६४ टक्के कुटुंबाचा ) कुटुंबाचा बचत गटात सहभाग नसल्याचा दिसत आहे. काही कुटुंबाना बचतीचे महत्व पटले आहे. तसेच बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक परिस्थीती सुधारावी या दृष्टीकोनातून काही कुटुंब बचत गटात सहभागी झाली आहेत. तर काही कुटुंबांची आर्थिक परिस्थीती हालाकीची असल्याने, उत्पन्न कमी असल्याने बचतीचे महत्व नसल्याने अशी कुटुंब बचत गटात सहभागी झालेले दिसत नाहीत.

एकूण ज्या ३६ कुटुंबांचा बचत गटात सहभाग आहे त्याकुटुंबांनी बचत गटातून कर्ज घेतले आहे की नाही या विषयची माहीती पुढील कोष्टकात दर्शविलेली आहे.

## कोष्टक क्र. ३.४१

## बचत गटाकडून घेतलेल्या कर्जाचे विश्लेषण

| अ.नं. | तपशिल | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | बचत गटांतुन कर्ज घेतलेली कुटुंब | १२ | ३३.३३ |
| २ | बचत गटातुन कर्ज न घेतलेली कुटुंब | २४ | ६६.६७ |
| | एकूण | ३६ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४१ मध्ये बचत गटात समाविष्ट असणा-या कुटुंबानी बचत गटातुन घेतलेल्या कर्जाविषयीचे विवेचन दिले आहे. कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे बचत गटात समाविष्ट असणा-या एकूण ३६ कुटुंबापैकी १२ कुटुंबानी (म्हणजे ३३.३३ टक्के कुटुंबानी ) बचत गटांतुन कर्ज घेतले आहे. तर २४ कुटुंबानी (म्हणजे ६६.६७ टक्के कुटुंबानी ) बचत गटातुन कर्ज घेतलेले नाही.

थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, बचत गटात समाविष्ट असणा-या काही थोडयाच कुटुंबानी बचत गटातुन कर्ज घतले आहे.

एकूण १०० कुटुंबातील जी ३६ कुटुंब बचतगटात सहभागी आहेत व त्यापैकी ज्या १२ कुटुंबानी बचत गटातून कर्ज घेतले आहे. ते त्यांना किती प्रमाणात मिळाले आहे. या संदर्भातील माहीती  पुढील कोष्टकात स्पष्ट केली आहे.

## कोष्टक क्र. ३.४२

## बचत गटांतील कर्ज रक्कमेचे विश्लेषण

| अ.नं. | कर्ज रक्कम रू. | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १-२५०० | ०१ | ८.३३ |
| २ | २५०१-५००० | ०९ | ७५.०० |
| ३ | ५००१-७५०० | ०२ | १६.६७ |
| ४ | ७५०१-१०००० | ०० | ००.०० |
| | एकूण | १२ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४२ मध्ये बचत गटांतून कर्ज घेतलेल्या कुटुंबाच्या कर्ज रक्कमेचे विश्लेषण केले आहे. कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे रू. १-२५०० इतके कर्ज घेणारे १ कुटुंब (म्हणजे ८.३३ टक्के कुटुंब ) आहे. रूपये २५०१-५००० पर्यत कर्ज घेणारी ९ कुटुंब (म्हणजे ७५ टक्के कुटुंब ) कुटुंब आहेत. २ कुटुंब (म्हणजे १६.६७ टक्के कुटुंब ) अशी आहेत की, त्यांनी ५००१-७५०० रूपये पर्यत कर्ज घेतलेले आहे. याठिकाणी रुपये ७५०१-१०००० पर्यत कर्ज घेतलेले एकही कुटुंब दिसत नाही.

बचत गटांचा लहान व्यवहार, कर्जफेडीची चिंता इत्यादीमुळे बचत गटांतील सभासदांना अल्पप्रमाणातच कर्ज पुरवठा केला जातो. म्हणजे कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे अशा कुटुंबाना रूपये ७५०० पर्यंतच कर्ज मिळालेले दिसत आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबातील जी ३६ कुटुंब बचत गटात सहभागी आहेत, त्यापैकी ज्या १२ कुटुंबानी बचत गटातून कर्ज घेतले आहे. ते त्यांना किती टक्के व्याजदराने मिळाले आहे या संदर्भात पुढील कोष्टकात स्पष्टीकरण केले आहे.

## कोष्टक क्र. ३.४३

## बचत गटांतुन मिळणा-या कर्जावरील मासिक व्याज दराचे विश्लेषण

| अ.नं. | मासिक व्याज दर(टक्के) | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | १ | ०० | ००.०० |
| २ | २ | १२ | १००.०० |
| ३ | ३ | ०० | ००.०० |
| ४ | ४ | ०० | ००.०० |
| ५ | ५ | ०० | ००.०० |
| | एकूण | १२ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४३ मध्ये बचत गटांतुन मिळणा-या कर्जावरील मासिक व्याजदराचे विश्लेषण केले आहे. ज्या १२ कुटुंबानी बचत गटांकडून कर्ज घेतले आहे. त्यापैकी सर्वच्या सर्व १२ कुटुंबाना (म्हणजे १०० टक्के कुटुंबाना ) मासिक २ टक्के व्याजदरानेच कर्ज मिळालेले आहे.

बचतगटांना सरकारच्या सहकार्यातुन बॅकाकडून वार्षिक ४ टक्के व्याजदराने कर्ज मिळते. त्यामुळे बचत गट हे आपले उत्पन्न वाढवून भांडवल उभारणी करण्यासाठी मासिक २ टक्के व्याजदराने सभासदांना कर्ज पुरवठा करीत आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी जी ३६ कुटुंब बचत गटात सहभागी आहेत त्यापैकी ज्या १२ कुटुंबानी बचत गटाकडून कर्ज घेतले आहे ते त्यांना कशासाठी मिळाले आहे. त्याचे स्पष्टीकरण पुढील कोष्टकात स्पष्टीकरण केले आहे.

## कोष्टक क्र. ३.४४

## बचत गटांतील कर्जाच्या वापरांविषयीचे विश्लेषण

| अ.नं. | कर्जाचा वापर | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | शेळया मेंढया खरेदी | ०८ | ६६.६७ |
| २ | घरगुती खर्च | ०४ | ३३.३३ |
| | एकूण | १२ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४४ मध्ये बचत गटाकडून कर्ज घेतलेल्या सहभागी असलेल्या कुटुंबानी कर्जाचा वापर कशासाठी केला आहे. याचे विवेचन केले आहे. बचत गटाकडून कर्ज घेतलेल्या १२ कुटुंबापैकी ०८ कुटुंबानी (म्हणजे ६६.६७ टक्के कुटुंबानी ) शेळया - मेंढया खरेदीसाठी कर्ज घेतले आहे. तर ४ कुटुंबानी (म्हणजे ३३.३३ टक्के कुटुंबानी ) घरगुती खर्चासाठी बचत गटाकडून कर्ज घेतले आहे.

थोडक्यात, ग्रामीण भागात शेळया मेंढया खरेदी करण्यासाठी तसेच घरगुती खर्चासाठीही बचत गटाकडून कर्ज घेतले जाते.

## कोष्टक क्रं. ३.४५

## सरकारी योजनांचा लाभ मिळालेली कुटुंब

| अ.नं. | तपशिल | लाभार्थी कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | लाभार्थी कुटुंब | ९४ | ९४.०० |
| २ | लाभ न मिळालेली कुटुंब | ६ | ६.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

कोष्टक क्र .३.४५ मध्ये सरकारी योजनांचा लाभ मिळालेल्या कुटुंबाचे विश्लेषन केलेले आहे. अभ्यासासाठी घेतलेल्या एकूण १०० कुटुंबापैकी ९४ कुटुंबाना (म्हणजे ९४ टक्क कुटुंबाना ) सरकारी योजनांचा लाभ झाला आहे. तर ६ कुटुंबाना (म्हणजे ६ टक्के कुटुंबाना )

कोणत्याही प्रकारच्या सरकारी योजनांचा लाभ मिळालेला नाही हे वरील कोष्टकावरुन स्पष्ट होते.

सरकार मार्फत दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना दारिद्रयातून बाहेर काढण्यासाठी अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. अशा योजनांच्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना मदत देऊन दारिद्रय निर्मूलनाचे उद्दीष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु माळशिरस तालुकयातील दारिद्रय रेषेखालील काही कुटुंब सरकारी योजनांच्या लाभापासून दूर आहेत. सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणा-या कागदपत्राची पुर्तता होत नसल्यामुळे तसेच घरकुला सारख्या योजनांसाठी स्वत:ची जागा उपलब्ध नसल्याने अशा योजनाचा लाभ मिळण्यात अडचणी येतात.

अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी ज्या ९४ कुटुंबाना सरकारी योजनांचा लाभ झाला आहे. त्यापैकी किती कुंटुबांना कोणत्या योजनांचा लाभ मिळाला आहे याचे स्पष्टीकरण पुढील कोष्टकात केलेले आहे.

## कोष्टक क्र. ३.४६

## सरकारी योजनांच्या लाभाचे विश्लेषण

| अ.नं. | सरकारी योजना | लाभार्थी कुटुंब | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १ | इंदिरा आवास घरकुल योजना | ४३ | ४५.७४ |
| २ | राजीव गांधी योजना नं. १ | ०० | ००.०० |
| ३ | राजीव गांधी योजना नं. २ | ०० | ००.०० |
| ४ | राजीव गांधी ग्रामीण विदयुतीकरण योजना | १३ | १३.८३ |
| ५ | मुलींसाठी सायकल | ०० | ००.०० |
| ६ | अंत्योदय योजना | ३८ | ४०.४३ |
| ७ | शिलाई मशिन | ०० | ००.०० |
| ८ | स्वच्छतागृहासाठी अनुदान | ०० | ००.०० |
| | एकूण | ९४ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४६ मध्ये सरकारकडुन दारिद्रयरेषेखालील कुटुंबाना मिळणा-या विविध योजनांचा किती कुटुंबानी लाभ घेतलेला आहे हे स्पष्ट केलेले आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना ज्या सरकारी योजनांचा लाभ मिळाला आहे, त्या योजनांपैकी इंदिरा आवास घरकुल योजनेचा ४३ कुटुंबाना (म्हणजे ४५.७४ टक्के कुटुंबाना ) लाभ झाला आहे. राजीव गांधी योजना नं. १ व राजीव गांधी योजना नं. २ या दोन्ही योजनांचा अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबांपैकी एकाही कुटुंबाला लाभ झाला नाही. १५ रूपये इतक्या कमी दरात राजीव गांधी ग्रामीण विदयुतीकरण योजनेचा लाभ १३ कुटुंबाना (म्हणजे १३.८३ टक्के कुटुंबाना ) झाला आहे. दारिद्रय रेषेखालील १०० कुटुंबापैकी एकाही कुटुंबास मुलींसाठी सायकल या योजनेचा लाभ झाला नाही. तसेच अंत्योदय योजनेचा लाभ ३८ कुटुंबाना (म्हणजे ४०.४३ टक्के कुटुंबाना ) झाला आहे. शिलाई मशिनचे मोफत वाटप व स्वच्छतागृहासाठी अनुदान या योजनेचा लाभ ही एकाही कुटुंबास झालेला दिसत नाही. थोडक्यात, वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना कोणत्याना कोणत्या प्रकारच्या  सरकारी योजनांचा लाभ झालेली कुटुंब जास्त आहेत. विशेषत: महत्वाचे म्हणजे या लाभार्थी कुटुंबांना फक्त एक दोन योजनांचाच लाभ झाला आहे. परंतु ६ कुटुंबांना (म्हणजे ६ टक्के कुटुंबांना ) मात्र कोणत्याच सरकारी योजनाचा लाभ झालेला नाही. थोडक्यात, माळशिरस तालुक्यातुन आणखीही ब-याच कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ झाला नाही.

# प्रकरण चौथे

# निष्कर्ष व शिफारशी

## प्रस्तावना :

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची पाहणी करून अशा कुटुंबाच्या संदर्भात पुढील प्रकारचा निष्कर्ष काढला आहे. दारिद्रयात जीवन जगणा-या कुटुंबाची आर्थिक बाजू फारच कमकुवत असते. त्यामुळेच अभ्यासात अशा कुटुंबाच्या आर्थिक परिस्थीतीचा आढावा घेतला आहे. त्याच बरोबर त्यांच्या  शिक्षण, आरोग्य, राजकीय, सामाजिक परिस्थीतीचाही या अभ्यासात आढावा घेण्यात आलेला आहे.

## १. साक्षर व निरक्षर व्यक्ती :

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील लोकांत शिक्षणाबद्दल उदासिनता दिसून येत असल्यामुळे शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाणही कमी राहीले आहे. माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १०० कुटुंबातील ४६३ व्यक्तींपैकी ३१६ साक्षर व्यक्ती (म्हणजे ६८.२५टक्के व्यक्ती ) व  १४७ (म्हणजे ३१.७५ टक्के व्यक्ती )निरक्षर व्यक्ती आहेत.

## २. शैक्षणिक स्थान :

माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील प्राथमिक व माध्यमिक पर्यतचे शिक्षण घेतलेले २९४ सदस्य (म्हणजे ९३.०४ टक्के सदस्य) आहेत. तर उच्च शिक्षण घेतलेले फक्त २२ सदस्य (म्हणजे ६.९६ टक्के सदस्य) आहेत. एकदंरीत उच्च शिक्षणाच्या अधिक खर्चामुळे व कुटुंबास उत्पन्नासाठी मजुरी करून हातभार लावण्यामुळे पुढील प्रकारचे शिक्षण अशा कुटुंबातील  सदस्यांना  घेता येत नाही. माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा शिक्षणावरील सरासरी मासिक खर्च फक्त १४५.०० रूपये इतका अल्प आहे.  म्हणजेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना आपल्या मुलांसाठी जादा खर्च करणे शक्य होत नाही. आणि त्यामुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील लोक उच्च शिक्षणापासुन वंचित राहिले आहेत.

## ३. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न :

माळशिरस तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे सरासरी मासिक उत्पन्न ५०० ते २५०० रूपये आहे. मासिक सरासरी उत्पन्न  इतके कमी असल्याने अशा कुटुंबाना आवश्यक त्या प्रमाणात किमान गरजांची पुर्तता करून घेत येत नाही. माळशिरस तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे. म्हणुनच मासिक अल्पउत्पन्न असणा-या कुटुंबाचा समावेश दारिद्र्य रेषेखालील यादीत करून त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी सरकारकडून दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना जादा प्रमाणात राबविणे आवश्यक आहे.

## ४. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची उपजिवीकेची साधने :

माळशिरस तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना उपजिवीकेसाठी शेतीतच मजुरी करावी लागत आहे. माळशिरस तालुक्यात शेतीत  मजुरी करणारी दारिद्र्य रेषेखालील कुटुंब ९४ टक्के आहेत. काही दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाकडे स्वत:ची शेत जमीन आहे. त्यातील ब-याचशा जमीन पडीक आहेत.ज्या जमिनीत अन्नधान्य पिकते त्याही फक्त उपजिवीकेपुरतेच अन्नधान्य देत असल्याने अशा जमिनीतुन फारसे उत्पन्न मिळत नाही.  माळशिरस तालुक्यातील २३ कुटुंबांकडे (म्हणजेच २३ टक्के कुटुंबांकडे ) स्वत:ची शेतजमीन असतानाही दुस-याच्या शेतीमध्ये अशा कुटुंबाना मजुरी करावी लागत आहे. माळशिरस तालुक्यात स्वत:ची शेती असूनही मजुरी करावी लागणारी दारिद्र्य रेषेखालील  ६ कुटुंब (म्हणजे ६ टक्के कुटुंब) आहेत. जास्तीत जास्त कुटुंबाचे मजुरी हेच उपजिवीकेचे साधन असल्याने अशा कुटुंबाचे मजुरी हेच उपजिवीकेचे साधन असल्याने अशा कुटुंबांचे उत्पन्न कमी आहे. शिवाय जी मजुरीची कामे मिळतात तीही आठवडयातील काही दिवसच मिळत आहेत.

## ५. ग्रामीण भागातील कारखानदारी :

माळशिरस तालुक्यात १०० दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या भागाचे सर्वेक्षण करताना असे आढळले की, फक्त १० टक्के दारिद्र्य रेषेखालील कुटुंब राहत असलेल्या भागातच कारखानदारी

(साखर) निर्माण झाली आहे. परंतु अशा ठिकाणीही दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळालेला दिसत नाही. दारिद्रय रेषेखालील लोकांचे कमी शिक्षण, प्रशिक्षण, अनुभवाचा अभाव इत्यादीमुळे अशा लोकांना कारखान्यांमध्ये रोजगार मिळत नाही.त्यामुळे दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील लोकांना रोजगारांसाठी शेतीतील मजुरीवरच अवलंबून रहावे लागत आहे.

## ६. रोजगार हमी योजना:

दारिद्रय निर्मूलनाचा एक महत्वाचा भाग म्हणून सरकार मार्फत रोजगार हमी योजना सुरू केली आहे. कामाच्या बदल्यात लोकांना काही रक्कम व काही धान्य दिले जाते. परंतु माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबापैकी एकही कुटुंब रोजगार हमीच्या कामाचा लाभ घेत नाही. रोजगार हमीच्या कामावरील कमी मजुरी, निकृष्ट अन्नधान्य , किचकट कामे इत्यादीमुळे रोजगार हमीच्या कामाचा दारिद्रय रेषेखालील कुटुंब लाभ घेत नाहीत.

## ७. इतर व्यवसाय :

दारिद्रय रेषेखालील कुटुंब उत्पन्न वाढविण्यासाठी मजुरी बरोबरच इतरही मार्गाने उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंब मजुरी शिवाय दुग्ध व्यवसाय, शेळी पालन, कुक्कुट पालन अशे व्यवसायही करीत असल्याचे दिसले आहे. मजुरीतुन पुर्ण कुटुंबांचे पालनपोषण व्यवस्थित रित्या होत नसल्याने ८१ कुटुंब ( म्हणजे ८१ टक्के कुटुंब) असे शेती निगडीत व्यवसाय करीत आहेत. माळशिरस तालुक्यात ४ कुटुंब ( म्हणजे ४ टक्के कुटुंब) दुग्धव्यवसाय करणारी आहेत. तर शेळीपालन व्यवसाय करणारी ७१ कुटुंब ( म्हणजे ७१ टक्के कुटुंब ) व कुक्कुटपालन व्यवसाय करणारी ६ कुटुंब ( म्हणजे ६ टक्के कुटुंब ) आहेत. अशा प्रकारचा शेती निगडीत व्यवसाय करणारी दारीद्रय रेषेखालील अनेक कुटुंब असली तरी त्यांचे उत्पन्न मात्र फारशे वाढत नाही.या व्यवसायातुन कुटुंबांच्या उपजिविकेपुरते उत्पन्न मिळत आहे. दुग्धव्यवसाय, शेळीपालन, व्यवसाय करणा-यांकडे फक्त एक-दोन जनावरे आहेत. त्यामुळे त्यातुनही विशेष असे उत्पन्न कुटुंबास प्राप्त होत नाही.

## ८. पुरूष व स्त्रीयांची शेतीतील मजुरी :

माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील ९४ कुटुंब ( म्हणजे ९४ टक्के कुटुंब ) फक्त मजुरी करून जगत आहेत. व ६ कुटुंब ( म्हणजे ६ टक्के कुटुंब ) मजुरी व शेती करणारी आहेत. पाहणीनुसार असे लक्षात आले की, पुरूषांना त्या भागात एका दिवसासाठी सरासरी ५० ते ६० रूपये इतकी मजुरी मिळत आहे. आणि स्त्रीयांना ३० ते ४० रूपये एवढी अल्प मजुरी मिळत आहे. तसेच आठवडयातील कामाचे दिवसही कमी आहेत. शेतीच्या सुगीच्या वेळी साधारणत: दररोज कामे मिळतात परंतु नंतरच्या मोठया काळात आठवडयातील ३ ते ४ दिवसच कामे मिळत आहेत. त्यामुळेच दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचा उत्पन्नाचा मजुरीचा मार्गही कमी असल्याने आर्थिक परीस्थिती हालाकीची बनली आहे. अशी कुटुंब मजुरीवरच जास्त अवलंबून असतात परंतु मजुरीचे कमी दिवस, मजुरीचे कमी पैसे यांचा विचार करता दारीद्रय रेषेखालील कुटुंब आणखी कित्येक वर्ष दारिद्रयात जीवन जगतील हे सांगता येत नाही.

## ९.कुटुंबांचा मासिक खर्च :

माळशिरस तालुक्यातील १०० दारीद्रय रेषेखालील कुटुंबांच्या पाहणीवरून असे लक्षात आले की, त्या प्रत्येक कुटुंबांचा एकुण सरासरी मासिक खर्च १४७२ रूपये आहे. माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांचे मासिक उत्पन्नच अल्प असल्याने मासिक खर्चही अतिशय कमी दिसत आहे. एवढयाशा अल्प उत्पन्नातुन कुटुंबांचा पुर्ण खर्च सहजासहजी भागत नाही. शिवाय या तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांत ४ ते ५ व्यक्तींचा समावेश आहे. त्यामुळे उत्पन्न व खर्च यांची सांगड घालणे कठीण असते. काही दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे उत्पन्न अगदीच कमी असल्याने त्यांच्या कुटुंबांचा कधी कधी खर्च ही भागत नाही. अशावेळेस उधारी, उसनवारी, उचल, सावकारी कर्ज इत्यादी मार्गातुन खर्च भागवावा लागतो. एकंदरीत माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे उत्पन्न अतिशय कमी असल्याने खर्चाचे प्रमाण ही कमी आहे. कमी उत्पन्नामुळे त्यांचे राहणीमानही निकृष्ट पध्दतीचे आहे.

## १०. मासिक बचत :

सध्याच्या काळात बचतीचे महत्व वाढल्याने दारिद्रय रेषेखालील काही कुटुंब मासिक बचत करताना दिसत आहेत. माळशिरस तालुक्यातील ४७ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंब मासिक बचत करीत आहेत. पूर्वी त्यानां बचतीची सवय नव्हती. परंतु अलीकडील काही वर्षातील बचत गटाच्या निर्मितीमुळे गावपातळीवर बचतीचे महत्व वाढले आहे. माळशिरस तालुक्यातील जी दारिद्रय रेषेखालील कुटुंब मासिक बचत करीत आहे त्यापैकी जवळ जवळ ७६.५९ टक्के कुटुंब आपली बचत ही बचत गटात करीत आहेत . मासिक बचत करण्यामध्ये महिलांचा सहभाग मोठा आहे. बरीचशी बचत करणारी कुटुंब ५० ते १०० रूपयांची मासिक बचत करीत आहेत. बचत गटातील सहभांगामुळे त्यांना बचत गटांतुन अल्प मुदतीसाठी काहीशा प्रमाणात कर्जपुरवठा होत आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे उत्पन्नाचे मार्ग वाढविण्यासाठी बचत गटांतुन कर्ज पुरवठा केला जात आहे बचत गटाच्या कर्जाच्या माध्यमातून ६६.६७ टक्के कुटुंब शेळया मेंढयाची खरेदी करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## ११. कुटुंबांचे राहते घर :

माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील ५७ कुटुंब (म्हणजे ५७ टक्के कुटुंब ) आणखीही अर्धवट पक्क्या व कच्च्या घरात राहत आहेत. व ४३ कुटुंब (म्हणजे ४३ टक्के कुटुंब ) पक्कया घरात राहत आहेत. म्हणजेच तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना राहत्या घराचा प्रश्न अजुनही भेडसावत आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची हालाकीची आर्थिक परिस्थीती, सरकारकडून घरकूल मिळण्याची आशा इत्यादीमुळे माळशिरस तालुक्यातीलस अजुनही निम्म्यापेक्षा जास्त दारिद्रय रेषोखालील कुटुंब कच्च्या व अर्धवट पक्कया घरात राहत आहेत.

१२. कुटुंबाचा आहार :

कुटुंबांना मिळणा-या आहारावरून ते कुटुंब किती दारिद्रयात आहे हे ठरविले जाते. दारिद्रय रेषेखालील कुटुंब ठरविताना कुटुंबाचा वार्षिक चौरस आहार विचारात घेतला जातो. चौरस आहार म्हणजे पुरेसे पोषणमुल्य असलेले भोजन होय. माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या १०० दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची पाहणी करताना असे आढळले की, ९१ कुटुंबांना (म्हणजे ९१ टक्के कुटुंबांना ) वर्षभर पोटभर पुरेशे अन्न मिळते. परंतु ९ कुटुंबाना (म्हणजे ९१ टक्के कुटुंबांना ) मात्र वर्षभर पुरेशे अन्न मिळत नाही. पावसाळयातील दिवसात ब-याच वेळा शेतीची कामे बंद होत असल्याने मजुरी न मिळुन काही कुटुंबांना त्याकाळात पुरेशे अन्न सेवन करता येत नाही. सरकार मार्फत दारिद्रय रेषेखालील लोकांना वर्षभर पोटभर आहार मिळावा या दुष्टीने 'अंत्योदय योजनेतुन' एका कुटुंबास एका महिन्याला ३५ कि.ग्रॅ. अन्नधान्य पुरविले जाते. अन्नधान्य मिळण्यासाठी त्याकुटुंबाकडे अंत्योदय योजनेचे कार्ड असावे लागते. परंतु तालुक्यातील आणखी ६० टक्के कुटुंबाना अंत्योदय योजनेचा फायदा मिळत नाही. आर्थिक अल्प उत्पन्नामुळे व अंत्योदय योजनेचाही फायदा मिळत नसल्याने काही कुटुंबाना वर्षातील काही दिवस पुरेसा पोटभर आहार मिळत नाही.

१३. राजकीय व सामाजिक कार्य :

ग्रामपंचायत पातळीवर ग्रामपंचायत सदस्य, विविध संघटनांचे कार्यकर्ते ,सामाजिक कार्यात सहभाग इत्यादी मध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा काहीसा समावेश दिसुन आला. माळशिरस तालुक्यात फक्त ५ टक्के कुटुंबांचा गावपातळीवर राजकीय सहभाग आहे. मात्र कित्येक दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना आर्थिक हालाकीच्या परिस्थितीमुळे व मजुरी कामधंदा यामुळे राजकारण, समाजकारण यात सहभागी होता येत नाही.

१४. शेतजमीन :

माळशिरस तालुक्यातील २३ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंबांकडे स्वत:ची शेतजमिन आहे. आणि ७७ टक्के कुटुंबाकडे कोणत्याही प्रकारची कसलीही शेतजमीन नाही. २३ कुटुंबाकडे एकूण ३७ एकर शेतजमीन आहे. त्यापैकी ५.४१ टक्के शेतजमीन ही बागाईत व ९४.५९

टक्के शेतजमीन ही जिराईत प्रकारची आहे. बागाईत शेती असणारी फक्त १ कुटुंब ( म्हणजे ४.३५ टक्के कुटुंब ) व जिराईत शेती असणारी २२ कुटुंब ( म्हणजे ९५.६५ टक्के कुटुंब ) आहेत. माळशिरस तालुक्यातील पावसाच्या कमी प्रमाणामुळे बरीचशी शेतजमीन जिराईत प्रकारची आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक हालाकीच्या परिस्थितीमुळे त्यांना आपल्या शेतीत पाणी पुरवठा, बांध-बधीस्तीची कामे इत्यादी कामे करता येत नाहीत. त्यामुळे बरीचशी शेतजमीन कोणतेही पिके घेण्याविना पडून आहे.

१५. बचत गट :

माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबापैकी ३६ कुटुंब (म्हणजे ३६ टक्के कुटुंब) बचत गटांत सहभागी आहेत. अशा बचत गटातील सहभागी कुटुंबांना सरकारकडून काही अनुदाने मिळत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे अशा बचत गटांना राज्यशासनाने वार्षिक ४ टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याचे ठरविले आहे. बचत गटाच्या माध्यमातुन सहभागी कुटुंबाना घरगुती व्यवसायांसाठी कर्ज मिळत आहे. माळशिरस तालुक्यातील बचत गटात समाविष्ट असणा-या कुटुंबापैकी ज्या १२ कुटुंबांनी कर्ज घेतले आहे त्यापैकी ८ कुटुंबांनी (म्हणजे ६६.६७ टक्के कुटुंबांनी ) शेळया मेंढयापालन व्यवसायांसाठी व घरगुती खर्चासाठी ४ कुटुंबांनी (म्हणजे ३३.३३ टक्के कुटुंबांनी ) बचत गटांतुन कर्ज घेतले आहे. बचत गटांतील सहभागी कुटुंबाना २ टक्के मासिक व्याजदराने कर्ज पुरवठा होत आहे. बचत गटांचा लहान व्यवहार, बचतीचे मासिक लहान हप्ते, कमी भांडवल इत्यादीमुळे सभासद कुटुंबाना ७५०० पेक्षा जास्त कर्ज मिळाले नाही.

१६. शासकीय योजना :

माळशिरस तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या १०० कुटुंबांपैकी ९४ कुटुंबांना ( म्हणजे ९४ टक्के कुटुंबांना) सरकारी दारिद्रय निर्मूलन योजनेचा लाभ झालेला आहे. या तालुक्यात ज्या योजनांचा लाभ दारीद्रय रेषेखालील कुटुंबांना मिळाला आहे त्यापैकी ४५.७४ टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना घरकुल प्राप्त झाले आहे. तसेच राजीव गांधी ग्रामीण विदयुतीकरण योजनेचा लाभ १३.८३ टक्के कुटुंबांना व अंत्योदय योजनेचा लाभ ४०.४३ टक्के

कुटुंबांना झाला आहे. अशा काही प्रमूख  योजनां व्यतिरीक्त इतर योजनांचा तितकासा लाभ तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांना झालेला दिसत नाही.

थोडक्यात, “माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक अभ्यास” या संशोधनाच्या अभ्यासातुन माळशिरस तालुक्यातील दारीद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक परीस्थिती कमकुवत व मजुरी हेच मुख्य उत्पन्नाचे साधन  असल्याचे दिसले आहे. अशा दारीद्रय रेषेखालील कुटुंबांची आर्थिक व सामाजिक परीस्थिती सुधारण्यासाठी व दारीद्रय निर्मूलनासाठी जास्तीत जास्त शासकीय योजनांची आवश्यकता असतानाही माळशिरस तालुक्यातील काही दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना अशा योजनांचा  लाभ झाला नाही. त्यामुळे माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची परिस्थीती सुधारण्या संदर्भात काही शिफारशी सुचविल्या आहेत.

शिफारशी:

१) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना शेतीतील मजुरी व्यतिरिक्त उत्पन्न मिळवून देणारी इतर साधने उपलब्ध करून देण्याविषयी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

२) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतील लोकांना दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादी व्यवसायांसाठी अल्प व्याजदराने,जादा अनुदान व दीर्घमुदतीसाठी कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा .

३) रोजगार हमीची कामे वर्षभर चालू ठेवून जास्त दारिद्रय रेषेखालील कुटुंब असणा-या भागात जादा रोजगार हमीची कामे सुरू करण्याचा प्रयत्न करावा . रोजगार हमीच्या कामावरील मजुरीत वाढ करावी. तसेच मजुरीबरोबर जे अन्नधान्य दिले जाते ते चांगल्या प्रतिचे देण्याचा प्रयत्न करावा.

४) दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी शासनातर्फे मोफत शिक्षणासारख्या विशेष सवलती देण्याची गरज आहे.

५) दारिद्रय रेषेखालील सर्व कुटुंबांना अंत्योदय योजनेचा लाभ देऊन प्रत्येक महिन्याला कुटुंबातील सदस्यांच्यासंख्येनुसार  कमीतकमी दरात जास्तीत जास्त अन्नधान्याचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करावा.

६) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना इतर लागणा-या जीवनावश्यक वस्तू शासनाने कमी दरात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा.

७) ज्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाकडे स्वत:ची शेतजमीन आहे त्या शेतीत सुधारणा होण्यासाठी शासनाने शेती औजारे, बी-बीयाणे, पाणी पुरवण्याच्या सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा.

८) दारिद्रय निर्मूलनासाठी जादा योजना आखून त्यांचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांना फायदा करून दयावा. तसेच सुरूवातीस ज्या कुटुंबाना ज्या योजनांची आवश्यकता आहे अशा योजना त्यांना अगोदर पुरवाव्यात.

९) योजनांच्या लाभार्थींची निवड गावपातळीवर काटेकोरपणे व्हावी.

१०) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची गणना करताना योग्य निकष लावून दारिद्रय रेषेखालील कुटुंब निश्चित करण्याचा प्रयत्न करावा.

# परिशिष्ट

# संदर्भ ग्रंथ यादी

# मुलाखत प्रश्नावली

## संदर्भ ग्रंथ :

**1. INDIAN ECONOMY, Ruddar Datt And K.P.M. Sundharam, S. CHAND And company Ltd. New Delhi. 2004**

**2. INDIA Economic Information Year Book 1999-90, A.N. Agarwal, H.O.varma, R.C. Gupta, National publishing House, New Delhi. 1989-90.**

**3. Rural Poverty in India, Rohini Nayyar, oxford University Press, Delhi.1991.**

**4. Poverty And Employment, k. Raghavan And Leena Shekhar, New Age International Ltd, publishers, New Delhi, India, 1995**

**5. Planning And Regional Development in India, J. Mishra And Chakradhar sinha, Gaurav publishing Home, New Delhi.1985**

**6.Tenth – Five Year plan 2002-2007 Volume – II, planning commission, Government of India, New Delhi.**

**7. India Development Report , R. Radhakrishanan, Indira Gandhi Institute of Development Research , Oxford university press New Delhi,2008**

**8. Economic Survey 2007-2008 Government of India, Ministry of Finanace, Economic Devision Oxford University press, Delhi 2008.**

९. भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. देसाई व डॉ. सौ भालेराव, निराली प्रकाशन पुणे. २००९

१०. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, डॉ. र. पु. कुरूलकर, विदया प्रकाशन नागपुर, १९९७

११. बेकारी निर्मूलनातुन ग्रामविकास, वि. स. पागे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, १९८९

१२. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल, प्रा. एस्. एस्. जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७

१३. भारतातील दारिद्रय - स्वरूप व निवारण, वि. स. पागे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे १९९२,

१४. ग्रामीण भारत : समस्याएं एवं समाधान, मूंगालाल सुरेका, प्रिन्टवैल प्रकाशन जयपूर, १९९६,

१५. महाराष्ट्र २००८ डॉ. संतोष दास्ताने- दास्ताने रामचंद्र आणि कंपनी. पुणे २००८

१६. दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबांचे गणना पत्रक २००२ महाराष्ट्र शासन.

“माळशिरस तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा एक अभ्यास”

## मुलाखत प्रश्नावली

### अ ) कुटुंबाची माहिती :-

१. कुटुंब प्रमुखाचे नाव :
२. असल्यास घराचे नांव व कमांक :
३. गावाचे नाव :
४. तालुका :
५. जिल्हा :
६. दारिद्रय रेषेखालील यादी कमांक :
७. दारिद्रय रेषेखालील यादित कधी पासुन नाव आहे :
८. कुटुंबाचा प्रकार :

❖ **कुटुंबाची रूपरेषा :**

| अ. क. | कुटुंबातील सदस्याचे नाव | वय | पुरूष - स्त्री | कुटुंब प्रमुखाशी नाते | शिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

## ब ) उत्पन्न :-

१. कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न किती आहे ?

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५0पेक्षा कामी | | २५0 ते ४९९ | | ५00 ते २५00 | | १५00ते२५00 | | २५00 पेक्षा जास्त | |

२. कुटुंबाचे उपजिवीकेचे साधन : ______________________________
______________________________

३. उत्पन्नाचे साधन :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मजुरी | | नोकरी | | कामधंदा | |

४. कुटुंबात पैसे कमविणा-या व्यक्तिची संख्या ?

| पुरूष | स्त्री | मुले | एकूण |
|---|---|---|---|
| | | | |

५. एका दिवसाची मजुरी ?

| पुरूष | स्त्री | मुले |
|---|---|---|
| | | |

६. कुटुंबातील स्त्रीयांनी काम करण्याचे कारम ?
------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------

७. कुटुंबातील मुलांची काम करण्याचे कारण ?
------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------

८. काम कोणत्या प्रकारचे असते ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शेती | | ग्रामीण व्यवसाय | | इतर | |

९ . वर्षातुन किती दिवस काम मिळते ?

| वर्षभर | | सहा महिने | | तीन महिने | |
|---|---|---|---|---|---|

१० . आपल्या भागात रोजगारांसाठी कारखानदारी विकसीत आहे का ?

१ . होय [ ] २ . नाही [ ]

११ . कोणत्या प्रकारचे उघोग सुरू आहेत ?

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------

१२ . आपणांस त्या ठिकाणी रोजगार मिळतो का ?

१ . होय [ ] २ . नाही [ ]

१३ . त्या ठिकाणी महिन्याला किती पगार मिळतो ?

-------------------------------------------------------------------------------------

१४ . शासनातर्फे रोजगाराच्या संधी प्राप्त होतात का ?

१ . होय [ ] २ . नाही [ ]

१५ . कोणत्या प्रकारचा रोजगार मिळतो ?

---

१६ . श्रमदाना बददल मोबदला काय मिळतो ?

| पैसे | | अन्नधान्य | |
|---|---|---|---|

१७ . पैसे किती ? [ ]

१८ . अन्नधान्य किती ? [ ]

१९. शेतीशी निगडित असलेला दुग्ध व्यवसाय करता का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

२०. दुग्ध व्यवसायापासून मिळणारे मासिक उत्पन्न ? [ रू. ]

२१. उत्पन्न मिळवून देणारी इतर जनावरे : -----------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

२२. त्यांच्यापासून मिळणारे मासिक उत्पन्न ः [ रू. ]

२३. कुटुंवातील सरकारी नोकरी करणा यांची संख्या : [ रू. ]

२४. सरकारी नोकरीतुन मिळणारे उत्पन्न : [ रू. ]

## क ) खर्च तपशिल .

१. कुटुंवाचा मासिक खर्च [ रू. ]

२. खर्चाची रूपरेषा ?

| अ.क. | खर्चाच्या बावी | खर्च रू. | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | भोजन | | |
| २. | कपडे | | |
| ३. | शिक्षण | | |
| ४. | आरोग्य | | |
| ५. | इतर | | |

३. मिळालेल्या उत्पन्नातून खर्च भागतो का?

१.होय [ ] २. नाही [ ]

४. खर्च भागत नसल्याचे कारण ?
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------

५ . खर्च भागवण्यासाठी तत्कालीन तरतुद कशी केली जाते ?

-----------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

६ . मासिक बचत करता का?

१ .होय [ ] २ . नाही [ ]

७ . महिण्याला किती बचत होते ? [ रू. ]

८ . बचत काठे करता ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बॅक | | घर | | पतसंस्था | |

## ड ) कर्जाची गरज

१ . कर्जाची आवश्यकता भासते का ?

१ .होय [ ] २ . नाही [ ]

२ . कशासाठी कर्ज घ्यावे लागते ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

३ . सवकारांकडून कर्ज घेता का ?

१ .होय [ ] २ . नाही [ ]

४ . सावकारी कर्जावरील व्याज दर किती असतो ?

-------------------------------------------------------------------------------------

५ . बॅकाकडून कर्ज घेता का ?

१ .होय [ ] २ . नाही [ ]

६ . बॅकाकडून कर्ज मिळण्यास काही अडचणी येतात का ?

१ .होय [ ] २ . नाही [ ]

७. कोणत्या अडचणी येतात ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

८. कर्जाचा वापर त्याच कारणांसाठी करता का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

९. कर्जाची परतफेड कशाप्रकारे करता ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

१०. कर्जाची परतफेड न झाल्याने आपल्या कुटुंबात कोणी आत्महत्या केली आहे का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

११. बॅकाकडून मिळणारे कर्ज किती मुदतीचे असते ?

| अल्पमुदत | | मध्यम मुदत | | दिर्घ मुदत | |
|---|---|---|---|---|---|

१२. कर्जावरती सरकारी अनुदान मिळते का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

१३.सरकारी कर्जमाफीचा फायदा झाला का?

१.होय [ ] २. नाही [ ]

१४. किती रूपयांचे कर्ज माफ झाले ? [ रू. ]

१५. कर्ज माफी मिळाली नसेल तर त्याचे कारण ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

## ई) राहणीमान :

१. घर स्वत:च्या मालकीचे आहे का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

२ . घरातील एकूण खोल्या .

३ . आपल्या घरी स्वच्छतागृह आहे का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

४ . घराचा प्रकार :

| कच्चे | | अर्धवट | | पक्के | |
|---|---|---|---|---|---|

५ . सरकारी योजनेतुन घर मिळाले आहे का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

६ . सरकारी योजनेतुन घरकुल मंजुर झाले तर ते बांधण्यासाठी स्वत:ची जागा आहे का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

७ . घर स्वत:च्या उत्पन्नातुन बांधू शकता का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

८ . घरातील वापरात असलेल्या वस्तू कोणत्या आहेत ?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

९ . आपल्याकडे पुढील पैकी कोणती वाहने आहेत ?

| सायकल | | मोटार सायकल | | मोटारगाडी | | ट्रॅक्टर | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

१० . वाहनांच्या माध्यमातून उत्पन्न मिळते का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

११ . किती उत्पन्न मिळते ?

१२ .आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना वर्षभर पोटभर पोषक आहार मिळतो का ?

१ .होय ☐ २ . नाही ☐

१३ .दररोजच्या जेवणामध्ये कोणत्या प्रकारच्या अन्नाचा समावेश असतो ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कडधान्य | | भाजीपाला | | मटण | |

१४.आपल्या कुटुंबात कोणास मोठा आजार आहे का ?
१.होय ☐ २. नाही ☐

१५.कोणत्या प्रकारचा आजार आहे ?
--------------------------------------------------------------------------------

१६.आजारावर उपचार सुरू आहेत का ?
१.होय ☐ २. नाही ☐

१७.उपचार घेण्यासाठी कोणत्या अडचणी येतात ?
--------------------------------------------------------------------------------

१८.उपचारांसाठी एकूण खर्च ? ☐

## फ) कुटुंबाची सामाजिक व राजकीय स्थिती :

१. आपले कुटुंब वर्षातील सर्व सण साजरे करते का ?
१.होय ☐ २. नाही ☐

२. सण - उत्सव साजरे करण्यात कोणती अडचण येते ?
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

३. आपल्या कुटुंबाचा राजकारणात सहभाग असतो का ?
१.होय ☐ २. नाही ☐

४. कोणत्या प्रकारचा सहभाग असतो ?
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

५. आजपर्यंत तुम्हाला कोणते राजकीय पद मिळाले आहे का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

६. कोणते पद मिळाले : ---------------------------------

## ग) मालमत्ता :

१. आपल्या कुटुंबाकडे स्वत:ची शेतजमीन आहे का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

२. शेतजमीन किती आहे ?

------------------------------------------------------------------------------------------

३. शेतजमीनी पासून मिळणारे उत्पन्न रूपये [ ]

४. शेतीचा प्रकार कोणता ?

| | | | |
|---|---|---|---|
| बागाईत | | जिराईत | |

५. जिराईत शेतीत घेण्यात येणारी पिके ?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

६. बागाईत शेतीत घेण्यात येणारी पिके ?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

७. शेतीचा वापर ः-

कुटुंबाच्या उपजीविकेसाठी -

शेतमालाची विक्री करून उत्पन्न मिळविण्यासाठी -

## घ) सरकारी योजणांचा लाभ :

१. अंत्योदय योजणेतुन शिधा पत्रिकेवर अन्नधान्य मिळते का ?

१.होय [ ] २. नाही [ ]

२. शिधा पत्रिकेवर मिळणारे अन्नधान्य ?

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गहू | | साखर | | तांदूळ | | केरोसिन | | गोडेतेल | |

३. इंदिरा आवास योजनेतुन घरकुल मिळाले आहे का ?

१.होय ☐ २. नाही ☐

४. घरकुल कधी मिळाले ? ------------------------------------------------------------

५. घरकुल मिळाले नसेल तर त्याचे कारण ?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

६. पतसह अर्थसाहय योजनेतुन काही अर्थलाभ झाला का ?

१.होय ☐ २. नाही ☐

७. दारिद्रय रेषेखालील बचत गटात सभास्द आहात का ?

१.होय ☐ २. नाही ☐

८. एका महिन्याला बचत गटात किती रूपयांची बचत करता ?

------------------------------------------------------------------------------------

९. बचत गटातून कर्ज घेतले आहे का ?

१.होय ☐ २. नाही ☐

१0.कर्जाचा वापर कशासाठी केला ?

-------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

११.बचत गटाचे कर्ज किती व्याज दराने मिळते ?

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

१२.सरकारच्या इतर कोणत्या योजनांपासून लाभ मिळाले का ?

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------